कार शिकायची तर कुठे फक्त शिवकृपा मध्येच...
शिवकृपा मोटार ड्रायव्हिंग स्कूल & पी यु सी (PUC) सेंटर
आमचे वैशिष्ट्ये : । महिलासाठी स्वतंत्र बॅच व्यवस्था । 3D कार सिम्युलेटर वर ड्रायव्हिंगचा सराव. । वाहतुक नियमावलींची परिपूर्ण माहिती. । मोबाईल APP द्वारे वाहतुक नियमांची परिपुर्ण माहिती. । मोटार व्हेईकल ॲक्टच्या अभ्यासक्रमानुसार ड्रायव्हिंग प्रशिक्षण. । अवघड वळणावर रात्रीच्या वेळी घाटात आणि गर्दीत प्रशिक्षण देणारी एकमेव संस्था. आमच्याकडे सर्व वाहनांचे इन्शुरन्स काढुन मिळेल.
पत्ता : शॉप नं.६ ओंकार लॉन्सजवळ, धाड नाका, बुलढाणा
सचिन सोनटक्के - ९९२३७२२५५५/ नितीन सोनटक्के - ९९२३१२२५५५

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष

कुलस्वामिनी
मंगल कार्यालय, लॉन व टेरेस हॉल
(केटरिंग व संपूर्ण पॅकेजसह) एन-६, बजरंग चौकाजवळ, सिडको
● लग्न ● मुंज ● साखरपुडा ● रिसेप्शन ● बर्थडे ● डोहाळ जेवण
इ. शुभकार्यासाठी संपूर्ण पॅकेजसह उपलब्ध...
मो. ८००७९९३१३१ / ८००७२६३१३१

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

## न्यूज ब्रीफ

### उन्हात आता पावसाचे सावट

**पुणे :** महाराष्ट्रात सध्या हवामानाचे विचित्र रूप पाहायला मिळत आहे. विदर्भात सूर्य आग ओकत असतानाच, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात पावसाची चिन्हे दिसू लागली आहेत. भारतीय हवामान विभागाने पुणे, नाशिक आणि साताऱ्यासह अनेक जिल्ह्यांसाठी पावसाचा आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

### आसाराम आश्रम पाडण्याचा मार्ग मोकळा

**अहमदाबाद :** आसाराम आश्रम पाडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उच्च न्यायालयाच्या दुहेरी न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आश्रमाचे अपील फेटाळले आहे. आता कोणत्याही क्षणी आसाराम आश्रम पाडला जाईल. यापूर्वी अहमदाबादमधील मोटेरा येथील आसाराम आश्रमाची जमीन परत घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिला होता.

### माजी मंत्री कुलकर्णींसह १५ जणांना जन्मठेप

**बंगळुरू :** राज्यातील राजकारणात खळबळ उडवून दिलेल्या धारवाड भाजपा जिल्हा परिषद सदस्य योगीश गौडा यांच्या हत्येप्रकरणी, लोकप्रतिनिधींसाठीच्या विशेष न्यायालयाने शुक्रवारी कर्नाटकचे माजी मंत्री आणि काँग्रेस आमदार विनय कुलकर्णी यांच्यासह अन्य १५ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तर या प्रकरणातील शेवटचा आरोपी असलेल्या पोलीस अधिकारी चन्नकेशव टिंगरिकेर यांना ७ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

# महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर

## ● मत मिळवण्याच्या परीक्षेत मोदी सरकार फेल! ● दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यात अपयश

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**




महिला आरक्षण विधेयकाशी संबंधित १२१ वी घटनादुरुस्ती विधेयक शुक्रवारी संसदेत नामंजूर झाले. या विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली. लोकसभेत एकूण ५२८ संसद सदस्यांनी मतदान केले. हे विधेयक मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. ५२८ च्या दोन-तृतीयांश म्हणजे ३५२ मते होतात. अशा प्रकारे, आवश्यक बहुमत मिळवण्यात अपयश आल्यामुळे, हे विधेयक ५४ मतांच्या फरकाने नामंजूर झाले.

आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात, मोदी सरकारला सभागृहात एखादे विधेयक मंजूर करून घेण्यात अपयश येण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे मत मिळवण्याच्या परिक्षेत मोदी सरकार फेल झाले.

यापूर्वी, अमित शहा यांनी एक तासाचे भाषण दिले; ज्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, जर ही विधेयके मंजूर झाली नाहीत, तर त्याची जबाबदारी विरोधी पक्षांवर असेल. त्यांनी ठामपणे सांगितले की, जर विरोधी पक्षांनी आपले मतदान रोखून धरले, तर हे विधेयक नामंजूर होईल; शिवाय, देशातील महिला हे पाहत आहेत की, त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करणारे कोण आहेत, असेही त्यांनी नमूद केले. या सुधारित विधेयकांवर लोकसभेत २१ तास चर्चा झाली. एकूण १३० खासदारांनी आपली मते मांडली, ज्यामध्ये ५६ महिला खासदारांचा समावेश होता.

### विरोधी पक्ष विचार न करता केवळ विरोध करतात : शाह



■ शाह म्हणाले, मोदी जे काही करत आहेत, त्याचे फायदे-तोटे न पाहता त्याला विरोध करायचे विरोधी पक्षाने ठरवले आहे. देशातील माता आणि भगिनींसाठी आरक्षण येत आहे, त्यामुळे कोणताही विरोध होणार नाही असे वाटले होते. पण विरोध होत आहे. मी आत्ताच सांगितले की हे विधेयक २०२३ मध्ये एकमताने मंजूर झाले होते, पण आज काँग्रेस माघार घेत आहे. याची फक्त दोनच कारणे आहेत: एक म्हणजे मोदी हे विधेयक आणत आहेत आणि त्याचे श्रेय त्यांना मिळणार आहे. मोदींनी त्यांना एक जाहिरात देऊन त्याचे श्रेय देण्यास सांगितले, तरीही ते अजूनही सहमत नाहीत.



### संविधानावरील हल्ला परतवून लावला : राहुल गांधी

■ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, संविधानावरील हा हल्ला आम्ही परतवून लावला आहे. आम्ही हे स्पष्टपणे मांडले आहे की, हे काही 'महिला आरक्षण विधेयक' नाही; तर भारताची राजकीय रचना बदलण्याचे हे एक साधन आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महिला आरक्षण अंमलबजावणीसाठी मांडण्यात आलेल्या विधेयकांवर जोरदार टीका करत केंद्र सरकारवर निशाणा साधला. हे विधेयक महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंधित नसून देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे, असेही राहुल गांधी म्हणाले.

# होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली

## इराणची मोठी घोषणा ▶ ही परवानगी युद्धबंदी संपण्यापर्यंतच

**तेहरान, वृत्तसंस्था :**

इस्रायल-लेबनॉन युद्धबंदीच्या पार्श्वभूमीवर इराणने जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा सागरी मार्ग सुरक्षित वाहतुकीसाठी खुला ठेवण्याची घोषणा केली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, या काळात सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा आणि सुरक्षित प्रवासाची परवानगी दिली जाईल. ही परवानगी युद्धबंदी संपण्यापर्यंतच असणार आहे, हे देखील इराणने स्पष्ट केले आहे.

इराणच्या 'पोर्ट्स आणि मॅरिटाइम ऑर्गनायझेशन'ने निर्धारित केलेल्या मार्गावरूनच जहाजांना प्रवास करावा लागेल. समुद्री व्यापार प्रभावित होऊ नये आणि जागतिक पुरवठा साखळी सुरळीत राहावी, यासाठी इराणने हे पाऊल उचलले आहे. अमेरिकेने इराणच्या बंदरांवर कडक नाकेबंदी लागू केली असतानाही इराणने आपली तेल निर्यात सुरूच ठेवली आहे.

### नाकेबंदीला बगल

■ अमेरिकेने सोमवारीच इराणच्या तेल निर्यातीवर निर्बंध घालण्यासाठी नाकेबंदी केली होती. मात्र, इराणने खार्ग आयलंडवरून भरलेले हे टँकर बुधवारी सुरक्षितपणे बाहेर काढले. १० एप्रिल रोजी 'स्टारला' नावाचा टँकर बाहेर पडल्यानंतरची ही इराणची सर्वात मोठी तेल निर्यात मानली जात आहे.

# राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ!

## दुहेरी नागरिकत्व प्रकरण ▶ एफआयआर दाखल करण्याचे हायकोर्टाचे आदेश

**लखनऊ, वृत्तसंस्था :**

दुहेरी नागरिकत्व संबंधित प्रकरणात अलाहाबाद हायकोर्टाच्या लखनऊ खंडपीठाने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी सुनावणी दरम्यान हे आदेश दिले. कोर्टाने म्हटले आहे की या प्रकरणात तपासानंतर पुढील कायदेशीर कारवाई होईल. नागरिकत्वासंबंधित होणाऱ्या आरोपासंदर्भात सुरु असलेल्या सुनावणी दरम्यान कोर्टाने हे आदेश दिले आहेत.



राहुल गांधी यांच्यावर दुहेरी नागरिकत्व ठेवण्याचा आरोप लावण्यात आले होते. या मुद्यावरुन हायकोर्टात याचिका दाखल झाली होती. सुनावणीनंतर कोर्टाने एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत. अलाहाबाद हायकोर्टाच्या लखनऊ खंडपीठाने शुक्रवारी आदेश दिला की लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या जवळ दुहेरी नागरिकत्वाचा होत असलेल्या आरोपा संदर्भात चौकशी व्हायला हवी. कोर्टाने उत्तर प्रदेश सरकारला निर्देश दिले की त्यांनी स्वत: तपास करावा वा हे प्रकरण कोणा सेंट्रल एजन्सीला सोपवून तपास करावा. हा आदेश भाजपा कार्यकर्ता एस.विग्नेश शिशिर यांच्या याचिकेवर आला आहे. ज्यात त्यांनी लखनऊच्या एका स्पेशल एमपी/एमएलए कोर्टाच्या २८ जानेवारीच्या आदेशाला आव्हान दिले होते. ज्यात काँग्रेस नेत्या विरोधात एफआयर दाखल करण्याची त्यांची याचिका फेटाळली होती. खालच्या कोर्टाने म्हटले होते की ते नागरिकत्वाच्या संबंधित प्रकरणाचा निर्णय करण्यास सक्षम नाही.

# खासगी ट्रॅव्हल्स-कारचा भीषण अपघात

## सहा प्रवाशांचा होरपळून मृत्यू ▶ कुटुंबावर काळाचा घाला

**यादगीर, वृत्तसंस्था :**

कर्नाटकातील यादगीर जिल्ह्यात खासगी ट्रॅव्हल्स आणि कारचा भीषण अपघात झाला. खासगी आराम बस आणि कार एकमेकांवर आदळल्याने लागलेल्या आगीत सहा प्रवासी होरपळून मृत्यू मुखी पडले. यादगीर जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यातील शांतगिरी क्रॉस येथे हा अपघात घडला. या घटनेनंतर स्थानिकांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली. मात्र, प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

खासगी आरामदायी बस बंगळुरुहून कलबुर्गीला निघाली होती, तर कार विरुद्ध दिशेने येत होती. भरधाव कार खासगी आराम बसला येऊन धडकली असता बसने लगेच पेट घेतला. या भीषण दुर्घटनेत बसने पेट घेतल्यानंतर बसमधील प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी हाताला मिळेल ते आपले सामान घेऊन बसमधून बाहेर पडण्याची धडपड केली.

मात्र, बसमधील सहा प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. तर, इतर प्रवाशांना आपला जीव वाचविण्यात यश मिळाले.



### बस आगीत जळून खास

■ बस आणि कार यांच्यातील अपघात आणि आगीचे वृत्त कळताच अग्निशमक दल पाण्याच्या गाडीसह घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग विझवली. पण, तोपर्यंत बस आगीत जळून खास झाली होती. अपघातात होरपळून मृत्यूमुखी पडलेले सहा जण एकाच कुटुंबातील असून ते देवदर्शन वरून परत येत होते. कार ओव्हरटेक करताना हा अपघात घडल्याचे यादगीर एस.पी. पृथ्वीक शंकर यांनी सांगितले.

# भोंदू खरात प्रकरणातील महत्त्वाचा साक्षीदार ठार

## 'शिवनिका ट्रस्ट'चे संचालक जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू ▶ पत्नीही ठार, मुलगा गंभीर

**मुंबई, वृत्तसंस्था :**

भोंदू अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉक्टर जितेंद्र शेळके यांचा शुक्रवारी अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या कारने समृद्धी महामार्गावर उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके यांच्यासह त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला.

जितेंद्र शेळके यांची भोंदू अशोक खरात प्रकरणात चौकशी सुरू होती. एसआयटीने त्यांचा जबाबही नोंदवला होता. ते या प्रकरणातील एक महत्त्वाचे साक्षीदार होते. त्यामुळे त्यांचा मृत्यू अपघात की घातपात? याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत. यासंबंधीच्या माहितीनुसार, जितेंद्र शेळके शुक्रवारी दुपारी १ च्या सुमारास आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते.



रस्त्यात समृद्धी महामार्गावरील धोत्रे गावालगत त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके व त्यांची पत्नी अनुराधा हे दोघे जागीच ठार झाले. तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यांची कार थेट कंटेनरखाली घुसली. त्यामुळे तिचा अक्षरशः चुराडा झाला. जखमी मुलाला लगतच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

### बँकेवर सशस्त्र दरोडा; ३५ लाख लुटले

**सिंगरौली:** मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यातील बैढन परिसरात शुक्रवारी दुपारी एका थरारक बँक दरोड्याने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या शाखेत ५ सशस्त्र दरोडेखोरांनी घुसून केवळ १५ ते २० मिनिटांत ३५ लाख रुपयांची रोकड आणि मोठ्या प्रमाणात सोन्या-चांदीचे दागिने लुटले. दरोडेखोरांनी दहशत निर्माण करण्यासाठी बँकेत फायरिंग केली आणि विरोध करणाऱ्या बँक मॅनेजरवर जीवघेणा हल्ला केला.

शुक्रवारी दुपारी १२:५० च्या सुमारास, जेव्हा बँकेत ग्राहकांची वर्दळ होती, तेव्हा दोन चेहरा लपविलेले तरुण आत शिरले. त्यांच्या मागोमाग इतर तीन साथीदार हातात पिस्तूल आणि शस्त्रे घेऊन आले. बँकेत शिरताच दरोडेखोरांनी कर्मचाऱ्यांना धमकावण्यास सुरुवात केली. जेव्हा शाखा व्यवस्थापकाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना शस्त्राच्या दांड्याने बेदम मारहाण करण्यात आली.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

# १ जूनपासून राज्यातील एसटी स्वच्छतागृहे मोफत

**कोल्हापूर, वृत्तसंस्था :**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक शुक्रवारी कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसराला अचानक भेट देत बस स्थानकातील उपहारगृह आणि स्वच्छतागृहाची पाहणी केली. यावेळी कॅन्टीनमधील दर फलकाबाबत विचारणा केली. स्वच्छतागृहात भेट देताच त्यांची स्वच्छता पाहून 'मी आज आलोय म्हणून इतकी स्वच्छता केली आहे का?' असे म्हणत कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली. उपहारगृहामध्ये जादा पैसे आकारण्याच्या तक्रारीबाबत प्रताप सरनाईक यांनी संबंधित कंत्राटदाराला जाब देखील विचारला. दरम्यान १ जूनपासून राज्यातील सर्व बस स्थानकातील स्वच्छतागृह प्रवाशांसाठी मोफत करणार असल्याची घोषणा देखील त्यांनी केली.




कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसराची शुक्रवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पाहणी केली. शौचालय आणि उपहारगृहाची स्वच्छता पाहून मी भारावून गेलो.

एवढी स्वच्छता पाहून आता मला पाहणी दौरे रद्द करावे लागतील. नंतर मला समजले की, मी येणार म्हणून एका रात्रीत हे सर्व केले. मात्र, उपहारगृहात ३० रुपयांमध्ये प्रवाशांना हवे ते खाण्याची योजना राज्य सरकारची आहे. याबाबतचा दरफलक कुठेही दिसला नाही. उपहारगृह चालकाला याबाबतचा बोर्ड दर्शनी भागात लावण्याच्या सूचना केल्या आहेत. याबाबत कारवाई करणे मला उचित वाटत नाही.

मात्र, महामंडळाने ठरवून दिलेल्या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी प्रतिक्रिया परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

### एसटी ना नफा, ना तोटा तत्त्वावर चालवण्याची भूमिका

■ राज्याचे एसटी महामंडळ हे नेहमी तोट्यातच आहे. तोटा कसा भरून काढायचा याचा प्रयत्न आहे. एसटी ना नफा, ना तोटा तत्त्वावर चालवण्याची भूमिका राज्य सरकारची आहे. देशातील कुठलेच एसटी महामंडळ हे नफ्यामध्ये नसते कारण ती लोकांना सेवा द्यायची असते. पण तोटा वाढणार नाही आणि परिवहन महामंडळ ना नफा, ना तोटा या तत्वावर चालावी यासाठी आमचा प्रयत्न आहे, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# नेपाळमध्ये सर्जिकल स्ट्राइक!

## भ्रष्टाचार उघड ▶ सात माजी पंतप्रधान, १०० मंत्री चौकशीच्या रडारवर



**काठमांडू, वृत्तसंस्था :**

नेपाळमध्ये सत्तापालट झाल्यानंतर आता एकामागून एक नवीन प्रकरणे समोर येत आहेत. नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना अटक करण्यात आली. यानंतर आता नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन शाह यांनी भ्रष्टाचाराविरोधात मोठी कारवाई सुरू केली असून, नेपाळचे सात माजी पंतप्रधान आणि १०० हून अधिक मंत्री चौकशीच्या रडारवर आले आहेत. पंतप्रधान बालेन शाह यांनी भ्रष्टाचाराविरोधात मोठा सर्जिकल स्ट्राइक सुरू केल्याचे म्हटले जात आहे.

नेपाळ सरकारने २००५ ते २०२५ या काळात सार्वजनिक पद भूषवलेल्या प्रमुख राजकीय आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची माहिती गोळा करून चौकशी करण्यासाठी एक आयोग स्थापन केला आहे. १०० हून अधिक मंत्र्यांच्या मालमत्तेचीही चौकशी केली जाणार आहे. १५ एप्रिल रोजी पंतप्रधान बालेन शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत मोठा निर्णय घेण्यात आला.

### चार सदस्यीय आयोग स्थापन करण्यात येणार

■ सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश राजेंद्र भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय आयोग स्थापन करण्यात येत आहे. या आयोगात माजी न्यायाधीश चंडीराज ढकल, पुरुषोत्तम प्रजापती, माजी पोलीस उपमहानिरीक्षक गणेश केसी आणि सनदी लेखापाल प्रकाश लमसाल यांचा समावेश आहे. सरकारच्या १०० कलमी शासन सुधारणा कार्यक्रमाच्या ४३ व्या मुद्द्यामध्ये या तरतुदीचा समावेश करण्यात आला होता. भ्रष्टाचार, अवैध संपत्ती आणि शिक्षेपासून सुटका या गोष्टी दूर करण्यासाठी पंतप्रधान कार्यालयाच्या अंतर्गत एक शक्तिशाली संपत्ती चौकशी आयोग स्थापन करण्याच्या गरजेवर या कार्यसूचीत भर देण्यात आला आहे.

## राज ठाकरे यांचा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध

# केंद्राचा सत्तेचा अमरपट्टा स्वत:कडे ठेवण्याचा प्रयत्न

**मुंबई / वृत्तसंस्था**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर तिखट हल्ला चढवला आहे. केंद्राने लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना, महिला आरक्षण विधेयकाच्या माध्यमातून स्वतःकडे सत्तेचा अमरपट्टा राहील याची तरतूद करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पण आज मोदी, शहा असल्यामुळे आपले सुखनैव सुरू आहे, असे गुजरातला वाटत असेल, तर त्यांनी लक्षात ठेवावे, आज तुम्ही सुपात आहात, पण म्हणून कायम सुपात असाल असे नाही. तुम्ही कधी ना कधी जात्यात याल हे विसरु नका, असे त्यांनी म्हटले आहे.

राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, सध्या केंद्र सरकारने लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना, महिला आरक्षण विधेयक याच्या मार्फत स्वत:कडे सत्तेचा



अमरपट्टा राहील याची तरतूद करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे, असं दिसतंय. १३१ व्या घटना दुरुस्तीतून लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना आणि त्यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे असे दाखवले गेले. आणि मग अचानक या विधेयकावर चर्चा सुरु असताना अचानक केंद्र सरकारने काल रात्री अधिसूचना काढून घोषित केलं की २०२३ चं महिला आरक्षण विधेयक आजपासून लागू झालं आहे. जर यातील बदलांवर चर्चा सुरु आहे तर मग ही घाई कसली ? केंद्र सरकारला नक्की काय साध्य करायचं आहे ?

महिला आरक्षणाला आमचा अजिबात विरोध नाही, उलट महिलांना आरक्षण मिळतंय ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे आज या दुरुस्तीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह इतर राजकीय पक्ष जो विरोध करत आहेत तो महिला आरक्षणाला विरोध नाही हे समजून घ्यावे.

### ... हा कुठला अजब न्याय ?

आमचा विरोध हा लोकसंख्येनुसार लोकसभा मतदारसंघांच्या होणाऱ्या पुनर्रचनेला आहे. घटनेतील कलम ८१ आणि ८२ सांगतात की लोकसभेतील जागा राज्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटल्या जातील. याचा सरळ अर्थ ज्या राज्यांनी शिक्षण, आरोग्य, महिलांचं सक्षमीकरण करून लोकसंख्या नियंत्रणात ठेवली त्यांच्या मेहनतीला शिक्षा आणि ज्यांनी वाट्टेल तशी लोकसंख्या वाढू दिली आणि संपूर्ण राज्यच्या राज्य बर्बाद केली त्या राज्यांचा संसदेतील टक्का वाढणार हा कुठला अजब न्याय? , असेही राज ठाकरे म्हणाले.

# उद्धव ठाकरे विधान परिषदेवर सुषमा अंधारेंना संधी देणार ?

**मुंबई / वृत्तसंस्था**

येत्या १२ मे रोजी विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या जागांवर कुणाला संधी द्यावी? या मुद्यावर सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीत जोरदार माथापच्ची सुरू आहे. त्यातच आता शिवसेना गटाकडून या जागेसाठी दस्तुरखुद्द उद्धव ठाकरे यांच्यासह ६ जणांच्या नावाची चर्चा सुरू आहे. यात ठाकरे गटाची मुलूख मैदानी तोफ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुषमा अंधारे यांच्या नावाचाही समावेश आहे. त्यामुळे ठाकरे गट अंधारेंना विधान परिषदेवर संधी देणार का? असा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

विधान परिषदेच्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होणार आहे. यापैकी ९ जागा या नियमित असून, १ जागेवर पोटनिवडणूक होणार आहे. निवडणूक संपल्यानंतर लगेचच मतमोजणी होऊन रात्री उशिरापर्यंत निकाल जाहीर होईल. विधानसभेतील संख्याबळानुसार, सत्ताधारी भाजपच्या वाट्याला सर्वाधिक ५ जागा येणार आहेत. तर त्यांचे मित्र पक्ष असणाऱ्या शिवसेनेला २, तर राष्ट्रवादीच्या वाट्याला १ जागा येणार आहे. यात विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघी १ जागा येणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे स्वतः विधान परिषदेवर जाणार की? आपल्या इतर एखाद्या नेत्याला संधी देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने ज्योति वाघमारे यांना राज्यसभेवर पाठवले आहे. वाघमारे ह्या एक दलित नेत्या आहेत. यामुळे शिवसेनेची सर्वसामान्यांतील प्रतिमा काहीशी उंचावली आहे. त्यामुळे ठाकरे गटही सुषमा अंधारेंना विधान परिषदेवर संधी देईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## ‘मतदारसंघांचे सीमांकन ही भारताची फसवणूक’

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केंद्र सरकारने आणलेल्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे संपूर्ण भारताची फसवणूक होणार असल्याचा दावा केला आहे. प्रस्तुत विधेयकामुळे दक्षिण भारतातील राज्यांचे अधिकार संपुष्टात येतील. सोबतच महाराष्ट्राचेही प्रचंड नुकसान होईल, असे ते म्हणालेत. केंद्र सरकारने लोकसभेच्या पटलावर महिला आरक्षण व सीमांकनाशी संबंधित ३ विधेयक मांडलेत. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत आरोप - प्रत्यारोपांच्या जोरदार फैरी झडत आहेत. सत्ताधारी या विधेयकांचे फायदे पटवून देत आहेत. विधेयक कसे नुकसानकारक आहे? यावर आपली भूमिका मांडत आहेत. आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही या सरकारच्या मतदारसंघ पुनर्चना विधेयकामुळे देशाचे संतुलन बिघडून दक्षिण भारतातील राज्यांचे अधिकार संपुष्टात येण्याची व महाराष्ट्राचेही मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली.

# सोशल मीडियावर ‘गेम ओव्हर’ पोस्ट

## एमआयएमच्या सहर शेख पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी

**ठाणे :** महानगरपालिकेतील एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख या सध्या बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणामुळे अडचणीत सापडल्या असताना एक वेगळाच प्रकार समोर आला आहे. गेल्या २४ तासांपासून ‘नॉट रिचेबल’ असलेल्या सहर शेख अचानक मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दिसल्या.

१६ एप्रिल रोजी मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स यांच्यात झालेला आयपीएल सामना पाहण्यासाठी त्या मैदानात उपस्थित होत्या. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाला नवा ट्विस्ट मिळाला आहे. सहर शेख यांनी स्वतः त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून स्टेडियम मधील व्हिडिओ पोस्ट केला. या व्हिडिओसोबत त्यांनी गेम ओव्हर... अशी कॅप्शन देत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यासोबतच तूने ना जाना तेरे जाने से क्या क्या हुआ... हे गाणंही त्यांनी शेअर केलं. त्यांच्या या पोस्टमुळे त्यांनी



विरोधकांना पुन्हा डिवचल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

सोशल मीडियावरही या स्टोरीची जोरदार चर्चा रंगली. गेल्या दोन दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेले सहर शेखचे वडील युनूस शेख गुरुवारी अचानक मुंब्रा पोलिस ठाण्यात हजर झाले. यावेळी त्यांनी सहरवर होत असलेले सर्व आरोप फेटाळून लावत, दोन दिवसांत आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू, सर्वांना करारा जवाब मिळेल, असा इशारा माध्यमांशी बोलताना दिला.

# प्रा.डॉ.गोपाल ढोकणे यांना इंडियन डिझाईन पेटंट जाहीर

## सिपना महाविद्यालयाचा राष्ट्रीय सन्मान...

**अमरावती / प्रतिनिधी**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा येथील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गोपाल ढोकणे यांना भारत सरकारच्या बौद्धिक संपदा कार्यालयाकडून पोर्टेबल सोलर पावर स्टोरेज अँड डिस्ट्रीब्यूशन युनिट विथ ऑटोनॉमस पॉवर अलोगेशन फोर इलेक्ट्रिकल अप्लिकेशन्स या नाविन्यपूर्ण उपकरणासाठी डिझाईन पेटंट जाहीर झाले आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या संशोधन परंपरेला नवे बळ मिळाले आहे.

ही रचना पोर्टेबल सोलर पॉवर स्टोरेज आणि स्वयंचलित वितरण युनिट दर्शवते, जी सौर ऊर्जेचे कार्यक्षम साठवण करून स्मार्ट प्रणाली द्वारे योग्य वितरण करते. ही प्रणाली पर्यावरणपूरक, ऊर्जा बचत करणारी आणि पोर्टेबल



असल्यामुळे वापरण्यास सुलभ आहे. वीज नसलेल्या किंवा कमी उपलब्ध असलेल्या भागांमध्ये ती अत्यंत उपयुक्त ठरते. याचा उपयोग ग्रामीण व दुर्गम भागात वीज पुरवठा, आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरती वीज, घरगुती उपकरणे चालवणे, शेती व सिंचनासाठी पंप चालवणे यासाठी होणार आहे.

या उल्लेखनीय यशामागे सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, सचिव प्रशांत तायडे, डॉ. रवींद्र कडू, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य लाभल्याचे प्रा. ढोकणे यांनी गौरवपूर्वक नमूद केले.

### संशोधकांचा संयुक्त सहभाग

या डिझाईन पेटंटमध्ये विविध महाविद्यालयांतील संशोधकांचे मोलाचे योगदान लाभले आहे. प्रा. डॉ. गोपाल रामेश्वरराव ढोकणे यांच्यासह संशोधक सतीशकुमार अशोक आठवले, स. प्रा. विशाल भिवसेन भिसे, प्रा. डॉ. राजू मदन बेलेकर, प्रा. डॉ. मिलिंद राजेश बेलखेडकर, स. प्रा. निखिल भिकाजी उंबरकर, प्रा. डॉ. राजेश रामकृष्ण रिसोडकर, स. प्रा. डॉ. निखिलेश सुभाषचंद्र बजाज व स. प्रा. डॉ. दीपक जालिंदर भगत यांच्या एकत्रित संशोधन कार्यामुळे हे यश संपादन शक्य झाले.

# वाल्मिक कराडची जेलमध्ये तब्येत ढासळली

**बीड / वृत्तसंस्था**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याची प्रकृती अचानक खालावल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी सकाळी त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने पोलिसांनी तातडीने मोठ्या बंदोबस्तात जिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या डॉक्टरांकडून त्याची सखोल वैद्यकीय तपासणी सुरू असून पुढील उपचारांबाबत निर्णय तपासणीनंतरच घेतला जाणार आहे. या घटनेमुळे प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रुग्णालयात नेताना वाल्मिक कराडचा बदललेला चेहराही समोर आला. दीर्घ काळ तुरुंगात राहिल्यामुळे त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याचे दिसून आले. केस पांढरे पडलेले, शरीर अशक्त झाल्याचे आणि थकवा जाणवत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या



अवस्थेमुळे कराडच्या आरोग्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, रुग्णालय परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

वाल्मिक कराड रुग्णालयात दाखल होताच त्याच्या समर्थकांनीही रुग्णालयाबाहेर गर्दी केली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली. डॉक्टरांकडून आवश्यक चाचण्या सुरू असून त्याच्या प्रकृतीची स्थिती नेमकी काय आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, त्याच्या तब्येतीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.




### राशीभविष्य


- **मेष** : विवाहाची बोलणी सफल होतील. व्यवसायात उलाढाल वाढेल. नव्या ओळखी लाभदायक ठरतील.
- **वृषभ** : आत्मविश्वासाने निर्णय घ्या. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. सामाजिक कार्यात सहभाग घडेल.
- **मिथुन** : सरकारी कामं रखडतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. व्यवसायात नुकसान संभवतं.
- **कर्क** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. प्रलंबित कामांना गती येईल. नोकरीत बदली–बढतीचे योग आहेत.
- **सिंह** : कौटुंबिक वादविवाद संभवतात. शिक्षणक्षेत्रात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : कमी बोलणं हिताचं ठरेल. महत्त्वाची कामं मनाजोगी होतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल.
- **तूळ** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. उपजत गुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : प्रियजनांसाठी खर्च करावा लागेल. छोटा–मोठा प्रवास घडेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा.
- **धनु** : आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. करारास अनुकूलता राहील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वाव मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : महत्त्वाची वार्ता येईल. प्रेमप्रकरणात दिलासा मिळेल. घरात मंगलकार्याची बोलणी होतील.
- **मीन** : इतरांच्या वादात मध्यस्थी नको. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती उत्तम राहील.

### १८ एप्रिल — दिनविशेष

- **१९५५** : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन यांचं निधन.
- **१९८३** : बैरुतमध्ये अमेरिकेच्या वकीलातीवर हल्ला.
- **२०१७** : बाबरी मशीद पाडल्याप्रकरणी लालकृष्ण अडवानी, मुरलीमनोहर जोशी आणि उमा भारती यांच्यासह काहींवर खटला चालवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.
- **२०१८** : मुंबई बॉंबस्फोट प्रकरणातील फाशीची शिक्षा झालेल्या ताहिर मर्चंटचा मृत्यू.

### योगाभ्यास — उपयुक्त मुद्रा

आपण योगासनांचे महत्त्व जाणतो. हस्त मुद्रा हा योगाचाच एक भाग आहे. नृत्य हा योग आणि एक प्रकारचे आसन मानले जाते कारण त्यात अनेक प्रकारच्या मुद्रा बनवल्या जातात. त्यात हाताच्या मुद्रादेखील दिसतात. हाताचे हावभाव प्रभावी असल्यामुळे त्याचा परिणाम शरीराच्या नसा आणि नाडींवर होतो. निर्धारित वेळी सराव केल्यास प्रत्येक मुद्रा अत्यंत प्रभावी ठरते.



अशीच एक लाभकारक मुद्रा करण्यासाठी हृदय चक्राजवळ तळवे एकमेकांच्या समोर आणा. उजव्या हाताचा अंगठा (अग्नि तत्व), तर्जनी (वायु तत्व), मध्य बोट (आकाश तत्व), अनामिका (पृथ्वी तत्व) आणि करंगळी (जल तत्व) यांची पेरे डाव्या हाताच्या बोटांच्या संपर्कात आणा. यावेळी बोटे पसरलेली राहतील म्हणजेच चार बोटे पुढे आणि अंगठा वर असेल. तळवे एकमेकांच्या संपर्कात नसावेत. यावेळी पुढचे हात जमिनीला समांतर असावेत आणि कोपर बाहेरच्या दिशेला असावेत. आता पाठीचा कणा सरळ ठेवून डोळे बंद करून सराव करा.

या सरावासाठी पहाटेची वेळ सर्वात उत्तम मानली जाते. या मुद्रेचा सराव केल्याने शरीरातील पाच घटकांचा समतोल साधला जातो. हे अजना चक्र उत्तेजित करत असल्यामुळे बुद्धिमत्ता आणि मनाची शक्ती वाढते. कोणत्याही शारीरिक व्याधीतून बरे होण्यासाठी ही एक योग्य मुद्रा आहे. हे एकाग्रता शक्ती सुधारण्यास मदत करते आणि तर्कशक्ती देखील सुधारते. प्रदीर्घ सरावाने मनाला शांती मिळते.

### टेक फन — शॉर्ट अँड स्वीट व्हिडिओसाठी...

फोनमधल्या दर्जेदार कॅमेऱ्यामुळे चांगले फोटो काढता येतात आणि व्हिडिओ शूटही करता येतं. असे व्हिडिओ एडिट करण्यासाठी स्मार्टफोन्समध्ये वेगवेगळी टूल्सही असतात. त्यांचा वापर करुन तुम्ही व्हिडिओ शॉर्ट अँड स्वीट करु शकता. अगदी सहजतेने व्हिडिओ एडिट करु शकता. यामुळे नको असलेले शॉट्स डिलिट होतील आणि व्हिडिओ बघताना कंटाळा येणार नाही. व्हिडिओ ट्रिम कसा करायचा, याबाबतच्या खास टिप्स...

* सर्वप्रथम व्हिडिओ ओपन करा. आता वर कात्रीचा आयकॉन दिसेल. काही स्मार्टफोन्समध्ये पेन्सिलचा आयकॉन असतो. या आयकॉनवर क्लिक करा.
* आता स्क्रीनवर एक टाईमलाईन दिसेल. ही व्हिडिओ टाईमलाईन आहे. या टाईमलाईनवर व्हिडिओची प्रत्येक फ्रेम दिसेल.
* हा व्हिडिओ एका बाजूने ड्रॅग करा. कापायच्या भागावर टॅप करा. व्हिडिओची लेंथ सिलेक्ट करा.
* ट्रिम झाल्यानंतर व्हिडिओ सेव्ह करा.

### ब्युटी टॉक — उन्हाळ्यासाठी मेक अप टिप्स

* ब्राँझर हे मेक अप उत्पादन सध्या बरंच लोकप्रिय ठरत आहे. पण याचा वापर मर्यादित प्रमाणात करायला हवा. संपूर्ण चेहऱ्यावर ब्राँझर थापू नये. अगदी थोडंसं ब्राँझर घेऊन जबड्यालगत कपाळाच्या कडेला आणि नाकाच्या दोन्ही बाजूंना लावा. आवश्यकतेनुसार जास्तीचं ब्राँझर लावता येईल. पण एकाच वेळी जास्त ब्राँझर घेणं टाळा. * भुवयांचं ग्रुमिंग करताना त्यांच्या रंगाशी साधर्म्य साधणाऱ्या उत्पादनांचा वापर करा. भुवयांना जाडसर लूक देण्यासाठी जेल, पेन्सिल किंवा पावडर कशाचाही वापर केला तरी फार गडद रंग निवडू नका. यामुळे तुमच्या भुवया बनावट दिसू शकतात. तुमचा नैसर्गिक लूक बिघडू शकतो. त्यामुळे भुवयांचा मेक अप हलक्या हातांनी करा. * नैसर्गिक गुलाबी गाल सौंदर्याचं आणि उत्तम आरोग्याचं प्रतिक ठरतात. त्यामुळे ब्लश वापरताना हा नैसर्गिक लूक टिकायला हवा. त्यामुळे स्कीन टोनला साजेसा ब्लश विकत घ्या. गोऱ्या तसंच गव्हाळ वर्णाच्या महिला रोझी पिंक तसंच पिच रंगाच्या शेड्स वापरू शकतात. न्यूड, लाल, ब्राउन रंगाचे ब्लश सावळ्या महिलांवर शोभून दिसतात.

### पंचांग

**शनिवार, १८ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
वैशाख शु. १, चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : अश्विनी, योग : प्रीति,
सूर्योदय ६.२२, सूर्यास्त ६.५५

### फॉरवर्ड्स

**हमारी ख़ामोशियों के राज़ ख़ुद हमें ही नहीं मालूम...**

**जानें क्यों लोग़ हमें मग़रूर समझतें है...!**

### करीअर ग्रोथ

* स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करा. आजपासून दहा वर्षांनी तुम्हाला तुमच्यात अपेक्षित असलेल्या बदलांची यादी करा. शांतता, सुख, समाधान हवं असेल तर दगदग, धावपळ यापासून तुम्ही लांब रहाल. * दहा वर्षांनंतरच्या नोकरीच्या स्थानाचा विचार करा. तुम्हाला स्वत:ला कोणत्या पदावर बघायला आवडेल, हे ठरवून ठेवा. त्या दृष्टीने प्रयत्न करा. * आर्थिक सुबत्तेचा विचार प्रत्येकाच्या मनात असतो. आपल्याला कसं आयुष्य जगायचं आहे, कोणती भौतिक सुखं हवी आहेत, किती संपत्ती असायला हवी याचा विचार करा. त्यानुसार करीअरमध्ये पुढे जायला हवं.

### करिअरवाटा — लॉ मध्येही स्पेशलायझेशन

हा काळ स्पेशलायझेशनचा असला तरी अद्याप कायद्याच्या क्षेत्रामध्ये स्पेशलायझेशनचा म्हणावा तेवढा बोलबाला झालेला नाही. फौजदारी आणि मुलकी खटले हाताळणारे वकील असं ढोबळ वर्गीकरण या क्षेत्रात रूढ आहे. परंतु आता विशिष्ट कायद्यांचा विशेष अभ्यास करून त्यातच



करिअर करण्याची कल्पना पुढे येत आहे. पर्यावरणविषयक कायदे, आरोग्यविषयक कायदे, ग्राहकांच्या विषयीचे कायदे, कंपन्यांच्या व्यवहाराविषयीचे कायदे अशा विविध शाखा विकसित होत आहेत. त्यामुळे कायद्याची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेताना यातल्या कोणत्या तरी एका विषयाचे स्पेशलायझेशन करण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे. काळाची ही गरज ओळखून विविध विद्यापीठांनी असे विशेष अभ्यासक्रम सुरू केले आहेत आणि भारतातली काही विद्यापीठे त्यासाठी प्रसिद्धही आहेत. दिल्लीतील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी या विद्यापीठामध्ये अशा विशिष्ट अभ्यासक्रमांची योजना आहे. तिथे इन्टेलेक्च्युअल प्रॉपर्टी ॲक्ट, एनर्जी ॲक्ट, व्हेंच्युअर कॅपिटल ॲक्ट अशा वेगळ्या कायद्यांचे अभ्यासक्रम आहेत. मल्टिनॅशनल कंपन्या नियमितपणे वकिलाचा सल्ला घेत असल्यामुळे संधीचा फायदा घेऊन लॉ फर्मस कार्यालये स्थापत आहेत.

### खेचाखेची — खराब आंबे

**सौ. पुणेकर:** मला सगळे सडके, खराब आंबे द्या.
**आंबेवाला** : खराब ???
**सौ. पुणेकर** : हो हो. खराब, नासके आणि सडके !
**आंबेवाला** : (सर्व खराब आंबे एकत्र करून) हे घ्या...
**सौ. पुणेकर** : हं . ठेवा बाजूला... आता उरलेल्या पैकी अर्धा डझन द्या !

आंबेवाल्याने खराब आंब्याचा रस पिऊन जीव दिला.

### वेगळं काही

जपानमध्ये शिकोकू बेटांवर नागोरो हे गाव वसलं आहे. ६९ वर्षांच्या महिलेने संपूर्ण गावात २७० पुतळे बसवले आहेत. लोकांना एकटं वाटू नये यासाठी तिने ही कल्पना लढवली. याच कारणामुळे नागोरोला पुतळ्यांचं गाव असंही म्हणतात. या गावातले बरेच लोक शहरात निघून गेले आहेत. इथे राहणारी सर्वात लहान वयाची व्यक्ती ५५ वर्षांची आहे. इथे फक्त २७ लोक उरले आहेत. निर्जन होत चाललेलं हे गाव वाचवण्यासाठी आयनो सुकिमी नावाच्या महिलेने इथे पुतळे बसवायचं ठरवलं. यामुळे तरी लोक गावात थांबतील, रस्त्यावर दिसतील असं तिला वाटायचं. आयनोने गावातल्या शाळा, बसस्थानकं, किराणा सामानाची दुकानं आणि मैदानांमध्ये हे पुतळे बसवले आहेत.

### फॅशन पॅशन — अंतर्वस्त्र निवडताना...

अंतर्वस्त्रांची खरेदी काळजीपूर्वक आणि पुरेसा वेळ हाती ठेवून करावी. अंतर्वस्त्राचं फिटिंग योग्य असेल तरच पेहराव उठून दिसतो. पण बरेचदा ही काळजी घेतली जात नाही. डीप नेक ड्रेस परिधान करताना चुकीची ब्रा घातली जाते आणि हसं होतं. हे टाळायचं तर काय करावं?



* डीप नेकलाईन ड्रेससाठी ब्रा ऐवजी डक्ट टेपचा उपयोग करावा. ब्रेस्टलाईन जास्त असणाऱ्या महिलांसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे. पण टेप काढताना काळजी घ्यावी. यात चूक झाली तर त्वचेला हानी पोहोचू शकते. * बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स खालच्या बाजूने ब्रा ची उंची खेचतात. त्यामुळे डीप नेकलाईन ड्रेसमध्ये हूक दिसून येत नाहीत. लो बॅक किंवा हॉल्टर गाऊन्ससाठी बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. * ड्रेस बॅकलेस असेल आणि नेकलाईनही डीप असेल तर ब्रा ऐवजी सिलिकॉन पेस्टीचा पर्याय उत्तम आहे. या पेस्टीज ब्रेस्टवर चिकटवायच्या असतात. यामुळे ड्रेसला समोरून स्मूथ फिनिशिंग मिळतं त्याचबरोबर पॅडिंग सपोर्टही मिळतो. * डीप नेकलाईन आणि समोरून शीर फॅब्रिकचं मिक्स्चर असेल तर प्लंज ब्रा वापरावी.

दैनिक
महाभूमि
शनिवार । १८ एप्रिल २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १५४९१०
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १४२०००
चांदी (प्रति किलो) २६००००

**दखल...**

**शाखी वनवा..!**

अत्र तत्र सर्वत्र सुर्य
ओकतोय उष्ण हवा
जिवाला हायसं वाटेल
असा कुठं दिसेना गारवा..!

ऐक मानवा, भविष्याच्या हाका
वाढते प्रदुषण युद्धाचे दुष्परीणाम
बिगडवते आहे निसर्गाचा समतोल
वेळीच सावध झाला नाही तर –
चुकवावे लागेल मोल..!

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**(९४२१३९४३३९)**

**न्यूज ब्रीफ**

## प्लास्टिक कचऱ्यावर बंदी घाला : शैलेश सावजी

**बुलढाणा** : जिल्ह्यातील गावांमध्ये सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम तसेच विविध मिरवणुकांदरम्यान उडवला जाणारा बारीक प्लास्टिक कागदांचा कचरा तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शैलेश सुबोध सावजी यांनी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
निवेदनात नमूद आहे की, गावांमध्ये निघणाऱ्या मिरवणुकांमध्ये रंगीबेरंगी प्लास्टिक कागदांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मिरवणूक सुरू असताना हा प्रकार आकर्षक वाटत असला, तरी कार्यक्रम संपल्यानंतर हा कचरा रस्ते, नाले, चौक, सार्वजनिक ठिकाणे व गाव परिसरात मोठ्या प्रमाणावर पसरतो. त्यामुळे गावातील स्वच्छता बिघडते तसेच नाले तुंबण्याचे प्रकार घडतात. तसेच गावांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गायी, बैल, शेळ्या व इतर जनावरे हा कचरा अन्न समजून खात असल्याने त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

## गावकऱ्यांना तीन हजार स्टील ताटांचे वाटप

**अंढेरा** : इसरूळ ग्रामपंचायतने प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यासाठी कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे. गावातील विविध समाजातील नागरिकांना तीन हजार स्टील ताटांचे वाटप करण्यात आले असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे. ग्रामपंचायत सरपंच सतीश भुतेकर यांच्या पुढाकारातून व ग्रामपंचायत सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. प्लास्टिकच्या वापरामुळे वाढणारे पर्यावरणीय दुष्परिणाम लक्षात घेऊन नागरिकांनी दैनंदिन वापरात स्टीलच्या ताटांचा वापर करावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गावातील सर्व समाज घटकांना ताटांचे वितरण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयासमोर झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### विशेष पथकांकडून कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम

# जिल्ह्यातील आठ रासायनिक खत विक्री परवाने निलंबित

**बुलढाणा/प्रतिनिधी**



जिल्ह्यातील गुणनियंत्रण निरीक्षक यांनी केलेल्या तपासणी दरम्यान आढळलेल्या अनियमिततेमुळे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी संतोष डाबरे यांनी जिल्ह्यातील ८ रासायनिक खत विक्री परवाने निलंबित केले असून दोन परवाना धारकांना सक्त ताकीद दिली आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना खताची कमतरता भासू नये यासाठी प्रशासनाच्या वतीने सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. मात्र काही कृषी सेवा केंद्रावरून निर्धारित नियमांचे उल्लंघन करून खतांची विक्री करण्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. खतांची विक्री करणाऱ्या दुकानांमधून कृत्रीम खतटंचाई निर्माण केली जात होती अशा खत विक्री करणाऱ्या दुकानांवर तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा यापूर्वीच कृषी विभागाकडून जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्र धारकांना दिला होता. त्याअनुषंगाने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने स्थापित केलेल्या पथकांकडून कृषी सेवा केंद्राची तपासणी केली जात आहे.

तपासणी दरम्यान त्रुटी आढळलेल्या कृषी सेवा केंद्र चालकांचे खत विक्री परवाने निलंबित करण्यात आले आहेत. कृषी केंद्र धारकांनी अनुदानीत रासायनिक खते विक्री करतांना खरेदीदार शेतक-यांचे ई-पाँस मशीनवर नोंद घेऊन विक्री करणे व त्या शेतक-यांना पक्के बिल देणे अपेक्षित असतांना संबंधीत परवानाधारकांनी वरील नियमांचे पालन केले नाही. तसेच साठा पुस्तक अद्यावत न ठेवणे, देयकावर शेतक-यांची स्वाक्षरी नसणे व इतर कारणामुळे खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाचे जिल्हा गुणवत्ता निरिक्षक गणेश सावंत यांनी सांगितले.

> *जिल्ह्यातील परवानाधारक खत विक्रेत्यांनी नियमानुसार रासायनिक खत विक्री करावी, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल.*
> - **संतोष डाबरे,** *जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा*

## शासनाचे दुर्लक्ष; शेतकऱ्यांनी मोसंबीच्या बागेवर चालविली कुऱ्हाड

**देऊळगाव राजा/प्रतिनिधी**



खडकपूर्णा प्रकल्पाचे मूबलक पाण्याच्या भरोवशावर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी मोसंबी बागेची लागवड केली. शेतकरी दोन वर्षापासून मोसंबी बागेचा विमा भरत आहेत. ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊसमुळे मोसंबीची पाहिजे त्या प्रमाणात फळधारणा होत नाही विमा भरपाई मिळत नाही. मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने कंटाळलेल्या शेतकऱ्यांनी मोसंबीच्या बाग स्वहस्ते कुऱ्हाड चालवून नष्ट करणे सुरू केले आहे.

तालुक्यामध्ये खडकपूर्णा प्रकल्पामुळे पाण्याची उपलब्धता झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड केली होती यामध्ये मोसंबी पिकाची लागवड काही प्रमाणात करण्यात आली होती. सुरुवातीला फळबाग विमा काढायचा असेल तर २५ हेक्टर जमिनीवर त्या परिसरामध्ये किंवा त्या विभागामध्ये मंडळामध्ये २५ हेक्टर बागाची लागवड करावी लागेल असे शासनाचे धोरण होते. या भागामध्ये धरणाचे पाणी असल्याने भरपूर प्रमाणात मोसंबीची लागवड झाली होती. कृषी विभागाने २५ हेक्टरच्यावर मंडळाच्या विभागामध्ये मोसंबीची लागवड झाली असल्याचा अहवाल वरिष्ठांना पाठविला होता. त्यामुळे या पिकाला विम्याचे कवच लाभले. शेतकरी दोन वर्षांपासून या पिकाचा विमा भरत आहे. परंतु अवकाळी पावसामुळे मोसंबी पिकाला गेल्या दोन वर्षांपासून फळधारणा होत नाही. विमा भरूनही विम्याचे पैसे मिळत नाहीत. मग, मोसंबी ठेवायची कशासाठी? असा विचार करून शेतकरी गजानन घुगे यांच्यासह इतर मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या मोसंबी फळबागेवर कुऱ्हाड चालवून शासनाच्या धोरणाविरोधात रोष व्यक्त केला.

## आंब्रे यांनी स्वीकारला जिल्हा क्रीडा अधिकारी पदाचा कार्यभार

**बुलढाणा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशान्वये १५ एप्रिल रोजी आंतरराष्ट्रीय पावरलिफ्टींग खेळाडू तथा 'स्ट्राँग वुमन ऑफ इंडिया' किताब प्राप्त, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी भक्ती अजित आंब्रे यांनी क्रीडा अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

आंब्रे या यापूर्वी तालुका क्रीडा अधिकारी, पालघर येथे कार्यरत होत्या. पावरलिफ्टींग या खेळातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीमुळे त्यांना 'स्ट्राँग वुमन ऑफ इंडिया' हा विशेष किताब तसेच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. स्वतः एक यशस्वी खेळाडू असल्यामुळे जिल्ह्यातील पावरलिफ्टींगसह विविध क्रीडा प्रकारांना चालना देत खेळाडूंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी त्या प्रयत्नशील राहतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## आजी-माजी आमदारांना तडीपार करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी



**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्ह्यांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम प्रशासनाचे आहे. गेल्या काही दिवसांपासून आमदार संजय गायकवाड व माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्यातील वितुष्ट शिगेला पोहोचले आहे. त्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो हे पाहता, आजी- माजी आमदारांना जिल्हयातून तडीपार करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष नीलेश जाधव यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

आमदार संजय गायकवाड व भाजपा जिल्हाध्यक्ष विजराज शिंदे यांच्या बेताल वक्तव्यामुळे राजमाता माँ जिजाऊचे माहेरघर असलेला बुलढाणा जिल्ह्याची बदनामी होत आहे.

सामाजिक व राजकीय वातावरण गढूळ होऊन जनतेमध्ये रोष निर्माण झाला आहे. तसेच आमदार संजय गायकवाड व भाजपचे जिल्हाध्यक्ष विरायराज शिंदे यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हेसुध्दा दाखल असून ती प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सदर प्रकरणात तात्काळ चौकशीचे आदेश देण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात दिला आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष निलेश जाधव, ॲड.अमर इंगळे, शेषराव मोरे, तालुकाध्यक्ष मनोज खरात, समाधान डोंगरे, संजय धुरंधर, दिलीप वाकोडे, दिलीप वाकोडे, अनिल जाधव, रवि खराटे, अशोक सरदार, महेन्द्र पन्हाळ,संजय जाधव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अनेक वर्षांपासूनचे जिल्हावासियांचे खामगाव - जालना रेल्वे मार्गाचे स्वप्न पूर्ण होणार!

**बुलढाणा/प्रतिनिधी**



खामगांव-जालना रेल्वे मार्गाला अंतीम मंजूरातीची गोड बातमी जिल्हावासियांना लवकरच मिळणार आहे. खामगांव-जालना रेल्वे मार्गा संदर्भात शुक्रवारी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रिय रेल्वे अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली असून, खामगांव-जालना रेल्वे मार्गाबद्दल पाठपुरावा सुरू आहे.

बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरणारा आणि मध्य व सेंट्रल रेल्वेला जोडणारा महत्वकांशी असा खामगाव जालना रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आला आहे या रेल्वे मार्गासाठी लागणारा ५०% निधीचा वाटा राज्य सरकारने उचलला असून त्या संदर्भाची तरतूद ही अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे त्यानंतर या संदर्भाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांच्यावतीने सातत्याने रेल्वेमंत्री आणि रेल्वेमंत्र्याकडे या रेल्वेमार्गासंदर्भाचा पाठपुरावा सुरू आहे या रेल्वे मार्गामुळे जिल्ह्याच्या विकासालाही गती मिळणार आहे त्या दृष्टिकोनातून खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी ५० टक्के आर्थिक निधीची तरतूद संदर्भात पाठपुरावा सुरु आहे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बाबत सकारात्मकता दर्शवली आहे आज त्यांची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी सदिच्छा भेट घेतली ..या भेटीदरम्यान त्यांनी पुन्हा खामगाव जालना रेल्वे मार्गाचा विषय चर्चाला असता रेल्वे मंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवली.

**केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचे सातत्याने प्रयत्न..**

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून सन २००९ मध्ये प्रथमच निवडून गेल्यानंतर खासदार प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जालना रेल्वे मार्गासाठी प्रयत्न सुरू केले होते लोकसभेत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न लावून धरला होता त्यामुळे या रेल्वेच्या सर्वेक्षणाला मंजुरात मिळाली त्यानंतर हा रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आला आणि केंद्र सरकारने या रेल्वे मार्गाला तत्वतः मान्यता दिली त्यानंतर महाराष्ट्र सरकारकडूनही ५०टक्के निधीची तरतूद करून यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे .

## २० हजारांची लाच घेताना सहाय्यक महसूल अधिकाऱ्यास पकडले

**मेहकर/प्रतिनिधी**

येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी कैलास भगवान मुरकुट (वय ४६) यांना २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. जमिनीच्या फेरफार रद्द करण्यासंदर्भातील अंतिम आदेशाची मूळ प्रत देण्यासाठी त्यांनी ही रक्कम मागितल्याचे उघड झाले आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कैलास मुरकुट हे उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर येथे सहाय्यक महसूल अधिकारी तथा प्रस्तुतकार-१ म्हणून कार्यरत आहेत. ते बालाजी नगर, प्लॉट क्रमांक ४९, मेहकर येथे वास्तव्यास आहेत. या प्रकरणातील तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून, त्यांच्या पक्षकाराच्या (नात्याने चुलत आजोबा) जमिनीच्या फेरफार रद्द प्रकरणातील कायदेशीर बाबींसाठी त्यांच्याकडे वकीलपत्र होते. या संदर्भातील अपीलावर २३ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम आदेश झाला होता. मात्र, त्या अंतिम आदेशाची मूळ नक्कल प्रत आरोपीकडेच असल्याने तक्रारदाराने ती प्रत मागितली.यावेळी आरोपी कैलास मुरकुट यांनी सदर आदेशाची मूळ प्रत देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबी वाशीमकडे प्राप्त झाली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर १६ एप्रिल २०२६ रोजी सापळा रचण्यात आला.पडताळणीदरम्यान आरोपीने पुन्हा २० हजार रुपयांची मागणी करून रक्कम स्वीकारण्यास संमती दिली. त्यानुसार कार्यालय, मेहकर येथील प्रस्तुतकार-१ यांच्या कक्षात सापळा कारवाई करण्यात आली. यावेळी कैलास मुरकुट यांनी तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. सापळा अधिकारी म्हणून पोउपअ. जगदीश परदेशी, तसेच पोहेकॉं नितीन टवलारकर, योगेश खोटे आणि चालक पोकों मंगेश देवकाते यांनी सहभाग घेतला.

### आखाती युध्दामुळे प्लास्टीकचे दर दुप्पट

# विक्रेत्यांसह शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी!

**चिखली/प्रतिनिधी**

आखाती देशातील युद्धामुळे आयात घटल्याने प्लास्टीकच्या कच्च्या मालाचा तुटवडा निर्माण झाला आहे त्यामुळे पॉलिमर प्लास्टिकचा दर दुप्पट झाला आहे. परिणामी पीव्हीसी पाईप, प्लंबिंग साहित्य, मल्चिंग पेपरसह ठिबक सिंचन सेटमध्ये भाव वाढ झाली आहे त्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची प्लास्टिक उपकरणाच्या वाढत्या किमतीमुळे आर्थिक कोंडी झाली आहे.

आखाती युद्धामुळे प्लास्टिक उद्योगाला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा घटल्याने बाजारात उठाव निर्माण झाला आहे. पीव्हीसी पाईप मल्चिंग पेपर्सह इतर प्लास्टिक साहित्याच्या दरात ४० ते ५० टक्के वाढ झाली आहे परिणामी ठिबक सिंचन संचाच्या किमतीत ५० टक्क्यापर्यंत वाढ झाली आहे. प्लंबिंग साहित्याची ही दरवाढ शेती साहित्या सोबतच पाईपच्या किमतीतही वाढ झाली आहे. त्यामुळे घरातील लाईट फिटिंग किंवा घर बांधकाम करतेवेळी वापरला जाणारा प्लास्टिक पाईपच्याही दरात वाढ झाली आहे त्यामुळे प्लंबिंग साहित्याच्या दरवाढीचा फटका आता घर बांधकामावर ही झाला आहे. पीव्हीसी पाईपच्या दरात भरमसाठ वाढ स्थानिक बाजारात विविध आकाराच्या पाईपच्या दरात मोठी वाढ झाली आहे. दोन इंची पाईपमध्ये पंधरा ते वीस टक्के २.५ इंची पाईपमध्ये वीस ते पंचवीस टक्के तीन इंची पाईपमध्ये २५ ते ३० टक्के चार इंची मध्ये तीस ते पस्तीस टक्के पाच व सहा इंची पाईपच्या किमती ४० ते ५० टक्क्यांनी वाढल्याचे व्यापारी सांगत आहेत त्यामुळे शेतकऱ्याचे शेतीसाठीचे बजेट आता कोलमडणार आहे.

> **दर वाढल्याने वाढीव दरात विक्री..**
> *आखाती युद्धामुळे प्लास्टिक व इतर कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. पीव्हीसी पाईप मल्चिंग पेपर व इतर प्लास्टिक साहित्यात चाळीस ते पंचेचाळीस टक्के वाढ झाली आहे त्यामुळे प्लास्टिक साहित्याचे दर वाढल्याने वाढीव दरात साहित्य विक्री करावी लागत आहे.*
> - **विनोद लेंडे,** *शेती साहित्य विक्रेते*

> **साहित्य खरेदीबाबत संभ्रम..**
> *पुढील वर्षी कमी पावसाचा अंदाज लक्षात घेता यावर्षी मल्चिंग व ठिबक वापर वाढविण्याचा विचार परिसरातील अनेक शेतकरी करीत आहेत मात्र अचानक या साहित्याचे दर वाढल्याने शेतकरी साहित्य खरेदी बाबत संभ्रमात आहेत*
> - **विष्णू थुट्टे,** *शेतकरी*

## खून प्रकरणातील आरोपी पोलीसांच्या स्वाधीन

**बुलढाणा** : भिमजयंतीच्या रॅलीनंतर बाजारलाईन परिसरात चाकूने भोसकून एकाचा खून केल्याची घटना १४ एप्रीलच्या रात्री घडली होती. या प्रकरणातील फरार आरोपी शुक्रवारी स्वत:हून बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला हजर झाला. तीन दिवसांपासून फरार असलेल्या आरोपी सोनू वसंत जाधवने शुक्रवारी दुपारी पोलिस स्टेशनमध्ये आत्मसमर्पण केले आहे. आरोपीने वार्ड नं. २ मधील पप्पू जाधवला रॅली संपल्यानंतर डाव साधून भोकसले होते. त्यानंतर तो फरार झाला होता. त्याच्या शोधासाठी पोलिसांची विविध पथके विविध दिशेला रवाना झाली होती. अखेर शुक्रवारी त्याने शहर पोलिसांकडे आत्मसमर्पण केले. त्याच्या सोबत आनंद काकफळे हा सुद्धा होता.

दैनिक महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
पाहिजेत
पद :- जाहिरात व्यवस्थापक
दैनिक महाभूमि या अग्रगण्य वृत्तपत्रात जाहिरात विभागासाठी अनुभवी व कुशल जाहिरात व्यवस्थापक या पदासाठी उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.
पात्रता :- पदवीधर (मार्केटींग / मास कम्युनिकेशनास प्राधान्य)
अनुभव :- जाहिरात किंवा मार्केटींग क्षेत्रातील किमान 2-5 वर्ष अनुभव.
कौशल्य :- उत्तम संवाद कौशल्य, ग्राहक व्यवस्थापन व विक्री कौशल्य, संगणक ज्ञान आवश्यक.
जाहिरात मिळवणे व नियोजन करणे.
नविन ग्राहक तयार करणे.
महसुल वाढीसाठी प्रयत्न करणे.
टिम समन्वय ठेवणे.

वेतन :- आकर्षक पगार (योग्यतेनुसार)
अर्ज / बायोडाटा पाठवा - dainikmahabhoomi@gmail.com
संपर्क - 8960040019
- पत्ता -
दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा.

# महिला आरक्षणाचा कलगीतुरा!

लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर गुरूवारपासून प्रदीर्घ तास चर्चेला सुरुवात झाली. महिला आरक्षणासाठी घटनादुरुस्ती तसेच परिसीमनासाठी कायद्यात तरतूद करणारी विधेयके चर्चेसाठी सभागृहाला सादर करण्यात आली आहेत. भाजप आणि विरोधी पक्षांनी शुक्रवारी महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीचे राजकारण केल्याचा एकमेकांवर आरोप केला. सत्ताधारी पक्षाने या निर्णयाला "ऐतिहासिक" पाऊल म्हटले आहे, तर विरोधी पक्षांनी म्हटले आहे की, या कायद्यावर अधिसूचना जारी करण्याबाबत सरकार "झोपले" आहे. विरोधी पक्षांनी असाही आरोप केला आहे की, सरकार असंवैधानिक मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेला पुढे नेण्यासाठी महिला आरक्षणाचा वापर करत आहे. महिला आरक्षण कायदा, २०२३, गुरुवारी रात्री अधिसूचित करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, कारण त्याशिवाय त्यातील प्रस्तावित सुधारणा प्रभावी होणार नाहीत. घटनादुरुस्ती विधेयक कायदा बनले, परंतु सरकारने त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे ते घटनेचा भाग बनले नाही. जर कायदाच अंमलात नसेल, तर प्रस्तावित दुरुस्ती कशी लागू केली जाऊ शकते, त्यामुळे ती १६ एप्रिलपासून लागू करण्यात आली. २०२३ मध्ये मंजूर झालेला हा कायदा १६ एप्रिल रोजी अधिसूचित करण्यात आला, जेव्हा लोकसभेत सध्या त्याच कायद्यातील दुरुस्त्यांवर चर्चा सुरू आहे. भाजप खासदार दिनेश शर्मा यांनी विरोधकांवर निशाणा साधत, त्यांचा विरोध राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला. विरोधकांचा एकच अजेंडा आहे, आंदोलन करणे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करणे हाच त्यांचा एकमेव हेतू आहे. जिथपर्यंत मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रश्न आहे, ती साध्या बहुमताने मंजूर केली जाऊ शकते. ज्या प्रकारची घटनादुरुस्ती दाखवली जात आहे, तशी ही नाही. विरोधकांना आपली मते मांडण्याचे स्वातंत्र्य आहे, परंतु त्यांनी महिला आरक्षणाला पाठिंबा दिला पाहिजे. पक्षाचे खासदार शशांक मणी त्रिपाठी यांनी सरकारच्या या निर्णयाचे समर्थन केले आणि विलंब किंवा राजकीय हेतूचे आरोप फेटाळून लावले. विरोधकांचा किंवा काही दक्षिणी राज्यांचा विलंबाबद्दलचा युक्तिवाद पूर्णपणे खोटा आहे. त्रिपाठी म्हणाले, जनगणनेसारख्या कारणांमुळे याची तात्काळ अंमलबजावणी होऊ शकत नाही. २०२९ पर्यंत याची अंमलबजावणी करण्यासाठी एक योग्य प्रक्रिया अवलंबली गेली आहे. यात कोणतेही राजकारण नाही. काँग्रेसचे खासदार के.सी. वेणुगोपाल यांनी अधिसूचना जारी करण्यास झालेल्या विलंबाचा मुद्दा उपस्थित केला आणि हे सरकारच्या प्रामाणिकपणाच्या अभावाचा पुरावा असल्याचे म्हटले. महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये एकमताने मंजूर झाले होते, पण त्याची अधिसूचना काल रात्रीच जारी करण्यात आली. ते महिला सक्षमीकरणाबद्दल बोलतात, पण २०२३ मध्ये मंजूर झालेली घटनादुरुस्ती आता लागू झाली आहे. किमान जेव्हा तुम्ही घटनादुरुस्ती आणता, तेव्हा योग्य अधिसूचना जारी केली जाईल याची खात्री करणे ही सरकारची जबाबदारी असते. तुम्ही कोणत्या कायद्यात दुरुस्ती करत आहात? झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदार महुआ माजी यांनीही सरकारच्या या निर्णयाच्या वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महिला आरक्षणावरून सुरू असलेला हा कलगीतुरा थांबवून महिलांच्या हिताचा विचार करणे येथे जास्त गरजेचे आहे.

# थकबाकीच्या ओझ्याखाली शिक्षण

**विश्लेषण**
- जनार्दन पाटील

खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद हे सामाजिक समतेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. मात्र, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी राहिल्याने राज्य सरकारकडून शाळांना देय असलेला बराच निधी थकीत राहिला. परिणामी, अनेक खासगी शाळांनी 'आरटीई' अंतर्गत प्रवेशास नकार देत गरीब आणि वंचित मुलांचे शिक्षणच धोक्यात आणले आहे.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शाळांना सरकारकडून प्रत्येक विद्यार्थ्यामागे काही निश्चित रक्कम दिली जाते. ही रक्कम वेळेवर मिळाल्यास शाळांवर आर्थिक ताण येत नाही आणि त्या सामाजिक जबाबदारी सहज पार पाडू शकतात; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही भरपाई वेळेवर न मिळणे, अपुरी मिळणे कवा पूर्णपणे थकवली जाणे, हा गंभीर प्रश्न बनला आहे. अनेक राज्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची थकबाकी थकली आहे. महाराष्ट्रासारख्या देशातील सर्वात प्रगत राज्यांमध्ये तर खासगी शाळांची थकबाकी लक्षावधी रुपयांमध्ये गेली असून प्रसंगी शाळांनी प्रवेश न देण्याची भूमिका घेतली आहे. सरकारने कितीही दबाव आणला, तरी आता शाळा ऐकायला तयार नाहीत. पैसे न मिळाल्याने शाळांचे दैनंदिन व्यवस्थापन, शिक्षकांचे वेतन, पायाभूत सुविधा यावर थेट परिणाम होत आहे. खासगी शाळा या नफेखोर संस्था नसून त्यांच्यावरही खर्चाचे बंधन असते, हे सरकारने लक्षात घेणे आवश्यक आहे. या आर्थिक अडचणींमुळे अनेक शाळांनी उघडपणे कवा अप्रत्यक्षपणे 'आरटीई' प्रवेशाला विरोध सुरू केला आहे. काही शाळा प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण करतात, तर काही थेट 'जागा उपलब्ध नाही' असे कारण देतात. काही ठिकाणी पालकांना अतिरिक्त शुल्क भरण्यास भाग पाडले जाते. ते कायद्याच्या विरोधात आहे. शाळांच्या या भूमिकेमागे केवळ नकारात्मकता नाही, तर त्यांची आर्थिक असुरक्षिततादेखील आहे; परंतु या संघर्षात सर्वात मोठे नुकसान होते ते गरीब विद्यार्थ्यांचे.

अनेक पालकांना खासगी शाळांची फी परवडत नाही आणि सरकारी शाळांमध्ये गुणवत्ता, सुविधा कवा प्रवेश उपलब्ध नसल्यामुळे मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. यामुळे शैक्षणिक विषमता वाढते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील शिक्षणातील दरी अधिकच रुंदावते. शाळाबाह्य मुलांची संख्या वाढते. काही मुले शिक्षण सोडतात. मुलांमध्ये न्यूनगंड, आत्मविश्वासाची कमतरता निर्माण होते. शिक्षणाच्या अभावामुळे गरिबीचे चक्र कायम राहते. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावी होणे आवश्यक आहे. यासाठी



सरकारची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे; परंतु भरपाईची रक्कम थकवणे, प्रक्रिया गुंतागुंतीची ठेवणे आणि वेळेवर निधी न देणे, हे सर्व प्रशासनिक अपयशाचे लक्षण आहे. सरकारने याकडे केवळ आर्थिक भार म्हणून न पाहता, सामाजिक गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षणावर खर्च म्हणजे देशाच्या भविष्यातील गुंतवणूक आहे, हे धोरणात्मक स्तरावर स्वीकारले गेले पाहिजे. त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी काही ठोस उपाय आवश्यक आहेत. शाळांना देय असलेली सर्व रक्कम वेळेत देण्यासाठी पारदर्शक प्रणाली निर्माण करणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन आणि सरकार यांच्यात विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. म्हणूनच 'आरटीई' अंतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर कारवाई करावी लागेल. सरकारी शाळांची गुणवत्ता सुधारून पर्याय उपलब्ध करून द्यावा लागेल.

शिक्षण हक्क कायदा हा केवळ एक कायदा नाही, तर सामाजिक न्यायाचा पाया आहे; परंतु आज तोच आर्थिक दुर्लक्षामुळे ढासळताना दिसत आहे. सरकार, शाळा आणि समाज या तिन्ही घटकांनी आपली जबाबदारी ओळखून एकत्रित प्रयत्न केले, तरच शिक्षणाचा हक्क खऱ्या अर्थाने प्रत्येक मुलापर्यंत पोहोचू शकतो. अन्यथा, 'सर्वांसाठी शिक्षण' ही घोषणा केवळ घोषवाक्य राहील आणि हजारो मुलांचे भविष्य अंधारात जाईल. शिक्षण हक्क कायद्यानुसार, मुलांचा शाळा प्रवेश सुकर होण्यासाठी उपाययोजनांच्या दृष्टीने काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे. सर्वप्रथम, सरकारने वेळेवर निधी वितरित करण्याची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. यासाठी पारदर्शक आणि स्वयंचलित यंत्रणा विकसित करता येईल. त्यामुळे देयके देण्यात विलंब होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कठोर नियम बनवून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणेही आवश्यक आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही यशस्वी मॉडेल्सचा विचार करणे गरजेचे आहे. स्वीडन, नेदरलँड्स आणि चिली या देशांमध्ये व्हाउचर प्रणाली कवा 'वेटेड फंडग मॉडेल'द्वारे या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यात आला आहे. या पद्धतींमध्ये निधी थेट विद्यार्थ्यांशी जोडला जातो. त्यामुळे शाळांना वेळेवर पैसे मिळतात आणि पारदर्शकता टिकून राहते. भारतातही अशा पर्यायांवर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# कौतुकास्पद लवचिकता आणि वेग

**परामर्श**
- हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

आखाती युद्धामुळे हॉटेल्स, पर्यटन, हवाई सेवा, खत अशा सर्व व्यवसायांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. शेअर बाजार आणि कमॉडिटी मार्केट कोसळले असून, जागतिक आर्थिक वेगाला फटका बसला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षात रेपोदरात सव्वा टक्कयाने कपात केली. आता भाववाढीचे संकट असल्यमुळे रेपोदरात घट होण्याची प्रक्रिया थांबली आहे. जगाच्या तुलनेत भारतातील शेअर बाजारातील समभागांचे भाव जास्त आहेत. मात्र आता निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये झालेल्या घसरणीनंतर तशी परिस्थिती राहिलेली नाही.

दुसरीकडे, भारताचे उत्पादनक्षेत्र विकसित होत असून, मेक इन इंडिया आणि पीएलआय (प्रॉक्स लक्ड इन्सेंटिव्ह) योजनांमुळे इलेक्ट्रॉनिक्स औषधनिर्माण आणि वाहनक्षेत्रात मोठी वृद्धी झाली आहे. भारतीय उत्पादनक्षेत्राचा एकूण जीडीपीतील वाटा १७ टक्के आहे. तो २०२५ पर्यंत २५ टक्कयांवर नेण्याचे उद्दिष्ट होते. आता २०३० पर्यंत तरी हे लक्ष्य गाठावे, असे केंद्र सरकारने ठरवले आहे. हवामानबदलाच्या संकटामुळे शेती दिवसेंदिवस अधिक गर्तेत जात असून जास्तीत जास्त लोकांनी कारखानदारीकडे वळणे योग्य ठरणार आहे. याचा अर्थ शेतीची उपेक्षा करायची, असे बिलकुल नाही. परंतु शेतीवर आवश्यकतेपेक्षा जास्त लोक अवलंबून असून भारतात दरडोई शेतीचे सरासरी क्षेत्र अत्यल्प आहे. त्यामुळे त्यावर अख्ख्या कुटुंबाचा निर्वाह होऊ शकत नाही. म्हणूनच शेतीमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या लोकांना उद्योगात सामावून घेण्याची गरज आहे. भारतात मॅन्युफॅक्चरिग कवा उत्पादनक्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. परंतु त्या दिशेने पावले मात्र अवश्य पडत असून उद्योगधंद्यांना बळकटी देण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

२५८५ कोटी रुपयांच्या लघु जलविद्युत विकास योजनेलाही केंद्राने मंजुरी दिली आहे. १५०० मेगावॅट नवीकरणीय ऊर्जाक्षमतेच्या विकासाला चालना देणे, हा त्यामागील हेतू आहे. देशात ७१३३ ठिकाणी एकूण २१ हजार मेगावॅट क्षमतेच्या लघु जलविद्युत प्रकल्पांसाठी सिद्धता करण्यात आली आहे. याचा फायदा उद्योगधंद्यांनाच होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ३३६६० कोटी रुपयांच्या 'भारत औद्योगिक विकास योजने'चा शुभारंभ करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत देशभरात शंभर 'प्लग अँड प्ले' औद्योगिक पार्क विकसित केले जातील. हे पार्क म्हणजे अशी विकसित औद्योगिक क्षेत्रे असतील, जिथे कंपन्या कोणत्याही विशेष तयारीशिवाय त्वरित उत्पादन कवा कामकाज सुरू करू शकतात. या योजनेद्वारे अंदाजे १५ लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, अशी सरकारला अपेक्षा आहे. देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे, हा या महत्त्वाकांक्षी योजनेचा उद्देश स्वागतार्ह आहे. या योजनेंतर्गत शंभर ते एक हजार एकर क्षेत्रावर औद्योगिक पार्क विकसित केले जातील.

'प्लग अँड प्ले'ची व्यवस्था असल्यामुळे कारखाना स्थापन करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा रेडीमेड स्वरूपात उपलब्ध असतात. परिणामी, उत्पादन प्रक्रियेतूल विलंब टळतो आणि गुंतवणूकदारांचा वेळ आणि खर्च वाचतो. ही क्षेत्रे 'ईज ऑफ डुइंग बिझिनेस' वाढवण्यासाठी आणि 'आत्मनिर्भर भारत'च्या स्वप्नाला साकार करण्यासाठी विकसित केली जात आहेत. इंडस्ट्रियल पार्क म्हणजे कारखाने कवा गोदामे स्थापन करण्यासाठी नियोजित पद्धतीने विकसित केलेला एक सुसज्ज भागच असतो. बहुतेकदा हे पार्क रेल्वे, विमानतळ आणि बंदरांच्या जवळ असतात.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# वारसा म्हणजे संस्कृतीचा श्वास



- डॉ. राजेंद्र बगाटे
(समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक)



१८ एप्रिल हा दिवस 'जागतिक वारसा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि या दिवसाचे महत्त्व केवळ औपचारिक स्मरणापुरते मर्यादित न राहता, मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीतील सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक संपदेचे महत्त्व अधोरेखित करणारा एक चिंतनाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक ठरते. मानवी समाजाने हजारो वर्षांच्या कालखंडात निर्माण केलेल्या परंपरा, मूल्ये, स्थापत्यकला, कला, ज्ञानप्रणाली आणि सामाजिक संस्था यांचा एकत्रित संच म्हणजे वारसा होय. हा वारसा केवळ भूतकाळाचा अवशेष नसून वर्तमानातील ओळखीचा पाया आणि भविष्याच्या विकासाचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या मुळांशी पुन्हा जोडणारा, आपली ओळख दृढ करणारा आणि जतनाची जबाबदारी जाणवून देणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे.

वारसा या संकल्पनेचा व्यापक विचार केला असता, त्यात भौतिक आणि अमूर्त अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो. भौतिक वारशामध्ये किल्ले, मंदिरे, विहारे, स्मारके, गुहा, ऐतिहासिक वास्तू, पुरातत्त्वीय स्थळे, लेण्या आणि निसर्गसंपन्न क्षेत्रांचा समावेश होतो. या स्थळांमध्ये त्या त्या काळातील स्थापत्य कौशल्य, तांत्रिक प्रगती आणि सांस्कृतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. दुसरीकडे अमूर्त वारशामध्ये भाषा, लोक परंपरा, सण-उत्सव, लोककला, संगीत, नृत्य, जीवनशैली आणि श्रद्धा यांचा समावेश होतो. हे अमूर्त घटक समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतीक असतात आणि ते समाजाच्या मानसिकतेचे, विचारसरणीचे आणि जीवनमूल्यांचे दर्शन घडवतात. या दोन्ही प्रकारचा वारसा एकमेकांशी परस्परपूरक असून समाजाच्या ओळखीचा पाया तयार करतात.

भारतीय वारशाचा विचार केला तर त्याची व्याप्ती आणि वैविध्य हे जगातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत अधिक समृद्ध आहे. प्राचीन सिंधू संस्कृतीपासून सुरू झालेला हा प्रवास वैदिक, बौद्ध, जैन, मौर्य, गुप्त, चालुक्य, मुघल आणि मराठा अशा विविध कालखंडांतून पुढे सरकत आधुनिक भारतापर्यंत पोहोचतो. प्रत्येक कालखंडाने आपल्या संस्कृतीचे, कलेचे आणि विचारांचे वेगळे योगदान दिले आहे. भारतातील विविध धर्म, भाषा, जाती आणि परंपरा यांनी मिळून एक बहुरंगी सांस्कृतिक पट तयार केला आहे. त्यामुळे भारतातील वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची साधने नसून ती इतिहासाची साक्ष देणारी जिवंत कागदपत्रे आहेत.

महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर येथील वारसा हा अत्यंत प्रेरणादायी आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये उभे असलेले किल्ले हे स्वराज्याच्या संघर्षाचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले हे किल्ले आजही आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची प्रेरणा देतात. अजिंठा-वेरूळ लेण्यांतील शिल्पकला आणि भित्तिचित्रे प्राचीन भारतीय कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदाय, भजन-कीर्तन, लोकनृत्य आणि सण-उत्सव हे महाराष्ट्राच्या अमूर्त वारशाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व गोष्टी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीला आकार देतात आणि सामाजिक एकात्मता वाढवतात.

आजच्या आधुनिक युगात वारसा जतन करणे ही एक मोठी आव्हानात्मक जबाबदारी बनली आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाढते पर्यटन यामुळे अनेक वारसा स्थळांवर ताण निर्माण झाला आहे. अतिक्रमण, प्रदूषण, दुर्लक्ष आणि अनियंत्रित विकास यामुळे अनेक ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होत आहे. काही ठिकाणी तर वारसा स्थळांचे मूळ स्वरूपच नष्ट होत आहे. यामागे केवळ शासनाची कमतरता नसून समाजातील जागरूकतेचा अभावही कारणीभूत आहे. अनेकदा लोक वारसा स्थळांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने पाहतात आणि त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाकडे दुर्लक्ष करतात. वारसा जतनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सजग होणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच आपल्या वारशाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांच्या मनात जतनाची भावना निर्माण होते. इतिहासाचा अभ्यास केवळ पाठांतरापुरता मर्यादित न ठेवता, त्यामागील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजावून सांगणे आवश्यक आहे. शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारसा स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव दिल्यास त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध होते आणि त्यांच्या मनात वारशाबद्दल आदर निर्माण होतो. शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण झालेली ही जाणीव भविष्यात वारसा संवर्धनासाठी उपयुक्त ठरते.

तंत्रज्ञानाच्या युगात वारसा जतनासाठी नवीन साधने उपलब्ध झाली आहेत. डिजिटल दस्तऐवजीकरण, आभासी पर्यटन, त्रिमितीय प्रतिकृती आणि डिजिटल संग्रहालयांच्या माध्यमातून वारशाचे जतन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे जगभरातील लोकांना विविध वारसा स्थळांची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तसेच आपत्तीच्या काळात या डिजिटल नोंदींचा उपयोग वारसा पुनर्स्थापनासाठी होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वारसा जतनाची प्रक्रिया अधिक सक्षम करता येते.

पर्यटन आणि वारसा यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. वारसा स्थळांमुळे पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. परंतु अनियंत्रित पर्यटनामुळे वारसा स्थळांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाश्वत पर्यटनाची संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागून वारसा स्थळांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवून पर्यटन व्यवस्थापन अधिक प्रभावी करता येते.

आपल्या दैनंदिन जीवनातही आपण वारसा जतनासाठी योगदान देऊ शकतो. घरातील परंपरा जपणे, स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे, वारसा स्थळांवर स्वच्छता राखणे आणि त्यांचे संरक्षण करणे या छोट्या कृतीतून मोठा बदल घडवून आणता येतो. समाजातील प्रत्येक घटकाने या कार्यात सहभागी झाल्यास वारसा जतनाची प्रक्रिया अधिक प्रभावी होईल.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# केरळमध्ये पारंपरिक आघाड्यांमध्येच लढत

**राज्यरंग**
- राही भिडे, ज्येष्ठ पत्रकार

केरळमधील आगामी विधानसभा निवडणूक केवळ सत्तांतराची लढाई नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीची, मतदारांच्या बदलत्या मनोवृत्तीची आणि तिसऱ्या शक्तीच्या वाढत्या महत्त्वाची गुंतागुंतीची परीक्षा ठरणार आहे. निवडणुकीत डावी आघाडी आणि काँग्रेसप्रणीत 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' मध्ये मुख्य संघर्ष असला, तरी तिसऱ्या पर्यायाच्या रूपाने भारतीय जनता पक्षदेखील आपली उपस्थिती ठळकपणे दाखवून देत आहे. केरळमध्ये सध्या एलडीएफ ही डाव्यांची आघाडी सत्तेवर आहे. त्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा प्रमुख पक्ष आहे. ही आघाडी सलग दुसऱ्या कार्यकाळात सत्तेत आहे.

परंपरेने केरळमध्ये प्रत्येक निवडणुकीनंतर सत्तांतर होत आले आहे; मात्र २०२१ मध्ये 'एलडीएफ'ने ही परंपरा मोडत पुन्हा सत्ता मिळवली. या पार्श्वभूमीवर या वेळी सलग तिसऱ्यांदा एलडीएफ सत्तेत येऊन हॅट्रिक करणार का, हा चर्चेचा केंद्रबदू ठरला आहे. 'एलडीएफ' सरकारच्या कामगिरीकडे पाहिले तर सामाजिक कल्याण योजना, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा आणि शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक यांचा उल्लेख करावा लागेल. विशेषतः कोविडकाळातील व्यवस्थापनामुळे सरकारची प्रतिमा मजबूत झाली; मात्र याचबरोबर आर्थिक तुटीचा वाढता बोजा, बेरोजगारी आणि काही भ्रष्टाचाराच्या आरोपांनी विरोधकांना सरकारवर टीका करण्याची संधी दिली आहे. विरोधी आघाडीतील काँग्रेसची स्थिती मात्र काहीशी विस्कळीत दिसते. काँग्रेस ही 'यूडीएफ'चा मुख्य आधार असला, तरी अंतर्गत मतभेद, नेतृत्वातील अस्पष्टता आणि सातत्यपूर्ण रणनीतीचा अभाव यामुळे पक्षाला अपेक्षित गती मिळालेली नाही. काही भागांमध्ये काँग्रेसचे पारंपरिक मतदार अजूनही पक्षाशी निष्ठावान असले, तरी राज्यव्यापी पातळीवर प्रभावी लाट निर्माण करण्यात पक्षाला अडचणी येत आहेत. काँग्रेस सत्तेत येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही; मात्र ती आव्हानात्मक आहे.

केरळमधील निवडणुकीचा निकाल बहुधा 'स्विंग' मतदारसंघांवर अवलंबून असतो.



काँग्रेसला या मतदारसंघांमध्ये निर्णायक आघाडी मिळवता आली, तर सत्तांतर शक्य आहे; परंतु 'एलडीएफ' कडे असलेली मजबूत संघटनात्मक रचना आणि स्थिर मतदारवर्ग काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे करतो. केरळमधील पारंपरिक संघर्षात भाजपचा वाढता शिरकाव हा एक महत्त्वाचा घटक आहे. भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये केरळमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. विधानसभा पातळीवर मोठे यश मिळाले नसले, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपने काही ठिकाणी लक्षणीय कामगिरी केली आहे.

ग्रामपंचायत, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांमध्ये मिळालेल्या जागांमुळे पक्षाला स्थानिक स्तरावर पाय रोवण्यास मदत झाली आहे. या वाढत्या उपस्थितीमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकालीन कामही महत्त्वाचे मानले जाते. संघाने सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक पातळीवर केलेले कार्य भाजपसाठी आधारभूत ठरले आहे. कार्यकर्त्यांचे जाळे, शाखांची उपस्थिती आणि स्थानिक मुद्द्यांवर सातत्याने केलेले काम यामुळे भाजपला काही प्रमाणात सामाजिक स्वीकार मिळू लागला आहे. केरळमधील राजकीय वास्तव अद्याप द्विध्रुवीय आहे. 'एलडीएफ' आणि 'यूडीएफ' या दोन आघाड्यांमधील संघर्षात भाजपला निर्णायक तिसरी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी अजून वेळ लागेल, असे अनेक विश्लेषक मानतात, तरीही भाजपची उपस्थिती ही दोन्ही आघाड्यांसाठी 'स्पॉइलर' ठरू शकते. चुरशीच्या लढतीत भाजपचे मतविभाजन दोन्ही आघाड्यांसाठी त्रासदायक ठरू शकते. आगामी निवडणुकीकडे पाहता, काही महत्त्वाचे घटक निर्णायक ठरणार आहेत. त्यात सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजी किती प्रभावी आहे, काँग्रेसला संघटित आणि आक्रमक रणनीती राबवता येते का आणि भाजप कितपत मतविभाजन करू शकतो, हे पहावे लागणार आहे.

दक्षिण केरळमधील अंदाज येऊ न शकणारे मतदारसंघ आणि तरुण मतदारांचा कल निकालावर प्रभाव टाकू शकतो. विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे या राज्याच्या राजकारणातील सूक्ष्म प्रवाह अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. परंपरेने उच्च राजकीय जाणीव, साक्षरता आणि सामाजिक भान यासाठी ओळखल्या जाणाऱ्या केरळमध्ये निवडणूक ही केवळ पक्षांमधील लढाई नसते, तर समाजातील विविध घटक, त्यांच्या अपेक्षा आणि बदलत्या प्राधान्यक्रमांची एकत्रित अभिव्यक्ती असते. या निवडणुकीत चएचेत आलेल्या प्रमुख प्रश्नांकडे पाहता सर्वप्रथम आर्थिक स्थिती आणि बेरोजगारी हे मुद्दे समोर येतात. राज्याची आर्थिक तूट, वाढते कर्ज आणि मर्यादित औद्योगिक वाढ यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता आहे.

'यूडीएफ' रोजगारनिर्मिती, उद्योगांना प्रोत्साहन आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर भर देत आहे. भाजप राज्यात अधिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि केंद्र-राज्य समन्वयातून विकासाचे आश्वासन देत आहे. मतदारांचा विचार मात्र केवळ आश्वासनांवर मर्यादित नाही. केरळमधील मतदार पारंपरिकदृष्ट्या जागरूक असून ते स्थानिक उमेदवाराची प्रतिमा, त्याची उपलब्धता आणि कामगिरी यालाही तितकेच महत्त्व देतात. 'पार्टी लाइन'सोबतच 'लोकल फॅक्टर' हा निकाल ठरवणारा महत्त्वाचा घटक ठरतो. केरळमध्ये तो इतर अनेक राज्यांपेक्षा वेगळ्या पद्धतीने दिसतो. येथे हदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन असे मोठे धार्मिक गट आहेत. राज्यात अंदाजे ५५ टक्के हदू, २७ टक्के मुस्लिम आणि १८ टक्के ख्रिश्चन लोकसंख्या आहे. 'इंडियन नॅशनल युनियन मुस्लिम लीग'चा मुस्लिम मतदारांमध्ये प्रभावी आहे, तर ख्रिश्चन समुदायाचा कल अनेकदा 'यूडीएफ'कडे झुकलेला दिसतो. हदू मतदारांमध्ये विविध जातीय विभागणी असून त्यांचा कल वेगवेगळ्या पक्षांमध्ये विभागलेला असतो. तथापि, केरळमध्ये धर्म आणि जात हे निर्णायक असले, तरी ते 'एकमेव' घटक नाहीत. शिक्षण, सामाजिक जागरूकता आणि राजकीय परंपरेमुळे मतदार अनेकदा मुद्द्यांवर आधारित मतदान करतात. त्यामुळेच येथे सत्तांतराची परंपरा दीर्घकाळ टिकून राहिली आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27**

दैनिक महाभूमि

छत्रपती

# संभाजीनगर भूमि

शनिवार १८ एप्रिल २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### नाचण्यावरून वाद; तरुणावर चाकूहल्ला

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत नाचताना झालेल्या वादातून एकावर चाकूहल्ला कलल्याची घटना सिटीचौक परिसरात घडली. याप्रकरणी सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्यन सचिन भालेराव, कार्तीक सचिन भालेराव, आर्यन इंगळे रा. शताब्दीनगर अशी आरापींची नावे आहेत. रोहित अनिल पेटारे रा. शताब्दीनगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १४ एप्रिल रोजी रात्री साडे अकर वाजेच्या सुमारास नाचण्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीच्या छातीत चाकू मारला. पुढील तपास सिटीचौक पोलिस करीत आहेत.

### घरफोडीत एक लाखाचा ऐवज लंपास



**छत्रपती संभाजीनगर :** दौलताबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पोटूळगाव येथे चोरट्यांनी घरफोडी करीत एक लाख रूपये रोख लंपास केले. याप्रकरणी दौलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तू मच्छिंद्र कापसे रा. पोटूळगाव ता. गंगापूर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १५ एप्रिल रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी घराच्या शेडमध्ये प्रवेश करीत एक लाख रूपये रक्कम लंपास केली. पुढील तपास दौलताबाद पोलिस करीत आहेत.

### एक लाखांसाठी विवाहितेचा छळ

**छत्रपती संभाजीनगर :** स्कुटी घेण्यासाठी आई-वडीलांकडून एक लाख रूपये घेऊन ये म्हणत विवाहितेला घराबाहेर काढल्याची घटना हर्सूल परिसरात घडली. याप्रकरणी हर्सूल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती आदित्य शिरसाठ, सासरे संजय शिरसाठ, सासू सुशिला शिरसाठ, नणंद नेहा शिरसाठ रा. कैलास नगर गल्ली नं. १ अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार २०२४ ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान आरोपींनी संगनमत करून घरगुती कारणावरून विवाहितेचा छळ केला. आई वडीलांकडून एक लाख रूपये आण म्हणत मारहाण केली व घराबाहेर काढून दिले.

---

## जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे आढावा बैठकीत निर्देश

# खतांचा साठा, विक्री नियंत्रणासाठी ‘टास्क फोर्स’ तयार करा

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**



जिल्ह्यामध्ये आवश्यक युरिया खताचा साठा उपलब्ध करण्याबाबतचे नियोजन करण्याबरोबरच प्रमाणापेक्षा जास्त खताची खरेदी तसेच बेकायदेशीर विक्री होत असलेल्या दुकानदार आणि ग्राहक यांची तपासणी करावी, दोषी आढळणाऱ्या साठेबाज यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय खतसाठा सनियंत्रण समितीचे अध्यक्ष विनय गौडा जी .सी. यांनी शुक्रवार, १७ एप्रिल रोजी आढावा बैठकीत दिले.

जिल्हास्तरीय खतसाठा सनियंत्रण समितीच्या आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील. उपविभागीय कृषी अधिकारी आघाव, विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळाचे रवींद्र पाटील, जिल्हा विपणन अधिकारी राठोड, जिल्हा कृषि निविष्ठा महासंघाचे अध्यक्ष प्रकाश मुथा यांच्यासह विविध खत कंपन्यांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते. शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम २०२५-२६ मधील खताची मागणी, आवंठण, विक्री याबाबतचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. यामध्ये युरिया, डी.ए पी, एम.ओ पी, संयुक्त खते, एस.एस.पी अशा विविध प्रकारच्या खतांची उपलब्धता मागणी आणि कृषी आयुक्तांकडून मंजूर आवंठण याबाबतचा आढावा त्यांनी घेतला .जिल्ह्याला आवश्यक असणाऱ्या खत, युरिया खतसाठा बाबत प्रमाणापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी खतसाठा केला असेल किंवा त्याची विक्री दुकानदाराने केले असेल तर याची तपासणी करून संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा खतसाठा नियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यातील युरियाचा बफर्स साठा दहा हजार ५५० मेट्रिक टन असून डीएपी खताचा साठा १२०० मेट्रिक टन संरक्षित करण्यात आलेला आहे.

शेतकरी धारण करत असलेल्या शेतीक्षेत्राच्या आवश्यकते पेक्षा जास्त अधिक खतसाठा खरेदी होत असेल किंवा एकाच व्यक्तीच्या नावावर अधिक प्रमाणात खतविक्री होत असेल अशा दुकानदार, विक्रेते यांची तपासणी करण्यासाठी टास्क फोर्स निर्माण करावा. तपासणीअंति दोषी आढळणाऱ्या साठेबाज व्यक्ती आणि दुकानदारांवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी यांनी दिले. तपासणी करत असताना कृषी विभागाने पोलीस प्रशासनाचे सहकार्य घ्यावे. दोषी आढळणाऱ्या दुकानदारांचा परवाना रद्द करण्याबरोबरच खतांच्या विक्रीवर प्रतिबंध करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या यादीनुसार त्यांनी खरेदी केलेले खताची खातरजमा टास्कफोर्स मार्फत करण्यात यावी .तालुका निहाय विविध खतांची उपलब्धता आणि वितरण यांचे नियोजन याबाबत जिल्हाधिकारी गौडा यांनी आढावा घेतला.

### जिल्ह्यातील कृषी उत्पादन, विकासाचा घेतला आढावा

■ छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात असणाऱ्या प्रमुख पीक पद्धती, फळ पीक भाजीपाला, निर्यात होणारे उत्पादने याबरोबरच जिल्ह्यात न लागवडीखालील क्षेत्र व त्या अनुषंगाने कृषी विभागाने केलेल्या नियोजनाचा आढावा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी घेतला. कापूस, मोसंबी, ऊस, सोयाबीन, या पिकाच्या उत्पादनासंदर्भातील क्षेत्रनिहाय माहिती घेतली तसेच जिल्ह्यामध्ये आवश्यक असणारा खतं आणि बी बियाणे यांच्या मागणीनुसार पुरवठा साठी केलेल्या नियोजनाबाबत आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

---

## नूतन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्वीकारला पदभार



**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**

नूतन विभागीय आयुक्त म्हणून जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून शुक्रवार, १७ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला. यावेळी पापळकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., अप्पर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अप्पर आयुक्त प्रताप काळे, अप्पर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, अप्पर आयुक्त दादासाहेब वानखेडे, अप्पर आयुक्त सुषमा देसाई, अप्पर आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त राजेश काटकर, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, सहआयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त सविता हरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविसकर, उपमहानगर नियोजनकार रवींद्र जायभाये, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे, उप मुख्य लेखाधिकारी साधना बांगर आदींची उपस्थिती होती. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत मराठवाड्यातील शेती, टंचाईस्थिती तसेच सामाजिक विषय व प्रशासकीय विषयाबाबत माहिती जाणून घेतली. सर्वांनी समन्वयाने काम करून विकास साधूया, असे आवाहन त्यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर विभाग हा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विभाग असून, पर्यटन विकासाला चालना देतानाच शिक्षण, आरोग्य, महत्वपूर्ण उपक्रम व रोजगाराभिमुखतेवर भर देण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच विभागाला सर्वांगिण विकासाच्या दिशेने नेऊन राज्यात अग्रस्थानी आणण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासोबतच कामकाजात तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून ई-ऑफिस प्रणालीचा १०० टक्के अवलंब करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासकीय कामकाजात अंतर्गत समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

---

## सामाईक रस्ता, मातीच्या वादातून दोन गटात हाणामारी

### सोलेगाव येथील घटना, नऊ जणांवर गुन्हे दाखल

**गंगापूर / प्रतिनिधी**

सामाईक शेतरस्ता आणि बांधावरील माती हटविण्याच्या कारणावरुन दोन गटात वाद होवून फ्रि-स्टाईल हाणामारी झाल्याची घटना गुरुवार, १६ एप्रिल रोजी घडली. ही घटना गंगापूर तालुक्यातील सोलेगाव येथे घडली असून या प्रकरणी नऊ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे सोलेगाव परिसरात एकच खळबळ उडाली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमनाथ रमेश उमाप यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सोलेगाव शिवारातील गट नं. ८९ मधील शेतीकडे जाणाऱ्या सामाईक रस्त्यावरून गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होता. गुरुवारी सकाळी हा वाद चिघळला आणि आरोपींनी शिवीगाळ करत हाणामारी केली. यावेळी सोमनाथ कचरु उमाप याने कुऱ्हाडीने हल्ला करून सोमनाथ रमेश उमाप यांना जखमी केले, तर इतरांनी काठ्यांनी मनोहर उमाप यांना मारहाण केली. जखमींवर गंगापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी सोमनाथ कचरु उमाप, ईश्वर कचरु उमाप, दावेद ईश्वर उमाप, विशाल ईश्वर उमाप, किशोर कचरु उमाप यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दुसऱ्या गटातील सोमनाथ कचरु उमाप यांनीही फिर्याद देत सांगितले की, गुरुवारी सकाळी गट नं. ९० मधील शेताच्या बांधावरील माती जेसीबी व ट्रॅक्टरद्वारे उकरली जात असल्याच्या कारणावरून वाद झाला. विचारणा केल्यावर आरोपींनी शिवीगाळ करत केलेल्या हल्ल्यात किशोर उमाप हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तसेच संगिता उमाप यांनाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी रमेश उत्तम उमाप, शिवाजी उत्तम उमाप, मनोहर उत्तम उमाप आणि सोमनाथ रमेश उमाप यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलेगाव परिसरातील तणाव पाहता पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला असून पोलिस अंमलदार मनोज घोडके पुढील तपास करत आहेत.

---

## अंबिकानगरात तरूणावर चाकू हल्ला



**छत्रपती संभाजीनगर :** मुकूंदवाडी परिसरातील अंबिकानगरात एकावर चाकूहल्ला झाल्याची घटना १४ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी मुकूंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रियाण पठाण व त्याचे दोन साथीदार अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी रवी रतन जाधव रा. अंबिकानगर गल्ली नं. ३ मुकूंदवाडी यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १४ एप्रिल रोजी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास अंबिकानगरात मिरवणूक सुरू असताना फिर्यादींचा लहान भाऊ मिरवणुकीत असताना धक्का लागल्याच्या कारणावरून रियान पठाण व त्याच्या दोन साथीदारांनी वाद करीत चाकूने बरगडीवर वार केला. बचावासाठी पळत असताना आरोपींनी पाठलाग केला व पाठीत वार केला.

---

## अवैध कत्तलखान्यांवर प्रशासनाची ‘बुलडोझर’ कारवाई

**खुलताबाद / प्रतिनिधी**



शहरातील धर्मातलाव परिसरातील अवैध कत्तलखान्यांवर प्रशासनाने गुरुवार, १६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास बुलडोझर चालवून ते जमीनदोस्त केले. नगर परिषदेच्या जागेचा निवासी कारणासाठी वापर करण्याचे सांगून त्या ठिकाणी अवैध कत्तलखाने चालवले जात असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी उपविभागीय पोलिस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांनी या भागात गोवंशप्रकरणी मोठी कारवाई केली होती. या पार्श्वभूमीवर, खुलताबाद नगर परिषदेने १३ एप्रिल रोजी मुजाहिद कुरेशी आणि एजान कुरेशी यांना संबंधित शेड हटविण्याची अंतिम नोटीस बजावली होती. मात्र, मुदत संपल्यानंतरही अतिक्रमण न हटविल्याने प्रशासनाने आज सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास धडक मोहीम राबवली. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उपविभागीय पोलिस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, तहसीलदार संतोष गुट्टे, मुख्याधिकारी समीर शेख व पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या उपस्थितीत पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. न. प.च्या जागेवर भाडेतत्त्वावर राहण्यासाठी घेऊन तिथे अवैध कत्तलखाना चालवणे आणि गोवंश हत्या करणे हे कायद्याचे उल्लंघन आहे, म्हणूनच ही कारवाई करण्यात आली, असे गोरड यांनी यावेळी सांगितले.

---

## तीन शेतवस्त्यांवर चोरट्यांचा धुमाकूळ; वृद्ध महिलेचे दागिने ओरबाडले

**लासूर स्टेशन / प्रतिनिधी**




गंगापूर तालुक्यातील शिल्लेगावसह अकोली वाडगाव आणि नरहरी रांजणगाव या तीन गावांतील शेतवस्त्यांवर गुरुवारी पहाटे दोन चोरट्यांनी महिलांवर हल्ला करून त्यांच्या अंगावरील दागिने ओरबाडून नेले. यात एकूण सुमारे १ लाख ४० हजार रुपयांहून अधिकचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे.

शिल्लेगाव येथील गणेश माणिकराव बोऱ्हाडे यांच्या शेतवस्तीवर दोन अज्ञात चोरट्यांनी गुरुवार, १६ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास घरात प्रवेश केला.

त्यानंतर गणेश यांच्या झोपलेल्या आई यमुनाबाई यांच्या कानातील टाप्स कात्रीने कापून नेले, ज्यात त्यांच्या कानाला गंभीर दुखापत झाली. तसेच, गणेश यांच्या पत्नी लता यांच्या गळ्यातील मणी मंगळसूत्र तोडून चोरटे पसार झाले. आरडाओरडा झाल्यामुळे शेजाऱ्यांनी धाव घेतली, मात्र अंधाराचा फायदा घेऊन चोरटे पळून गेले.

याच रात्री चोरट्यांनी अकोली वाडगाव येथील नंदू भागचंद टाके आणि नरहरी रांजणगाव येथील जनार्धन जगन्नाथ थोरात यांच्या शेतवस्त्यांवरही हात साफ केला. या ठिकाणाहून नेमका किती मुद्देमाल चोरीला गेला याची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. याबाबत गणेश बोऱ्हाडे यांच्या फिर्यादीवरून शिल्लेगाव पोलिस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी सुरू करा

### सरपंच शिवम जाधव यांची पंचायत समिती सभापतींकडे मागणी

**लासूर स्टेशन / प्रतिनिधी**



गंगापूर पंचायत समिती कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना डिजिटल बायोमेट्रिक हजेरी तात्काळ सुरु करण्यात यावी अशी मागणी वजनापूर शेकटा गावचे सरपंच शिवम जाधव यांनी निवेदनाद्वार पंचायत समिती सभापती कविता रविंद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

गंगापूर पंचायत समिती कार्यालयात गेल्या काही दिवसापासून अधिकारी व कर्मचारी उशिराने येण्याचे प्रमाण वाढले आहे. अधिकारी व कर्मचारी वेळेवर येत नसल्याने नागरिकांना शासकीय कामासाठी ताटकळत बसावे लागते. तसेच यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामासाठी अनावश्यक विलंब सहन करावा लागत असल्याने त्यांची गैरसाये होत आहे. पंचायत समिती कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हजेरीची अचूक नोंदणी होत नसल्याने कार्यालयीन शिस्तीवर परिणाम होत आहे. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी सुरु करुन ती सक्तीची करण्यात यावी अशी मागणी सरपंच शिवम जाधव यांनी सभापती कविता चव्हाण यांच्याकडे केली आहे.

---

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.

डॉ.ए.एच.शेख

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9021111549 / 7020614645

www.drshaikhah.com

---

## परशुराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

# समर्थनगरपासून निघणार परशुराम जन्मोत्सव शोभायात्रा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

भगवान विष्णूचे सहावे अवतार भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव रविवार, १९ एप्रिल रोजी साजरा होणार आहे. याचे मुख्य आकर्षण असते ती शोभायात्रा. या शोभायात्रा मार्गात बदल करण्यात आला आहे. यंदाच्या वर्षापासून समर्थनगरातील समर्थ राम मंदिरापासून शोभायात्रेला सुरुवात होणार आहे व औरंगपुरा चौकातील परशुराम स्तंभ येथे सांगता होणार आहे.

यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत जन्मोत्सव समितीचे प्रकल्प प्रमुख यांनी सांगितले की, ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या ३५ संघटना मिळून ब्राह्मण समाज समन्वय समिती अंतर्गत भगवंतांचा जन्मोत्सव साजरा करीत आहेत. रविवारी सकाळी आठ वाजता परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांच्या हस्ते औरंगपुरातील भगवान परशुराम स्तंभाचे पूजन होईल. सकाळी साडेआठला औरंगपुरा येथून दुचाकी रॅली काढण्यात येणार आहे.

राजस्थानी मित्र मंडळ, विप्र फाऊंडेशनच्यावतीने समर्थनगर राम मंदिर येथे सकाळी दहा वाजता भगवंताचे प्रतिमापूजन व महाआरती आणि आरोग्य व रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजता आद्यगौड विप्र समाजाच्यावतीने भगवान परशुराम जन्मोत्सव सजीव देखावा करणार आहे.

रविवारी सायंकाळी सहा वाजता मुख्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात गोपाळपूर येथील शक्तिपीठाच्या माई महाराज व वेरूळ येथील क्षेत्र नाथ



आश्रम येथील योगिनी अक्का महाराज यांची विशेष उपस्थिती असणार आहे. यात तीन ढोलपथक, बँडपथक व बालवारकऱ्यांचे पथक सहभागी होणार आहे. या शोभायात्रेत

सर्वसमाजबांधवांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन सहप्रकल्प प्रमुख दत्तात्रेय पिंपळे, प्रवीण जोशी, संदीप कुलकर्णी, अखिलेश त्रिवेदी, सायली पिल्ले यांनी केले. यावेळी आनंद तांदुळवाडीकर, सुधीर नाईक, धनंजय पांडे, सुरेश देशपांडे, अनिल मुळे, अनिल खंडाळकर, माणिक रत्नपारखी, आदी पदाधिकारी हजर होते.

### क्रांती चौकात ब्रह्मवृंद आज करणार शांतीपाठ

■ ब्राह्मण समन्वय समितीचे अध्यक्ष मिलिंद दामोदरे यांनी सांगितले की, विश्वशांतीसाठी, देशाच्या भरभराटीसाठी, सामाजिक एकोपा वाढविण्याकरिता परशुराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून शनिवार, १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेदरम्यान चारवेदाचार्य शांतीपाठ करणार आहेत.

---

## पिंपळदरी येथे चोरट्यांचा धुमाकूळ

**गोळेगाव / प्रतिनिधी**

सिल्लोड तालुक्यातील पिंपळदरी शिवारात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत तीन ते चार ठिकाणी चोऱ्या केल्या. चोरट्यांनी जिल्हा परिषद शाळेतून विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शालेय पोषण आहारावरही डल्ला मारला. याप्रकरणी चोरट्याविरुध्द अजिंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून चोरीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिकात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पिंपळदरी येथील जिल्हा परिषद शाळेतून विद्यार्थ्यांसाठी असलेला पोषण आहार व तेल चोरट्यांनी लंपास केला. तसेच शेतकरी सुदाम नरवडे यांच्या शेतातील बखारीतून सुमारे १६ पोती सोयाबीन, ७ पोती हरभरे आणि ३० लिटर डिझेल चोरुन नेले.

त्याचप्रमाणे चोरट्यांनी शिवाजी लोखंडे यांच्या घरासमोरील विद्युत मोटरही चोरून नेली. एकाच रात्रीत घडलेल्या चोरीच्या या घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांतून करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दिलीप तडवी, रवींद्र बागुलकर पुढील तपास करत आहेत.

---

### जाहिर प्रगटन

**श्री. प्रतिक कृष्णा गाधेकर रा. वाहेगाव ता. गंगापुर**

**विषय :- जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अर्ज**

ज्यानुसार, अर्जदार **श्री. प्रतिक कृष्णा गाधेकर रा. वाहेगाव ता. गंगापुर** यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की त्यांचा मुलगा नामे **श्री. देवांश प्रतीक गाधेकर रा. वाहेगाव ता. गंगापुर याचा दि. ११/१०/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्नालय गंगापुर** येथे झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अन्वये अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की **श्री. प्रतिक कृष्णा गाधेकर रा. वाहेगाव ता. गंगापुर** त्यांचा **श्री. देवांश प्रतीक गाधेकर रा. वाहेगाव ता. गंगापुर याचा दि. ११/१०/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्नालय गंगापुर** येथे झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा, मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

दिनांक : १५/०४/२०२६

स्थळ :- गंगापुर

शिक्का

स्वाक्षरीत/-

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी गंगापुर.**

## न्यूज ब्रीफ

### तापमान वाढतेय; आरोग्य जपा

**परभणी :** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात झपाट्याने वाढ होत असून, उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी व दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन बुधवार, १५ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी चव्हाण यांनी केले आहे. संजयसिंह जिल्हा कचेरीत आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत उष्माघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर आदींची उपस्थिती होती.

### प्रेस मशीनवर काम करताना मजूर जखमी

**वाळूज महानगर :** एमआयडीसी वाळूजमध्ये कंपनीत प्रेस मशीनवर काम करताना एक मजूर जखमी झाल्याची घटना घडली. मजुराला प्रशिक्षण व सुरक्षा साधने दिली नसल्याने याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संभाजी माधवराव वानखेडे (४१ वर्ष), रा. पळसगाव, ता. उमरी, जि. नांदेड, सध्या रा. शांतीनगर, रांजणगाव शेंणपुंजी यांच्या फिर्यादीनुसार आरोपी आनंद परिदा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २३ फेब्रुवारी रोजी दुपारी नरसिंग ऑटो, एम सेक्टर, जोगेश्वरी परिसरात घडली. या प्रकरणी बुधवारी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपघातात तरुणाचा मृत्यू

**वाळूज महानगर :** भरधाव दुचाकी डिव्हायडरला धडकून १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना विटावा फाटा येथे घडली. या प्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी मोसीन सुलतान शेख (२५ वर्ष), रा. नांदेडा यांच्या तक्रारीवरून आरोपी रिजवान अकबर शहा (१९ वर्ष, रा. जोगेश्वरी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात शनिवार, ११ एप्रिल रोजी सायंकाळी विटावा फाटा येथे झाला. रिजवान शहा हा फिर्यादी यांच्या मालकीची (एमएच २० जीएक्स ८७२५) दुचाकी भरधाव चालवत होता.

### अडीच लाखांचे दागिने लंपास

**छत्रपती संभाजीनगर :** गर्दीचा फायदा घेत मंगळसुत्र चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील २ लाख ३२ हजार रूपये किंमतीचे दागिने लंपास केले. ही घटना मंगळवार, १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीदरम्यान घडली. याप्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुजा जितेंद्र आढाव, रा. सावित्रीनगर चिकलठाणा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १४ एप्रिल रोजी रात्री ९ ते साडे दहा वाजेच्या दरम्यान चोरट्यांनी महिलेच्या व इतर महिलांच्या गळ्यातील मंगळसुत्र, सोन्याचे गंठण आदी २ लाख ३२ हजारांचे दागिने लंपास केले.

### संचालकपदी हारदे, काळे, शेख

**गंगापूर :** तालुका शिक्षक पतसंस्थेच्या रिक्त संचालक पदांची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. यामध्ये कडूबा हारदे यांची 'तज्ज्ञ संचालक' म्हणून, तर शिवाजी काळे व अल्ताफ शेख यांची 'कार्यलक्षी संचालक' म्हणून संचालक मंडळाने नुकतीच एकमताने निवड केली आहे. यावेळी शिक्षक संघाचे राज्य कोषाध्यक्ष मधुकर वालतुरे, चेअरमन सतीश कबाडे, व्हाइस चेअरमन विनोद डिके, सचिव नारायण कोकरे, सचिन वालतुरे, राजेश हिवाळे, जे. के. चव्हाण, अंकुश जाधव, प्रदीप जाधव, संदीप शिरकुले आदींची उपस्थिती होती.

---

### विहिर तातडीने बुजविण्याची मागणी, प्रशासनाचे दुर्लक्ष

# सोयगाव ते शेंदुर्णी रस्त्यालगत विहिर; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

दत्तात्रय काटोले



**सोयगाव :** जळगाव महामार्गावरील सोयगाव ते शेंदुर्णी रस्त्यावर कठड्याविना असलेली विहिर नागरिकांसाठी धोकादायक ठरत असून या रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विहिरीभोवती कठाडे नसून विहिर जमिनीच्या लेवलला आहे. विहिरीभोवती कोणतीही संरक्षक व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

राज्यात यापूर्वी अशा प्रकारच्या दुर्घटना घडल्या असून, निष्काळजीपणामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. नुकत्याच नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात भरधाव कार थेट विहीरीत कोसळून नऊ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. तसेच सिल्लोड तालुक्यात २३ जून २०११ रोजी बनकिन्होळा परिसरात एसटी बस विहिरीत कोसळून २३ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या घटनांमुळे रस्त्यालगतच्या उघड्या विहिरींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शेंदुर्णी हे मोठे बाजारपेठ केंद्र असल्याने या मार्गावर नेहमीच मोठी वाहतूक असते. सोयगाव येथून दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी या मार्गाने प्रवास करतात. खान्देश व मराठवाडा जोडणारा हा महत्त्वाचा शॉर्टकट रस्ता असल्याने खासगी व पर्यटकांच्या वाहनांचीही या रस्त्यावर मोठी वदर्ळ असते.

दरम्यान, शेंदुर्णी येथील ग्रामस्थांच्या मते, या ठिकाणी महिन्यातून एक-दोन किरकोळ अपघात घडत असतात. चार ते पाच दिवसांपूर्वी दोन दुचाकी समोरासमोर धडकल्यानंतर एक मोटरसायकल थेट विहिरीच्या कडेला जाऊन थांबली होती. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. यापूर्वी बैलगाडीसह शेतमजूरही या विहिरीत पडल्याची घटना घडली होती. विहिर तातडीने बुजवावी किंवा सुरक्षित कठडा उभारावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. मात्र याबाबत संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**अधिकारी प्रतिसाद देईनात..** रस्त्यालगत असलेल्या धोकादायक विहिरी संदर्भात सोयगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी देशमुख यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनीही प्रतिसाद दिला नाही. या ठिकाणी एखादी मोठी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

---

# दर्जेदार बांधकामाबरोबरच वृक्ष लागवडीकडे लक्ष द्या

### मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे निर्देश..

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी



सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होणारी विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करण्याबरोबरच वृक्षलागवड करण्यावर भर द्या, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी गुरुवार, १६ एप्रिल रोजी दिले आहेत.

शासकीय सुभेदारी विश्रामगृह येथे गुरुवारी आयोजित सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता सुंदरदास भगत यांच्यासह प्रादेशिक विभागातील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, दक्षता व गुणवत्ता नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत कामांच्या देखभाल-दुरुस्ती मध्ये कंत्राटदार टाळाटाळ करत असतील, तर निविदेतील अटींनुसार त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. यात वृक्ष लागवड हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. लावलेली झाडे जगली नसतील, तर संबंधित कंत्राटदाराची देयके अदा करू नये असे आदेश मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले. कामाचा दर्जा आणि गुणवत्ता उत्तम राहण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (साइटवर) क्षेत्रभेटी देऊन देखरेख करावी. राज्य शासनाने प्रलंबित देयकांचा आकडा कमी केला असून, इथून पुढे कामांसाठी नियमित निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली. सार्वजनिक विभागामार्फत पूर्ण झालेल्या काही महत्त्वाच्या वास्तूंच्या कामांबाबत मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. यामध्ये प्रामुख्याने वेरूळ घृष्णेश्वर मंदिर परिसरातील विटा-चुन्यातील कमान, पोकळी व घुमट रचना, विधि विद्यापीठातील मुलांच्या मेसची इमारत, छत्रपती संभाजीनगर शहरातील २०० खाटांचे महिला रुग्णालय. बीड येथील २०० खाटांचे रुग्णालय आणि अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचा बाह्यरुग्ण विभाग याचा समावेश आहे.

---

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती जिल्हाध्यक्षपदी अमृता चव्हाण

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी




राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या युवती जिल्हाध्यक्षपदी अमृता गंगाधर चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवती विभागाच्या प्रदेशाध्यक्ष अमृता काळदाते यांनी ही घोषणा केली.

अमृता चव्हाण यांच्या सामाजिक क्षेत्रातील कामाचा अनुभव आणि तरुण वर्गामधील त्यांची पकड लक्षात घेऊन ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. आपल्या नियुक्तीबद्दल बोलताना अमृता चव्हाण म्हणाल्या की, पक्षाध्यक्ष शरद पवार यांचेविचार घराघरात पोहोचवण्यासाठी आणि युवतींच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. आगामी काळात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात युवतींचे मोठे संघटन उभे करून पक्षाची ताकद वाढवण्यावर माझा भर असेल असे त्यांनी यावेळी सांगितले. अमृता चव्हाण यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

---

### विद्युत ट्रान्सफॉर्मरमध्ये शॉर्टसर्किटमुळे स्फोट

**वाळूज महानगर :** पंढरपूर शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युत ट्रान्सफॉर्मरमध्ये शॉर्टसर्किट होऊन स्फोट झाल्याने आग लागल्याची घटना मंगळवार, १४ एप्रिल रोजी दुपारी घडली. महावितरण कर्मचारी व नागरिकांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे कर्मचारी खलील शेख घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्परता दाखवत सर्वप्रथम वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. या ट्रान्सफॉर्मरच्या आजूबाजूला दुकाने असल्यामुळे आग पसरण्याची भीती होती. व मात्र, स्थानिक दुकानदार व नागरिकांनीही मदतीचा हात पुढे करून आग आटोक्यात आणली. महावितरण कर्मचारी नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आग लवकर नियंत्रणात आली.

---

# भंगाराचे गोडावून जळून खाक; लाखो रुपयांचे नुकसान

### साजापूर येथील घटना, सुदैवाने जीवितहानी टळली..

वाळूज महानगर/प्रतिनिधी



साजापूर येथील औद्योगिक परिसरात अज्ञातांनी कचरा जाळल्याने भीषण आग लागून भंगार गोडाऊन व पत्र्याचे शेड जळून खाक झाले. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले. गोडावूनला आग लागल्याची ही घटना गुरुवार, १६ एप्रिल रोजी घडली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. मात्र हायटेंशन वीज वाहिन्यांखाली सुरू असलेल्या अनधिकृत व्यवसायांमुळे सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वाळूज औद्योगिक क्षेत्रालगतच्या साजापूर गट क्रमांक ५३ व ५४ मध्ये गुरुवारी सकाळी अचानक आग लागली होती. गुलाम नबी खान यांचे गोडाउन तसेच परिसरातील भंगार व्यवसाय करणाऱ्यांचे साहित्य आगीत जळून खाक झाले. शेख मुसा, सय्यद इम्रान, मोहम्मद अलीम, इम्रान शहा, शेख फय्याज व अर्शद अली यांचा या ठिकाणी भंगार व्यवसाय असून, मोठ्या प्रमाणात प्लास्टिक साहित्य साठा होता. सकाळी काही अज्ञातांनी मोकळ्या जागेत कचरा जाळल्याने वाऱ्याच्या वेगामुळे ठिणग्या उडून या साठ्याला आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण करत संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी वेढला गेला होता.

दरम्यान, आगीचे लोळ उंचावत असल्याचे लक्षात येताच परिसरातील कामगार व उद्योजकांनी अग्निशमन विभागाला कळवले. वाळूज एमआयडीसी व मनपाच्या अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करत आग आटोक्यात आणली. यासाठी खासगी पाण्याच्या टँकरचीही मदत घेण्यात आली. उष्णतेमुळे सायंकाळपर्यंत ठिकठिकाणी धुमसणे सुरूच होते. या आगीत लॅमिनेशन मशीन, गोण्या पन्नी, हॅण्डग्लोज, बटर पेपर, लोखंडी कपाट, पत्रे, फर्निचर, वायरिंग, कागदपत्रे तसेच रोख रक्कम जळून खाक झाली. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले. या घटनेची नोंद एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

**अग्निशमन दलाचे मदतकार्य**

साजापूर येथील भंगाराच्या गोदामाला आग लागल्याची माहिती मिळाल्यावर मनपाचे मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिकारी विनायक कदम, ड्यूटी अधिकारी गोरखनाथ जाधव, छगन सलामबाद, भुरालाल सलामपुरे, वाळूज अग्निशमन केंद्राचे मुख्य अग्निशमन अधिकारी अनिल देशमुख, एस.जी. देशमुख, सुनील पाटील, एस.के. हजारे, एस.बी. महाले, टी.बी. तांदळे आदींनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्यासाठी परिश्रम घेतले.

---

# 'इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर'चे रविवारी भूमिपूजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी



धम्मयान एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवार, १९ एप्रिल रोजी 'इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर'चा भूमिपूजन सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्याला देश-विदेशातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती मुख्य संयोजक भिक्खू एम. धम्मज्योती थेरो यांनी पत्रकार परिषदेत गुरुवार, १६ एप्रिल रोजी दिली.

शरणापूर येथून जवळ असलेल्या अप्पावाडी येथील गट क्रमांक १२ येथे हा उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इमाव मंत्री अतुल सावे, भूतानचे गृहमंत्री ल्योनपो शेरिंग, अरुणाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री चाउना मीन, श्रीलंकेचे खासदार उदित लोकुभंडार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मंत्री जयकुमार रावल, बौद्धमहासभेचे अध्यक्ष भीमराव आंबेडकर, खा. श्रीकांत शिंदे, आ. अनुराधा चव्हाण, आ. अर्जून खोतकर, आ. प्रदीप जैस्वाल, माजी मंत्री राजकुमार बडोले, जयंत पाटील, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांचीही उपस्थिती राहणार आहे. सोहळ्यासाठी रेल्वेस्टेशन, मध्यवर्ती बसस्थानक, सिडको बसस्थानक येथून नियोजन स्थळापर्यंत सकाळी ८ ते सायंकाळी ७ पर्यंत प्रत्येक अर्ध्या तासाला स्मार्ट सिटीबस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पत्रकार परिषदेला प्राचार्य डॉ.खेमधम्मो महास्थविर, बोधिरत्न थेरो, विजय आनंद, गुरुबोधी, डॉ. संजय पवार, अनिलकुमार बस्ते, संजय डोंगरे, सी.डी पाटील, प्रफुल्ल ढेपे, विजय साळवे यांची उपस्थिती होती. रविवारी सकाळी नऊ वाजता धम्म ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. सकाळी साडेनऊ वाजता सामुदायिक धम्मसाधना आणि परित्राण पाठ, दुपारी साडेबारा वाजता भिक्खू संघाचे भोजन दान, दुपारी अडीच वाजता मुख्य उद्घाटन व भूमिपूजन सोहळा होईल.

---

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

सोयगाव/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मंगळवार, १४ एप्रिल रोजी सोयगाव शहरातील आंबेडकर नगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध पक्ष-संघटनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

सोयगावच्या तहसीलदार मनिषा मेने यांनी प्रशासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नगरपंचायतचे मुख्याधिकारी संभाजी देशमुख, तेजीस्विनी काळे, पंचायत समिती सदस्या जयश्री पवार, सुनील गव्हांडे, माजी सरपंच वसन बनकर, राजेंद्र जावळे, मंगेश सोहणी, कैलास काळे, रविंद्र काळे, संतोष बोडखे, सुनिल ठोंबरे, अक्षय काळे, अरुण सोहणी, डिंगाबर वाघ, विष्णू मापारी आदींची उपस्थिती होती. दरम्यान, बौध्द मित्र मंडळाच्या वतीने सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. भिम वाडी, आंबेडकरनगर, जुना बाजा चौक, वाल्मिकपूरा, शिवाजी महाराज चौक परत आंबेडकर नगरातील पुतळ्याजवळ मिरवणूक आल्यानंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. यावेळी राधाकुष्ण गायकवाड, अंकुश पगारे, भारत पगारे, जाधव, राजू वानखेडे, दिपक नवगीरे, नितीन पगारे, अतूल पगारे, सुमीत वानखेडे, सुनील पगारे, हिम्मत पगारे, मंगेश साळवे, रविंद्र गंगावणे, दिपक पगारे, संदीप पगारे, रमेश साळवे, गणेश पगारे, संतोष नवगीरे, भगवान वानखेडे, दगडू पगारे, मयूर पगारे, अविनाश श्रीखंडे, देवकाबाई पगारे उपस्थित होते.

---

# संत शिवाई मातेने मनुष्याला जगण्याचा मूलमंत्र दिला : ह.भ.प. गायकवाड

वैजापूर/प्रतिनिधी

संत शिवाई माता संस्कृती आणि मानवताशी एकरूप झाल्या आहेत. संत शिवाई मातेने माणसांमध्ये देव शोधण्याची निमळ दृष्टी सर्वांना देऊन विशिष्ट तत्वाने जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला असल्याचा उपदेश भागवताचार्य ह.भ.प. संतोष महाराज गायकवाड यांनी दिला. ते वैजापूर तालुक्यातील शिवूर येथे शिवाई मातेचा वार्षिक भंडारा उत्सव मंगळवार, १४ एप्रिल रोजी साजरा झाला यानिमित्त काल्याच्या कीर्तनात बोलत होते.

पुढे बोलताना महाराज म्हणाले की, संतांनी पांडुरंग परमात्म्याच्या रूपामध्ये सगुन समाज निर्माण केला आणि मानवतावाद रुजवला. निस्सीम भक्तीची शिकवण दिली. अध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी भक्ती मधून प्रेरणा देतात. त्या प्रापंचिक दुःखावर मात करण्यासाठी नैतिक सामर्थ्य वाढवण्याचा विश्वास जागवतात. त्यांनी दुःखी, पीडित गांजलेल्या जीवांना जीवनाचा खरा अर्थ समजावून सांगितला. तसेच सर्व समाजाला परमार्थ प्रवण करून सतत त्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र झटण्याचे काम केले. महाराष्ट्राच्या लोक जीवनावर या आदर्श यामुळेच उत्तम संस्कार झाले. त्यांनी मानवतेची गुढी उभारून माणुसकीला सर्वोच्च प्रतिष्ठा मिळवून दिली. लोक उद्धाराचे प्रचंड कार्य केले, असल्याचे महाराजांनी सांगितले. या प्रसंगी ह.भ.प. पंढरीनाथ महाराज पगार, भोलेगिरी महाराज, सर्वानंदगिरी महाराज, जगदीश महाराज, शिवशंकर महाराज, प्रभाकर चन्ने, चंद्रभान दादा, रामभाऊ महाराज, भगवान ठुबे, ज्ञानेश्वर मदाने, सचिन काळे, आ.रमेश बोरनारे, जिल्हा परिषद सदस्य मनोज गायके, रामहरी जाधव, पंचायत समितीचे उपसभापती बाळा पाटील जाधव, भाऊसाहेब त्रिभुवन, राजेंद्र जाधव, बाबासाहेब राऊत, राजेंद्र जानराव यांच्यासह भाविकांची उपस्थिती होती.

---

### भिक्खू विनयरक्खित महाथेरो यांचे प्रतिपादन | नागसेन-मिलिंद व्याख्यानमालेस प्रारंभ

# बुद्धांचे तत्त्वज्ञान, बाबासाहेबांचे विचार आत्मसात करा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी




तथागत गौतम बुद्ध यांचे पंचशील तत्त्वज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे. बुद्धांचे अमृततुल्य तत्त्वज्ञान आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य विचार आत्मसात करून 'पे बॅक टू सोसायटी' या भूमिकेतून समाज परिवर्तनासाठी योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन भिक्खू विनयरक्खित महाथेरो यांनी नागसेन मिलिंद व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफतांना व्यक्त केले.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागसेनवन येथील पीईएस इंजिनिअरिंग महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या नागसेन-मिलिंद या तीन दिवशी व्याख्यानमालेचा प्रारंभ गुरुवार, १६ एप्रिल रोजी करण्यात आला. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी पू.भिक्खू प्राचार्य डॉ. खेमधम्मो हे होते तर विचारमंचावर भिक्खू करुणानंद महाथेरो, भिक्खू ज्ञान रक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. नागसेन मिलिंद व्याख्यानमालेचे पहिले पुष्पगुंतांना मुख्य मार्गदर्शक तथा व्याख्याते भिक्खू विनयरक्खित महाथेरो (बंगलोर) म्हणाले की, गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानाला शरण गेले पाहिजे. त्यांचे पंचशील आत्मसात केले पाहिजे. धम्मामध्ये आनंदी जीवनाचा मंत्र दडलेला आहे. तथागत गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका-विचार आत्मसात करून समाजाप्रती पे बॅक टू सोसायटी ही भूमिका घेऊन सामाजिक परिवर्तन घडवून, शिल संपन्न, चारित्र्यसंपन्न समाज घडवावा. व्यक्तीने संतुष्ट भावनेतून जीवन जगले पाहिजे. असंतुष्टता हेच दु:खी जीवनाचे कारण असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, नागसेन मिलिंद या व्याख्यानमालेचे मुख्य संयोजक प्रास्ताविक करताना भिक्खू करूनानंद महाथेरो यांनी म्हटले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या मूळ विचार कार्यापासून दुरावत चालल्यामुळे समाजाला नव्या ध्येयाने त्यांच्या विचार कार्याशी व तथागत गौतम बुद्ध यांच्या तत्वज्ञानेशी जोडण्याकरिता नागसेन मिलिंद या तीन दिवशी व्याख्यानेचा प्रारंभ बुद्ध अनुयायी प्रा. प्रदीप रोडे सरांच्या कल्पकतेतून साकार होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. युवराज धबडगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार अभियंता अशोक येरेकर यांनी मानले.

**व्याख्यानमालेमुळे एका नव्या पर्वाचा प्रारंभ**

अध्यक्षीय समारोप करताना भिक्खू प्राचार्य डॉ. खेम धम्मो म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागसेन मिलिंद ही तीन दिवसीय व्याख्यानमाला सुरू करून एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे. ही व्याख्यानमाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे भविष्यातील वैशिष्ट्ये ठरेल, लक्षवेधी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरातील १२५ देशात त्यांच्या विचार व कार्याला समोर ठेवून साजरी केली जाते.

दैनिक महाभूमि

# जालना भूमि

शनिवार १८ एप्रिल २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

न्यूज ब्रीफ

## आदिवासी आश्रमशाळेत जयंती साजरी



**पिंपळगाव रेणुकाई :** आदिवासी आश्रमशाळा जळगांव सपकाळ येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी मुख्यध्यापक अनिल सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून आनंदा चोरमारे, शिक्षक रामेश्वर रोजकर हे होते. कार्यक्रमाला सुनिल लोखंडे, विजय पंडित, ज्ञानेश्वर दानवे, साहिल तडवी, ए.बी आढाव उपस्थित होते. सूत्रसंचालन कार्तिक सोनवणे व अनिकेत बावस्कर यांनी केले. सिद्धेश्वर दांडगे, चंद्रकांत कोळी, करण दांडगे, गायत्री सोनवणे, दिया कोळी, जमुना बुडवे या विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार धर्मेंद्र पावरा या विद्यार्थ्यांने मानले.

## भोयारेश्वर विद्यालयात जयंती साजरी

**धावडा :** भोकरदन तालुक्यातील वाढोणा येथील महर्षी भोयारेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य इंगळे, प्राध्यापक उदरभरे, भाबले, पोलीस पाटील संतोष जाधव व ग्रामस्थांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

## सेवा हक्क दिनानिमित्त कार्यक्रम

**जालना :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांमध्ये या कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आगामी २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने जालना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समारंभ पार पडणार आहे.

## निधनवार्ता

### केशरबाई भावले



**अंबड :** तालुक्यातील साष्टपिंपळगाव येथील केशरबाई हरिभाऊ भावले यांचे बुधवार, १५ एप्रिल रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८१ वर्षे होते. पत्रकार सुरेश भावले व अ‍ॅड. सतीश भावले यांच्या त्या चुलती होत.

### जालना जिल्ह्याला दिलासा ; भूजल पातळी ७.३३ मीटरवर

# भूजल पातळीत एक मीटरची वाढ

**जालना / प्रतिनिधी**

एकीकडे यंदा जिल्ह्यात तापमानात लक्षणीय वाढ होण्यास सुरुवात झालेली असून दुसरीकडे पिण्याचे पाणी दुर्भिक्ष्य जाणवण्याची शक्यता वर्तवली जात असताना भूजल सर्वेक्षणाचा दिलासादायक अहवाल आला आहे. मार्च २०२६ च्या अहवालानुसार तब्बल एक मीटरने वाढ झाली आहे.

जालना जिल्ह्यासाठी ही दिलासादायक बातमी आहे. मार्च २०२६ मधील निरीक्षण विहिरींच्या अहवालानुसार, मागील पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत यंदा भूजल पातळीत सरासरी सुमारे एक मीटरने वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्ह्यातील ११० निरीक्षण विहिरींच्या आकडेवारीनुसार सरासरी भूजल पातळी ८.३४ मीटरवरून ७.३३ मीटरवर आली आहे. भूजल पातळी 'मीटरमध्ये खाली येणे' म्हणजे पाणी पृष्ठभागाजवळ येणे, त्यामुळे ही स्थिती सुधारलेली मानली जाते. अहवालानुसार, ३७ विहिरींमध्ये पातळी वाढ झाली असून ३९ ठिकाणी घट नोंदली असली, तरी एकूण सरासरी सकारात्मक राहिली आहे. यामुळे जिल्ह्याच्या जलसाठ्यात एकंदर सुधारणा झाल्याचे स्पष्ट होते. या बदलामागे मागील हंगामातील तुलनेने चांगला पाऊस, काही भागात राबवलेल्या जलसंधारणाच्या उपाययोजना आणि पाण्याचा वाढता जाणीवपूर्वक वापर हे घटक कारणीभूत ठरल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

अंबड, बदनापूर, जालना आणि मंठा या तालुक्यांत लक्षणीय वाढ दिसून आली आहे. विशेषतः अंबडमध्ये सर्वाधिक १.४८ मीटर वाढ नोंदली गेली आहे. इतर तालुक्यांतही मध्यम प्रमाणात सुधारणा दिसून येत आहे, ज्यामुळे संपूर्ण जिल्ह्याच्या जलस्थितीत सकारात्मक बदल झाला आहे.





**तालुकानिहाय भूजल स्थिती**

| तालुका | विहिरी घट (संख्या) | विहिरी वाढ (संख्या) | पातळीतील बदल (मीटर) |
|---|---|---|---|
| जालना | १५ | ४ | ११ (+१.२३) |
| बदनापूर | १२ | १ | ११ (+१.२५) |
| भोकरदन | २५ | ९ | १६( +०.२७) |
| जाफराबाद | १३ | ४ | ९ (+०.५२) |
| परतूर | ९ | ३ | ६ (+०.५४) |
| मंठा | १० | २ | ८ (+१.०८) |
| अंबड | १२ | ४ | ८ (+१.४८) |
| घनसावंगी | १४ | ४ | १० (+१.०३) |

### जलव्यवस्थापनाची गरज

- जालना जिल्ह्यासाठी हा अहवाल दिलासादायक ठरला असून, भूजल पातळीत झालेली वाढ ही सकारात्मक दिशा दाखवणारी आहे. प्रशासन आणि नागरिकांनी मिळून जलव्यवस्थापनाची हीच गती कायम ठेवली, तर भविष्यात पाणीटंचाईचे संकट मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते.

## जालना मर्चंट बँक घोटाळ्यातील आरोपी निलेश्वर भोसले जेरबंद

### न्यायालयाकडून ७ दिवसांची पोलीस कोठडी

**जालना / प्रतिनिधी**



शहरात गाजत असलेल्या जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने आणखी एक मोठी कारवाई करत दुसरा आरोपी निलेश्वर शेषराव भोसले (वय ४६, रा. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा) याला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअरहाऊसच्या नावाखाली तब्बल १७७ बनावट खात्यांद्वारे सुमारे २३ कोटी ३३ लाख रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी चंदनझीरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार रायचंद सखाराम कुरंगळ याला यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे निलेश्वर भोसले याला ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत त्याचा घोटाळ्यात सक्रिय सहभाग स्पष्ट झाल्याने त्याला अटक करण्यात आली. या आर्थिक घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याने पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी तपास वेगाने करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेने कारवाईची गती वाढवली आहे. ही कारवाई आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी उपअधीक्षक सुरेश उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के व त्यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वी केली. दरम्यान, या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, पुढील तपास सुरू आहे. सरकारी वकील नितीन जाधव यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

## साबळे यांच्या कुटुंबीयांना ग्रामस्थांकडून आर्थिक मदत

**धावडा / प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील धावडा येथील प्रभाकर कडूबा साबळे यांचा १३ एप्रिल रोजी दुचाकी अपघातात मृत्यू झाला होता. कुटुंबाचा एकमेव आधार असलेला प्रभाकर साबळे यांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण कुटुंब पोरके झाले असून त्यांच्या कुटुंबीयाला फर्दापुर येथील दोन भन्ते यांच्या उपस्थीतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील अ‍ॅड. उदय देशमुख यांनी ४०चाळीस हजार रुपये व येथील उपसरपंच इक्बाल पठाण यांनी ५ पाच हजार रुपये तसेच समाजातील तरूण संतोष शंकर इंगळे,आशिष शामराव पारवे, संतोष इंगळे, अशोक जाधव यांनी वैयक्तिक आर्थिक मदत करून ही मदत प्रभाकर साबळे यांची पत्नी ज्योती साबळे, आई छायाबाई साबळे, वडील कडूबा साबळे यांच्याकडे सुर्पूद करण्यात आली. गावातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था तसेच लोकप्रतिनिधींनीही पुढे येऊन या कुटुंबाला आर्थिक मदत करावी, असे आवाहन येथील सार्वजनिक वाचनालयाचे सचिव संतोष इंगळे यांनी केली आहे. यावेळी सेवानिवृत्त कॅप्टन गौतम साबळे, राजू साबळे, रामेश्वर धनवाई, सुखदेव सपकाळ, पवन धनवई, हरिभाऊ बोराडे आदींनी केले आहे.

## बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन 'अलर्ट'वर

**जालना / प्रतिनिधी**

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर रविवार, १९ एप्रिल रोजी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळे पार पडणार आहेत. मात्र, या मुहूर्ताचा गैरफायदा घेऊन बालविवाह उरकले जाण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासकीय यंत्रणा हायअलर्टवर आली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी याबाबत सर्व संबंधित विभागांना सतर्कतेचे आदेश दिले असून, बालविवाहाचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. ग्रामीण भागात ग्रामसेवक, तर नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून चोवीस तास कार्यरत राहणार आहेत. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.व्ही.कड यांनी स्पष्ट केले की, बालविवाहाची तयारी सुरू असल्याची कुणकुण लागताच नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला कळवावे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियमानुसार, विवाहासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा, १ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी होऊ शकतात. बालविवाहाची माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार आहे. बालविवाहाचा प्रकार आढळून आल्यास सतर्क नागरिकांनी चाईल्ड हेल्पलाईन १०९८, पोलीस नियंत्रण कक्ष ११२, जवळचे पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा बालसंरक्षण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## सहा महिन्यांत जलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार

### आयुक्त अंजली शर्मा यांची पाहणी

**जालना / प्रतिनिधी**



शहराच्या वाढत्या पाणी गरजा लक्षात घेता जलपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांनी अंबड येथील जालना-अंबड संयुक्त जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केली.

या भेटीदरम्यान त्यांनी संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांशी सविस्तर चर्चा करत प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबाबत स्पष्ट निर्देश देताना, शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यास हा प्रकल्प अवघ्या सहा महिन्यांत पूर्ण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा करणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता हा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

शहरातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असला, तरी तो प्रत्यक्षात कितपत दिलासा देईल, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## दैठणा शिवारात दुधना नदीतून अवैध वाळू उत्खनन

**घनसावंगी / प्रतिनिधी**



तालुक्यातील दैठणा शिवारातील दुधना नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या सुमारासही ट्रॅक्टर व हायवा वाहनांच्या साहाय्याने बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. याकडे प्रशासनाचा सोयीस्करपणे कानाडोळा होत असल्याचे दिसून येत आहे.

नदी पात्रातील नैसर्गिक समतोल राखणारी वाळू मोठ्या प्रमाणावर काढून नेल्यामुळे पर्यावरणीय हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नदीचा प्रवाह बदलणे, पाण्याची पातळी खालावणे तसेच परिसरातील शेतीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या अवैध उत्खननाकडे महसूल विभाग व संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दरम्यान, अवैध वाळू माफियांचा दबदबा वाढत असून, प्रशासनाची कारवाई केवळ कागदोपत्रीच मर्यादित असल्याची चर्चा रंगू लागली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकाराची तत्काळ दखल घेऊन अवैध उत्खननावर आळा घालावा, अशी मागणी जोर धरत आहे. जर प्रशासनाने लवकरात लवकर कठोर कारवाई केली नाही, तर याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

## सुरंगळी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी सरपंच संजीव पाटील. एफ. एच.सिरसाठ, शेख एजाज यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर उपस्थितांशी सवांद साधला. कार्यक्रमास माजी उपसरपंच विनोद जाधव, संतोष काळे, माजी उपसरपंच एकनाथ भराड, भाऊसाहेब काळे, राहुल जाधव, पोलिस उपनिरीक्षक गणेश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. संजय दांडगे, प्रमोद जाधव, एकनाथ भराड, शेख रुबाब, दादाराव दांडगे, काशीनाथ दांडगे यांनी डॉ.बाबासाहेब यांच्या पुतळ्याचे पुष्पहार घालून पुजन केले. यावेळी दिनकर गवळी, भिमराव गवळी, कैलास गवळी, अरुण गवळी, दीपक गवळी, निरंजन गवळी, कृष्णा गवळी. अरुण गवळी, घनश्याम बोर्डे, मधुकर गवळी, राजीव गवळी, भगवान गवळी, समाधान गवळी, नाना गवळी, वसंता गवळी, नंदु जाधव, माजी ग्रामपंचायत सदस्य अंतीका गवळी, शोभा बोर्डे, इंदुबाई बनकर, निता गवळी, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष आदी उपस्थित होते.

### जिल्ह्यातील पीडित महिलांच्या हक्काचा आधारवड

# सखी वन स्टॉप सेंटरची मदत

**जालना / प्रतिनिधी**

समाजातील पीडित असलेल्या महिलांच्या पाठीशी उभे राहत लढा देवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सखी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे पीडित महिलांसाठी हे केंद्र हक्काचे आधारवड ठरत आहे. याठिकाणी एकाच छताखाली सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यात आहेत.

जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात (घाटी) सखी वन स्टॉप सेंटर जून २०१९ पासून कार्यान्वित आहे. एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर मदत, समुपदेशन, गरज असल्यास आश्रयाची सोयही उपलब्ध करू दिली जाते. त्यामुळे समाजातील पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

महिला व बालविकास मंत्रालयाकडून ते चालवले जाते. शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, अ‍ॅसिड हल्ला किंवा सायबर क्राईममधील अत्याचारास बळी पडलेल्या महिलांना पोलिस, वकील, समुपदेशक अशा अनेकांची मदत घ्यावी लागते. अशावेळी सखी वन स्टॉप सेंटर पीडितेच्या पाठीशी उभे राहून लढा देत न्याय मिळवून देत आहे. कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण, हुंडाबळी, छळ, जाच, अ‍ॅसिड हल्ले, आणि बाल लैंगिक शोषणग्रस्त पीडितांना या ठिकाणी मदत केली जाते. पीडित महिलांना कायदेशीर मदत, पोलिस मदत, समुपदेशन, वैद्यकीय मदत, तात्पुरता निवारा, व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा, पोलिस सहाय्यता आदींची मदत देतात. हे कार्यालय २४ तास सुरु असते. त्यासाठी १३ कर्मचारी आहेत. गरजेनुसार त्यांना पाच दिवसाचा तात्पुरता निवारा दिला जातो. सद्यस्थितीत केंद्रामध्ये एकाच वेळी ५ महिला व्यवस्थित राहू शकतील एवढी क्षमता या निवारा गृहाची आहे.




### पीडित ८७५ महिलांना मिळाला न्याय

- या सेंटरने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या मदतीने जून २०१९ ते मार्च २०२६ या अडीच वर्षाच्या कालावधीत आजपर्यंत ८७५ पीडित महिलांच्या विविध समस्यांवर निवारण करुन त्यांना विविध सेवा उपलब्ध करुन देत न्याय देण्याचे कार्य केले आहे. तसेच वकिल ही उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

**वनिता पिंपळे**, केंद्र व्यवस्थापक, जालना

### तातडीच्या मदतसाठी हेल्पलाईन

- तातडीच्या मदतीसाठी शासनाचा १८१ हा महिला हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित आहे. जिल्ह्यातील गरजू आणि संकटग्रस्त महिलांनी कोणत्याही भितीशिवाय या क्रमांकावर किंवा सखी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र कड, आणि सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## हभप एकनाथ महाराज लोमटे यांना राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार

**अंबड / प्रतिनिधी**



हभप एकनाथ महाराज लोमटे यांनी सांस्कृतिक कार्यक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार जाहीर झाला आहे. या सन्मानामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष बाब म्हणून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

हभप एकनाथ महाराज हे कळंब तालुक्यातील मलकापूर संस्थांनच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान, शेतकरी आत्महत्या टाळण्यासाठी प्रबोधन, बेटी बचाव बेटी पढाव बाबतीत आपल्या कीर्तन व प्रवचनातून सामाजिक जनजागृती करण्याचे काम करून समाज प्रबोधन करतात. तसेच त्यांनी ५ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प देखील केलेला आहे. त्यांच्या या सांस्कृतिक कार्यक्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना यापूर्वी परभणी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हभप लोमटे महाराज हे आपल्या प्रबोधनपर कीर्तनातून आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून मराठी संस्कृतीचे संवर्धन करत आहेत. तसेच ५ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्पाने त्यांनी झाडे लावा झाडे जगवाचा संदेश दिला आहे. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या हभप लोमटे महाराज यांच्या कार्याची दखल घेत त्यांना ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

## भारत अमेरिका कृषी कराराविरोधात बुलढाण्यात युवक काँग्रेसचा न्याय सत्याग्रह

# शेतकऱ्यांचे मरण हेच मोदी सरकारचे धोरण : विश्वदिप पडोळ

**बुलढाणा / प्रतिनिधी**

केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेला कृषी करार हा भारतीय शेतकऱ्यांवर अन्याय करणारा आहे. अमेरिकन शेतकऱ्यांना तिथल्या सरकारकडून मोठी सबसिडी मिळते, त्यामुळे भारतीय शेतकरी त्यांच्याशी स्पर्धा करूच शकणार नाही. अमेरिकेतील सोयाबीन, मका, कापूस आणि दुग्धजन्य पदार्थ भारतीय बाजारपेठेत आल्यास स्थानिक शेतकऱ्यांना कवडीमोल दरात माल विकावा लागेल. या करारामुळे स्थानिक बाजार समित्या कमकुवत होतील आणि व्यापाऱ्यांचा फायदा होईल. शेतकरी कर्जात बुडून त्यांना शेतजमिनी विकाव्या लागतील. एकंदरीत शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम मोदी सरकार करत आहे. शेतकऱ्यांचे मरण हेच मोदी




सरकाराचे धोरण असून हा करार सरकारने तात्काळ रद्द करावा, अशी मागणी युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव विश्वदिप पडोळ यांनी केली आहे.

केंद्र सरकारच्या भारत–अमेरिका व्यापार कराराविरोधात काँग्रेस पक्षाने तीव्र विरोध केला असून काँग्रेसने राज्यभर शेतकरी न्याय सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर बुलढाण्यात १७ एप्रिल रोजी गांधी भवन प्रांगणात जिल्हा युवा काँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. तद्नंतर शेतकरी विरोधी युएस ट्रेड डिल त्वरित रद्द करा, शेतकऱ्यांना एमएसपीची कायदेशीर हमी द्या, भारताचा डेटा अमेरिकेला देऊ नका, या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे संघटन सृजन अभियान समन्वयक अब्दुल हनान, सह समन्वयक वीरेंद्र जगताप, युवक काँग्रेस प्रदेशचे महासचिव विश्वदीप पडोळ, युवक काँग्रेस प्रदेश सचिव शिवराज पाटील, काँग्रेस नेते संदीप शेळके, तेजेंद्रसिंग चव्हाण, धनंजय देशमुख, लक्ष्मणराव घुमरे, समाधान सुपेकर, आकाळ, देवानंद पवार, अमर कुळे, अचल दिपके, गौरव नाईक, तुषार खरे, संदीप पैठणे, ज्ञानेश्वर डांबरे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### भारतीय शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम : शिवराज पाटील

■ भारत अमेरिका कृषी करारामुळे अमेरिकन कृषी उत्पादनांना शून्य टक्के आयात शुल्क देण्याचा प्रस्ताव असून त्यामुळे स्वस्त परदेशी माल भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणावर येईल. परिणामी, स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनांना योग्य भाव मिळणार नाही आणि त्यांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होईल. याशिवाय, भारतातील बहुसंख्य शेतकरी लहान व अल्पभूधारक असून त्यांच्याकडे पुरेशा सुविधा व आधुनिक साधनांचा अभाव आहे. अशा परिस्थितीत अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करणे त्यांच्यासाठी कठीण ठरणार आहे. या करारामुळे भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि लघुउद्योगांवर गंभीर परिणाम होणार असल्याचे युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव शिवराज पाटील यांनी सांगितले.



## महात्मा फुले-डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

### शिवाजीराव तायडे यांना समाजभूषण पुरस्कार

**अंभोडा :** महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथीला विधायक उपक्रम राबवण्यात अग्रेसर असणाऱ्या अंभोडा नगरीत महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये माँ जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तुकाराम तायडे यांना समाज भूषण पुरस्कार, देण्यात आला. तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार प्रमोद ठोकरे तर सागर सुरुशे यांना विद्यार्थी प्रेरणा पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन उपस्थितांनी अभिवादन केले. तद्नंतर पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं. नेहरू हायस्कूलचे मुख्याध्यापक तांदळे होते. दरम्यान दुय्यम निबंधक सागर मधुकर पवार यांना गौरव पुरस्कार, गजानन वाघ यांना युवा उद्योजक, माजी सैनिकांचा जीवन गौरव पुरस्कार तर ज्येष्ठ नागरिकांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गणेश इंगळे, जीवन जाधव, साहेबराव इंगळे, पंकज इंगळे, गौतम इंगळे, शंकर इंगळे, विनोद झिने यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी सरपंच श्रीकृष्णा तायडे, एकनाथ तायडे, गणेश जाधव, गजेंद्र दळवी, ज्ञानेश्वर पवार, मनोज तायडे, शेळके मामा, शंकर तायडे, अंकुश डुकरे, नितीन तायडे, विजय तायडे, सचिव नरवाडे शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन गाढे यांनी तर आभार किशोर पवार यांनी मानले.

## सरकारकडून शेतकरी वाऱ्यावर सोडण्याचे काम : जालिंदर बुधवत

### आता बारदाना नसल्याचे कारण देत शासकीय खरेदी बंद

**बुलढाणा / प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्याचा सरकारचा प्रयत्न चालला आहे. बारदाना नसल्याचे कारण सांगण्यात येत असून हमीभावाने खरेदी केंद्र बंद करण्यात आली आहेत. आधी उद्दिष्ट संपल्याचे सांगून ही खरेदी बंद करण्यात आली होती. तर आता बारदाना नसल्याचे सांगण्यात येत आहे. हा एकप्रकारे व्यापाऱ्यांचे हित जपण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडील बारदानामध्ये शेतमाल खरेदी करावा अशी आग्रही मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांचे नेतृत्वात



करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यात जवळपास ४० खरेदी केंद्र सुमारे महिनाभरापासून बंद असल्याची माहिती ही मिळालेली आहे. शेतकरी हिताचा विचार न करता यातही व्यापारी हित जपण्याचा हा एकप्रकार असून याबाबत तीव्र निषेध शिवसेनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन, हरभरा, मका , तर पडून आहे. हा प्रकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यासारखा आहे. त्यासाठी शेतकऱ्यांकडील बारदाण्यांमधून शेतमाल खरेदी करावा अशी मागणी आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असा इशारा जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वात देण्यात आला आहे. यावेळी जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, प्रवक्त्या जयश्री शेळके, युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, मोताळा तालुकाप्रमुख विजय इंगळे, रवी राजपूत, गोविंद डांगर, मोहित राजपूत, अनिल राणा, गजानन धांडे, सुधाकर मुंढे, मिलिंद गवई, सुरेखा तायडे, रत्ना शेळके, सुनंदा खरात, स्मिता वराडे, अनिता जाधव, ऋणाली उबरहांडे, सपना इंगळे, शीतल सुरडकर, पल्लवी शेळके, बेबी परिहार, सुवर्णा जाधव, सुनीता दराखे, भारती डागोर, श्रीकांत जाधव, निर्मल इंगळे, अमित जाधव, भीमराव गवळी, सुभाष गवळी तसेच शिवसैनिक, महिला आघाडी पदाधिकारी उपस्थित होते.

## मालगणी येथे फुले–आंबेडकर जयंतीनिमित्त पोस्टर प्रदर्शनी व वैचारिक प्रबोधन

**चिखली / प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष वैचारिक प्रबोधन कार्यक्रमाचे १३ एप्रिल रोजी मालगणी येथे आयोजन करण्यात आले होते . संविधान जागर टीमच्या वतीने 'पोस्टर प्रदर्शनी' द्वारे ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला.


या कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजासाठीच्या महान कार्याची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्यांच्या शिक्षण, सामाजिक समता आणि न्यायासाठीच्या लढ्याचे महत्त्व पटवून सांगण्यात



आले. कार्यक्रमादरम्यान महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करणारी प्रेरणादायी गाणी सादर करण्यात आली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यानंतर ग्रामस्थांना फुलेआंबेडकर यांच्या विचारांवरील पत्रके वितरित करण्यात आली तसेच ही पत्रके आपल्या परिसरात वाटून जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी तुषार रईसा, खरात, ज्ञानेश्वर आणि हरी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रशांत वाकोडे, अमोल काळे, शंकर झिने, शैलेश सोनटक्के, आकाश सोनटक्के, दीपक काळे, वैभव मोरे, राज वाकोडे, अक्षय काळे, सागर झिने आणि सिद्धार्थ जाधव यांनी केले. या उपक्रमामुळे गावात सामाजिक जाणीव वाढीस लागून फुलेआंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार होण्यास हातभार लागला.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 943



### आडवे संकेत

१) गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर यांनी स्थापिलेले विद्यापीठ
५) भारताचे दक्षिण टोक व तामिळनाडू राज्यातील एक प्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ
९) आपला देश
११) आईची बहिण
१३) यातना, दुख
१४) सरस–नीरस यामधील भेदाचे ज्ञान
१५) शहाजहान बादशहाने आपल्या राणीच्या स्मरणार्थ बांधलेली आणि जगातील अतिशय सुंदर म्हणून प्रसिद्ध असलेली आग्रा येथील वास्तू
१७) सिद्धता, तजवीज, व्यवस्था
१९) आपल्या उत्पन्नातून सरकारला देय असलेले देणे
२०) देह, शरीर
२१) जन्मदात्री, आई
२२) अधिकार, पाऊल
२४) अंतर्भाव, प्रवेश
२५) क्रिकेटच्या खेळात चेंडू अडविणारा
२७) मनोकामना पूर्ण झाल्यावर देवास काही वस्तू अर्पण करण्याचा संकल्प
२८) दुसरीकडे, अन्य ठिकाणी
३०) एक वजन किंवा माप
३२) गोवा प्रांत
३३) श्लेष्मा, वैद्यक शास्त्रात शरीरातील त्रिदोषांपैकी एक
३४) सुंदर स्त्री,
३६) फूल उमलण्यापूर्वीची अवस्था, कलिका
३७) घाणेरडा, मलीन
३९) स्वतंत्रतापूर्व काळात या ठिकाणी इंग्रजांनी बेछूट गोळीबार करुन असंख्य निरपराध लोकांचे बळी घेतले
४२) अर्चना पूरण सिंग, नसिरुद्दीन शाह, पंकज कपूरचा एक जुना चित्रपट
४४) तात्पर्य, सत्वांश
४६) '... ... ... वैद्य मरो' आपली गरज संपल्यावर मदत करणाऱ्यांची आठवणसुद्धा रहात नाही या अर्थाचा एक वाक्प्रचार
४७) महानगर पालिकेत आपल्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारी सदस्या
४८) निष्णात, तरबेज
४९) कायमचे टिकणारे, शाश्वत
५२) कारण, उद्देश
५४) भोजनार्थ लागलेली पाकसामुग्री
५५) जाळ्यांच्या सुशोभित ताटया लावून केलेली जागा, रमणीय स्थान
५६) मृतास जिवंत करणारी वनस्पती
६०) दुर्दशा, वाईट अवस्था
६१) तपश्चर्या
६२) उपरोधिक शब्दात बोलणे, टोमणा मारणे
६६) कपर्दिका, डोळ्यातील फूल
६७) एक जलचर प्राणी,
६८) वायू, वारा
६९) ज्योतिषी, गणना करणारा
७१) घरातील भिंतीवर आढळणारा एक क्षुद्र जीव
७२) केव्हा
७३) व्याजाने कर्जाऊ रकमा देणारा
७४) कुटुंब, खटला

### उभे संकेत

१) शांती, समाधान, नि:शब्दता
२) निरोगी, सुदृढ
३) मसाल्यातील एक पदार्थ
४) नवीन
६) सकाळचा फराळ
७) एकंदर, वंश
८) चाल, प्रथा, वहिवाट
९) शिजविलेले तांदूळ
१०) विशेष कष्ट न घेता, करमणूक करीत
१२) थंड, गार
१६) एखाद्या गुन्हेगाराची घेतलेली हमी
१८) मागणारा, भिक्षुक
१९) कमाई करणारा
२३) प्रत्येक महिन्यास
२४) पुत्र, सूर्य (इं.)
२५) एखाद्या जागेचे एकत्र परिणाम,
२६) सूक्ष्म अंश
२८) जेवणाऱ्यास इष्ट वाटेल अशा पदार्थांचे भोजन
२९) एकेक बाब क्रमवार घेऊन
३१) अगदी सहज, स्वाभाविकपणे
३२) गोळ्यांचा वर्षाव करणे
३४) विलास, शृंगार, मनोहर,
३५) मैद्यापासून बनविलेली एक मिठाई
३६) भांडण, तंटा
३८) व्याकूळ, घाबरा
४०) हत्तीच्या चालीसारखी डौलाने चालणारी स्त्री
४१) आळ, बालंट
४३) भिजविलेला व मळलेला पदार्थाचा गोळा
४५) स्तंभ, कॉलम
५०) अंधार
५१) नखावर मावण्याइतके
५२) वेचक, निवडलेले
५३) आग विझविणारे, अग्निचे शमन करणारे
५४) डोईजड, वरचढ,
५६) राखण, पहारा
५७) प्राण, लहान कीटक
५८) राजा
५९) लग्नात वरपक्षाला उतरण्यासाठी दिलेली जागा
६१) गुन्हेगाराला गावाच्या शिवेबाहेर हाकलून देणे
६३) लकवा – अर्धांगवायू, अर्धे शरीर लूळे पडणे
६४) कढविलेले लोणी
६५) मनुष्य
७०) बशीचा जोडीदार (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दव्यूहचे उत्तर



uday munde - 8446302691



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वैचारिक व्याख्यानाने साजरी

**बुलढाणा / प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तथागत नगर, सहयोग कॉलोनी, खामगाव रोड बुलढाणा येथे वैचारिक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व बुद्ध वंदनेने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.कैलास गवई होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून ॲड.सुभाष विनकर तर डॉ.आशिष खासबागे, वंचित बहुजन आघाडी बुलढाणा शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे यांची उपस्थिती होती.

सुभाष विनकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या मार्गाने आपण पुढे चाललो पाहिजे असे आवाहन केले. डॉ आशिष खासबागे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित सामाजिक क्रांती यावर विचार व्यक्त केले. तसेच वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन धीरज वाकोडे, प्रास्ताविक सागर सरकटे तर शाहीर खिल्लारे यांनी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर पोवाडा सादर केला. आभार सतिश गवई यांनी मानले. कार्यक्रमासाठी यशस्वीतेकरिता विश्वास इंगळे, राजू सुरडकर, विनोद अंभोरे, राजू मिसाळ, अरविंद जुमडे, संजय डोंगरदिवे, स्वप्नील खरात, सुधाकर खरे, संजीव गवई, प्रवीण वाकोडे, गणेश मोरे ,नामदेव जाधव, वसंत ठाकरे, भास्कर जाधव, निलेश मगर , रतन जाधव, अविनाश जाधव, करण पवार, राणी ठाकरे, वंदना मिसाळ, किरण पैठणे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

शनिवार । १८ एप्रिल २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### दुर्मीळ आजारग्रस्त बालकाला सहाय्य

**अकोला :** सामाजिक सेवाभावी कार्यात सक्रिय असलेल्या इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूरच्या वतीने शासकीय जिल्हा महिला रुग्णालयात दुर्मिळ आजाराने ग्रस्त असलेल्या एका गरजू बालकाला महत्त्वपूर्ण सहाय्य प्रदान करण्यात आले. क्लबच्या अध्यक्षा कविता पोहरे यांच्या पुढाकारातून महिला पदाधिकाऱ्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयातील बालकक्षास भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली.

### खरिपाच्या नियोजनाची प्रतिक्षा

**अकोला:** पावसाळा सुरू होण्यास केवळ दीड महिन्याचा कालावधी उरला असताना यंदाच्या येत्या खरीप हंगामातील पूर्वतयारीचे नियोजन तयार होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत हे नियोजन तयार होणार तरी कधी, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील खरीप पिकांच्या पेरणीचे प्रस्तावित क्षेत्र, पेरणीसाठी लागणारे बियाणे आणि खतांची मागणी त्या तुलनेत उपलब्धता आणि कृषी निविष्ठांचा जिल्ह्यात होणारा पुरवठा आदी विषयांसंदर्भात खरीप हंगामपूर्व तयारीचे नियोजन दरवर्षी कृषी विभागामार्फत करण्यात येते.

### विशेष रेल्वे गाड्या नियमित करा

**अकोला:** विशेष रेल्वे गाड्यांना नियमित गाड्यांमध्ये रूपांतरित करण्याच्या निर्णयाबद्दल विदर्भ यात्री संघाने रेल्वे प्रशासनाचे आभार मानले असून, उर्वरित गाड्यांनाही नियमित दर्जा देण्याची मागणी केली आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री वीरन्ना सोमन्ना, तसेच रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांना पाठविलेल्या निवेदनात संघाने नमूद केले आहे की, अनेक गाड्या दीर्घकाळापासून विशेष स्वरूपात धावत असून त्या नियमित करणे गरजेचे आहे. अलीकडे काही गाड्यांना नियमित दर्जा देण्यात आल्याचा निर्णय प्रवाशांसाठी स्वागतार्ह असल्याचे संघाने म्हटले आहे.

## दुर्लक्ष : ग्रामस्थांना सतावतेय आरोग्याची चिंता

# खिरपुरी बु. मध्ये पाण्याच्या टाकीत आढळले मृत माकड

**बाळापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील खिरपुरी बुद्रुक येथे पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मृत अवस्थेत माकड आढळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे गावातील नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतीमार्फत नळयोजनेद्वारे गावात पाणीपुरवठा केला जातो. मात्र १७ एप्रिल रोजी या पाणीपुरवठा टाकीतच एक माकड मृत अवस्थेत आढळून आले. ही माहिती गावात पसरताच नागरिकांनी टाकीजवळ मोठी गर्दी केली. माकडाचा मृत्यू नेमका कधी झाला याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटनेमुळे पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट होत असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. सध्या उन्हाचा पारा वाढल्याने वन्यप्राणी पाण्याच्या शोधात गावाकडे वळत असल्याची शक्यता वर्तवली जात असून, संबंधित माकड पाणी पिण्यासाठी टाकीवर गेले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी सुरज भोंडे यांनी सांगितले की, पाण्याच्या टाकीची साफसफाई करण्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असून, संबंधित कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे.



### ते पाणी कसे प्यावे ?

- उन्हाळ्याच्या दिवसात पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. अशातच पाण्याच्या टाकीत मृत माकड आढळल्याने परिसरात पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्या टाकीतील पाणी कसे प्यावे, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

> पाण्याच्या टाकीची साफसफाई करणे संदर्भात संबंधित कर्मचारी यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु संबंधित कर्मचारी केलेल्या सूचनेकडे दुर्लक्षितपणा करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल.
> **– सुरज भोंडे,** ग्रामपंचायत अधिकारी, खिरपुरी बु

> पाण्याच्या टाकी पाण्याच्या टाकीत मृत अवस्थेत माकड आढळले. हा गंभीर प्रकार असून याबाबतीत संबंधित ग्रामप्रशासनाचा दुर्लक्षितपणा असल्याचे दिसून येते.
> **– अजय चिंचोळकर,** ग्रामस्थ, खिरपुरी

## वाडेगाव येथे करियर, नोकरिच्या संधीवर उद्या कार्यक्रम

**अकोला / प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तसेच अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी बार्टी यांच्यातर्फे परदेशातील करियर व नोकरीच्या संधी याबाबत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १९ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत छत्रपती मंगल कार्यालय पातुर रोड वाडेगाव तालुका बाळापूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमात महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींसाठी असून, प्रवेश व मार्गदर्शन पूर्णपणे विनामूल्य आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. कार्यक्रमात अरब अमिराती (युएई), सौदी अरेबिया, कतार, बहरीन, कुवेत व ओमान या व इतर देशांमधील रोजगार संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महावितरणच्या अधीक्षक अभियंता प्रतीक्षा शंभरकर यांच्या हस्ते होईल. यावेळी बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड,प्रेरणा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे प्रकाश बोडके, फहाद गोली, मारुती वाठ, महेश गवळी संयोजक राजेंद्र पातोडे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.




# अकोल्यात १३.८० लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त

## 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मोठी कारवाई

**अकोला / प्रतिनिधी**

शहरातील अंमली पदार्थांच्या विरोधात राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने २०२६ मधील पहिली मोठी कारवाई करत तब्बल १३ लाख ८० हजार रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज जप्त केला आहे. या कारवाईत एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात घेतला असून शहरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १६ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, सिव्हील लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवीन बसस्थानकाच्या पाठीमागे पाण्याच्या टाकीजवळ एक इसम अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार आहे. या खात्रीलायक माहितीच्या आधारे पथकाने शासकीय पंचांसमक्ष सापळा रचला. कारवाईदरम्यान मोहम्मद शफीक मोहम्मद जहिर शेख (वय ३५, रा. मुसा कसम चाल, एम.पी. रोड, अपोझिट आलीशन थिएटर, मुंब्रा, जि. ठाणे) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून ६८.४३ ग्रॅम एमडी ड्रग्ज ( ) ज्याची किंमत १३ लाख ६० हजार रुपये असून, दोन मोबाईल फोन (किंमत २० हजार रुपये) असा एकूण १३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये सिव्हील लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## राजगृह नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

पंचशील मित्र मंडळ व सुजाता महिला मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी राजगृह नगर येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

सकाळच्या सत्रात मंडळाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या उत्साहात एकत्र आले. त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. ''जय भीम''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी आमदार हरीश पिंपळे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. समानता, बंधुता आणि शिक्षण या मूल्यांचा स्वीकार केल्यास समाज निश्चितच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन नगरसेवक संदीप सरनाईक व नगरसेविका शुभांगी सरनाईक यांनी केले. कार्यक्रमात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. सुजाता महिला मंडळाच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग घेत कार्यक्रमाच्या यशस्वीतेत मोलाची भूमिका बजावली. तसेच मूर्तिजापूरात प्रथमच सातारा येथील 'विघ्नहर्ता लॉईडली साऊंड' डीजेच्या तालावर नागरिकांनी उत्स्फूर्त नृत्य करत आनंद व्यक्त केला.

# शासनाच्या धोरणांविरोधात शिक्षक सेनेने व्यक्त केला संताप

**अकोला / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने राज्यभर शिक्षकविरोधी धोरणांविरोधात आंदोलन छेडण्यात आले असून, अकोला जिल्ह्यातही शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. राज्याध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर जिल्हाध्यक्षांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात आले. यावेळी अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रा. नरेंद्र लखाडे, जिल्हाध्यक्ष देवानंद मोरे व प्रा. प्रवीण राठोड, सचिव सुधाकर भाकरे, तसेच जिल्हा व तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर



शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. अरविंद मोहोरे यांना शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी डॉ. साबिर कमाल, प्रा. संतोष अहिर, प्रा. विठ्ठल पवार, प्रा. संतोष वाघ, अमोल गुडघे, अब्दुल गणी गणीभाई , पंकज अग्रवाल, फैयाज पठाण, उपजिल्हाप्रमुख प्रकाश बुंदे, कार्याध्यक्ष पंकज आमले, प्राचार्य सुभाषचंद लखाडे, गजानन ढाले, अंकुश कुकडे, आदित्य राऊत, नितीन मानके, प्रा. धरमकर, मुख्याध्यापक अनिल धर्मे, अनिल आहेस्कर, सुधाकर भाकरे, भास्कर काळे, विठ्ठल पवार, पंकज जाधव, पंकज साबिले, प्रा. विजय भांडे, प्राचार्य प्रवीण ढोणे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रा. नरेंद्र लखाडे यांनी सडेतोड भाषण करत शासनाच्या धोरणांवर टीका केली. शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करत, पुढील लढा रस्त्यावर उतरून देण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### अशा आहेत प्रमुख मागण्या

- अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासंदर्भातील सेवा शर्ती नियमावली १९८१ मधील नियम २६(२)(३) पायदळी तुडवून केलेली कार्यवाही त्वरित रद्द करावी.
- २ ते ६ वर्षांपासून थकीत असलेले देयक तात्काळ निकाली काढावेत व निधी परत जाण्यास कारणीभूत घटकांवर कारवाई करावी.
- बीएलओचे अशैक्षणिक काम शिक्षकांवर लादू नये ; उच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करावी.
- परीक्षा काळातील पट पडताळणीचे नियमबाह्य आदेश रद्द करावेत.
- शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला नियमित द्यावे. जुनी पेन्शन योजना लागू करावी.
- टीईटी धोरण रद्द करून रात्रीच्या शाळांतील शिक्षकांचे वेतन नियमित करावे.

### तर आंदोलन तीव्र करू

- शिक्षक सेनेच्या प्रलंबीत मागण्या शासनाने तातडीने पूर्ण न केल्यास शिक्षकांचे आंदोलन अधिक तीव्र करू, असा इशारा शिक्षक सेनेतर्फे यावेळी देण्यात आला.

# अल्पवयीन मुलीला मारहाण ; आरोपीस कारावास

**अकोला / प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्या घरी घुसून मारहाण केल्याप्रकरणी आरोपीस अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे.

जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१ यांनी दिलेल्या निकालानुसार आरोपी शुभम विठ्ठल आरखराव (वय २८, रा. आगीखेड, ता. पातुर, जि. अकोला) याला ५ महिन्यांचा कारावास व २,५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. प्रकरणातील माहितीनुसार, ६ सप्टेंबर २०१८ रोजी पातुर पोलीस ठाण्यात फिर्यादीने आपल्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या घटनेची तक्रार दाखल केली होती. आरोपी शुभम आरखराव हा पीडितेचा पाठलाग करत तिच्याकडे वाईट नजरेने पाहून त्रास देत होता. ५ सप्टेंबर २०१८ रोजी पीडिता घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरी घुसला. त्याने तिला लग्नाची मागणी घालत नकार दिल्यास स्वतःच्या जीवाचे बरेवाईट करण्याची धमकी दिली आणि तिच्या गालावर चापट मारली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पातुर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०३/२०१८ अंतर्गत भादंवि कलम ३५४(ड), ३२३, ४५२, ५०६ तसेच पोक्सो कायद्यांतर्गत कलम ८ व १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक विजय महाले यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

न्यायालयात एकूण ५ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. फिर्यादी, पीडिता व इतर साक्षीदारांच्या साक्षीच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. भादंवि कलम ४५२ अंतर्गत ५ महिन्यांचा कारावास व २,५०० रुपयांचा दंड, तर दंड न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद ठोठावण्यात आली. तसेच कलम ३२३ अंतर्गत २ महिन्यांची साधी कैद सुनावण्यात आली आहे. दंडाच्या रकमेपैकी २,००० रुपये पीडितेला नुकसानभरपाई म्हणून देण्याचेही आदेश न्यायालयाने दिले. या खटल्यात सरकारी पक्षाची बाजू सरकारी अभियोक्ता राजेश अकोटकर यांनी मांडली.

# तेल्हारा येथे स्मार्ट मीटरने वाढवली डोकेदुखी

**गोकुळ हिंगणकर**

**तेल्हारा :** तालुक्यात महावितरणकडून सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेवरून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः वीज बिलांमध्ये अचानक झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी सरासरी २५० रुपयांच्या आसपास येणारे वीज बिल काही



ठिकाणी थेट २५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसवल्यानंतरच बिलात वाढ झाल्याचा आरोप केला जात आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर मीटर बसविताना पुरेशी माहिती न देता घाईगडबडीत काम करण्यात येत असल्याचेही सांगितले जात आहे. काही ठिकाणी नागरिकांनी विरोध दर्शविल्यानंतरही तो डावलला गेला असल्याची भावना व्यक्त होत आहे. तसेच मीटर बसविण्यास नकार देणाऱ्यांना पोलिस कारवाईची भीती दाखवली जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्मार्ट मीटरबाबत सावध भूमिका घेत ''स्मार्ट मीटर बसवू नयेत'' असा मुद्दा मांडल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणकडून सुरू असलेल्या मोहिमेबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दुसरीकडे, महावितरणचे अधिकारी स्मार्ट मीटर अचूक असून ग्राहकांच्या हितासाठीच ही योजना राबविली जात असल्याचा दावा करत आहेत. सर्वांनी स्मार्ट मीटर बसवून घ्यावेत, असे आवाहनही करण्यात येत आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक तक्रारी असूनही अधिकाऱ्यांकडून ''एकही तक्रार प्राप्त नाही'' असे सांगितले जात असल्याने नागरिकांचा संताप अधिक वाढला आहे.

## जिल्हाधिकारी मीना : बालविवाह टाळण्यासाठी दक्षतेचे आवाहन

# अक्षय तृतीयेला बालविवाह लावल्यास होणार गुन्हे दाखल

**अकोला / प्रतिनिधी**

अक्षयतृतीया १९ एप्रिल रोजी असून यादिवशी अनेक ठिकाणी विवाह सोहळे आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाह सुध्दा मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या दिवशी बालविवाहच्या घटना आढळल्यास थेट गुन्हे दाखल होणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी स्पष्ट केले. तसेच जिल्ह्यात कुठेही बालविवाह होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

अक्षयतृतीयेचा मुहुर्त हा शुभमुहुर्त असुन त्यावेळी सामुदायिक तसेच एकल विवाह



समारंभ आयोजीत केले जातात. विवाहाकरिता शासनाने मुलांचे वय २१ वर्ष व मुलींचे वय १८ वर्ष निश्चीत करण्यात आले आहे यापेक्षा कमी वयाचे मुलामुलींचा विवाह झाल्यास तो विवाह बालविवाह ठरतो व असे विवाह बालविवाह प्रतिबंध अधिनीयम २००६ नुसार बेकायदेशीर ठरतात. अशा कृतीविरोधात गुन्हा नोंदविला जातो. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी असुन शहरी भागासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी हे बालविवाह प्रतिबंधअधिकारी आहेत. गावांमध्ये ग्राम बाल संरक्षण समित्या गठितअसुन सरपंच हे त्या समितींचे अध्यक्ष आहेत. पोलीस पाटील हे सदस्य आहेत पोलीस पाटील हे गाव व पोलीस ठाणे यांना जोडणारा मुख्य दुवा आहे. सरपंच पोलीस पाटील व ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांना आवाहन करण्यात येते की, गावात जर कोणाचा विवाह ठरल्यास त्यांच्या वयाची खात्री करावी व अक्षय तृतीयेला गावात होणारे विवाह सोहळयांमध्ये बालविवाह होणार नाही याची दक्षता सरपंच पोलीस पाटील व ग्रामसेवक व पोलीस विभाग यांनी घेणे आवश्यक आहे.

### तर वाजंत्रींवरही दाखल होणार गुन्हे

- बालविवाह झाल्यास विवाह सोहळयामध्ये सहभागी होणारे, वाजंत्री, मंगल कार्यालये, बिछायत केंद्र, विवाह विधी पार पाडणारे मुलामुलींचे आई वडील या सर्वांवर गुन्हे दाखल होवू शकतात. बालविवाह झाल्यास दोन लाख रूपये दंड व २ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षेचे प्रावधान या कायदयात आहे तरी बालविवाह होणार नाही याबाबत सर्वानी दक्ष राहून अकोला जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत.

### १०९० व ११२ टोल फ्री क्रमांकावर माहिती द्या

- गावात बालविवाह ठरला असेल तर त्या बाबत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ आणि पोलिस विभागा चे ११२ या टोल फ्री क्रमांकावर माहिती द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना अकोला यांनी केले आहे.

## ग्रामीण विकासासाठी एकजूट आवश्यक : आ. पिंपळे

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी ठोस नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार हरिष पिंपळे यांनी केले. शेलुवेताळ येथील वेताळ बाबा संस्थान परिसरात गुरुवारी सन २०२५-२६ या वर्षाची वार्षिक आमसभा तसेच सरपंच व उपसरपंच शिबिर उत्साहात पार पडले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात आमदार पिंपळे होते. तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. प्रारंभी गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांनी आमदारांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रास्ताविकात मोरे यांनी तालुक्यातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा सादर केला. यावेळी उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, गटशिक्षणाधिकारी वैशाली रामटेके, तालुका वैद्यकीय अधिकारी, बालविकास अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आरोग्य, शिक्षण, महसूल व ग्रामविकास विभागांच्या कामकाजाची सखोल समीक्षा करण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

न्यूज ब्रीफ

## आज चार तास वीजपुरवठा खंडित

**खामगाव :** शहरातील काही भागात शनिवार १८ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित राहणार आहे. रस्ता व पूल रुंदीकरणाच्या कामामुळे ही वीज बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती वीज वितरण विभागाकडून देण्यात आली आहे. अग्रसेन भवन परिसर, पोलीस स्टेशन रोड, नटराज गार्डन परिसर, बालाजी प्लॉट आणि देशमुख प्लॉट या भागांमध्ये वीजपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे संबंधित परिसरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वीज खंडित राहणार असल्याने नागरिकांनी मोबाईल, लॅपटॉप यांसारखी उपकरणे पूर्वतयारी म्हणून चार्ज करून ठेवावीत. तसेच पिण्याचे व वापरासाठी लागणारे पाणी साठवून ठेवावे, जेणेकरून कोणतीही गैरसोय होणार नाही. असे आवाहन सहाय्यक अभियंता, खामगाव शहर (विभाग-१) यांनी केले आहे.

## पाण्याच्या शोधात बिबट्या विहिरीत पडला

**खामगाव :** पाण्याच्या शोधात असलेला बिबट एका शेतातील विहिरीत पडल्याची घटना १६ एप्रिल रोजी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच वनविभागने रेस्क्यू करत सदर बिबट्याला विहिरीबाहेर काढून सुखरूप जंगलात सोडून दिले. खामगाव तालुक्यातील गणेशपूर शिवारातील निरोड शेत शिवारात बाळु दगडु मार्कड यांचे मालकीचे शेत गट क्र. ३४६ मधील विहीरीत वन्यप्राणी बिबट पडल्याची माहिती गजानन काळे पोलीस पाटील निरोड यांनी दिली. माहिती मिळताच रेस्क्यू टिम सर्व साहित्यासह घटनास्थळी पोहचून सदर वन्यप्राणी बिबट (नर) अंदाजे वय ४ वर्षे पिंजऱ्याच्या साहाय्याने रेसक्यु करुन जेरबंद केले.

## खरीप पीक विम्यावर माहिती देण्याची मागणी

**जळगाव जामोद :** खरीप हंगाम २०२५ अंतर्गत पिक विमा योजनेबाबत जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आंदोलक प्रकाश विठ्ठल भिसे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडे सविस्तर माहिती देण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले आहे. या निवेदनामध्ये नमूद आहे की, अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत स्पष्ट माहिती मिळत नसून, कोणत्या महसूल मंडळांना पिक विमा मंजूर झाला आहे. याबाबत पारदर्शकता नाही. बुलढाणा जिल्ह्यातील एकूण किती महसूल मंडळांना खरीप २०२५ पिक विमा मंजूर झाला आहे, याची माहिती जिल्ह्यातील सर्व तालुके व संबंधित महसूल मंडळांची यादी प्रत्येक तालुक्यातील कोणत्या महसूल मंडळांना विमा मंजूर झाला याचा तपशील महसूल मंडळनिहाय पात्र शेतकऱ्यांची संख्या प्रशासनाने तात्काळ ती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

वाडी येथील घटना : मोठा अनर्थ टळला

# हॉटेलमध्ये सिलेंडरचा स्फोट; विद्यार्थिनींसह दोनजण गंभीर

**खामगाव/प्रतिनिधी**



शहरापासून जवळच असलेले वाडी गाव सिलेंडर स्फोटामुळे हादरले आहे. बंद असलेल्या एका हॉटेल मध्ये अचानक सायंकाळच्या वेळेस कमर्शियल सिलेंडरचे एकामागे एक असे दोन स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत एक टेलर व्यवसायीक आणि एक विद्यार्थीनी गंभीर जखमी झाल्याची घटना १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेदरम्यान उघडकीस आली आहे.

खामगाव शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या ग्राम वाडी परिसरात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था आहेत. याठिकाणी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, आयटीआय, गो. से. महाविद्यालय आदी मोठे महाविद्यालये असून मोठ्या संख्येने खाजगी रूग्णालये सुध्दा आहे. त्यामुळे हॉटेल आर्या याठिकाणी मोठ्या संख्येने विद्यार्थी मेसच्या जेवणासाठी येतात. परंतु १७ एप्रिल रोजी हॉटेल बंद होती.

दरम्यान सायंकाळी अचानक सिलेंडरच्या स्फोटाचा आवाज आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. लगेच हॉटेलमधून धूर बाहेर येत असल्याचे निदर्शनास येताच नागरिकांनी तातडीने न.प. च्या अग्निशमन दलाला पाचारण केले. थोड्या वेळाने आणखी दुसऱ्या सिलेंडरचा स्फोट झाला. त्यामुळे आगीने चांगलेच रौद्ररूप धारण केले होते. हॉटेल आर्या ही अरविंद गोविंद कोलते रा. वाडी यांच्या मालकीची असून त्यांनी गावातीलच इश्वर इंगळे नामक व्यक्तीला मेस चालविण्यासाठी भाड्याने दिली होती. सदर हॉटेलमध्ये दोन कमर्शियल सिलेंडर हॉटेल चालकाने भरून ठेवले होते. हॉटेल आर्या च्या शेजारी नागरिकांची घरे आहेत. झालेल्या सिलेंडर स्फोटामुळे सर्व नागरिक घराबाहेर पडले होते. या आगीत संपूर्ण हॉटेल आणि त्यातील साहित्य जळून खाक झाले तर हॉटेल समोर उभी असलेली नवीन दुचाकीसुध्दा जळून खाक झाली. वेळीच अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून बंबाचा मारा करत आग आटोक्यात आणली. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला. यावेळी घटनेची माहिती मिळताच शहर पोस्टेचे ठाणेदार रामकृष्ण पवार यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेवून हॉटेल परिसरातून नागरिकांना हटविले. तसेच घटनास्थळी नगराध्यक्ष पती सागर फुंडकर यांनी भेट देवून पाहणी केली.

### दोघांची प्रकृती चिंताजनक

■ हॉटेल आर्याचे वर काही विद्यार्थी रूम घेवून भाड्याने राहत होते. स्फोटाचा आवाज आणि आगीने पेट घेतल्याने हॉटेलच्या वरील रूममधील तीन ते चार विद्यार्थी घाबरल्या होत्या. तर त्यातील एक विद्यार्थीनी कादंबरी गजानन सोनटक्के (२०) हिने घाबरून स्वतचा जीव वाचविण्यासाठी वरून खाली उडी घेतली. त्यामुळे तिच्या तोंडाला गंभीर इजा होवून ती बेशुध्द झाली होती. तसेच इतर विद्यार्थीनींना रूममधून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. तर हॉटेलच्या बाजूला असलेले टेलर अशोक अनोकार (७०) हे सुध्दा लागलेल्या आगीत भाजल्या गेल्याने गंभीर जखमी झाले. जखमींना नागरिकांनी तातडीने जवळील एका खाजगी रूग्णालयात उपचारार्थ भरती केले. दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

# वारकरी सांप्रदायाच्या मागण्यांसाठी निवेदन

## मागण्या मान्य न झाल्यास उपोषण

**खामगाव/प्रतिनिधी**



वारकरी धर्मरक्षक महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १६ एप्रिल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारांमार्फत बारकरी सांप्रदायाच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. तहसीलदार सुनिल पाटील यांनी वारकऱ्यांचे निवेदन स्वीकारले.

निवेदनात वारकरी समाजाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये वारकरी मानधनासाठी असलेली ५० वर्षांची वयोमर्यादा रद्द करावी, भजनी महिला मंडळांना वार्षिक २५ हजार रुपयांचे अनुदान सुरू करावे, प्रलंबित मानधन अर्ज तातडीने मंजूर करावेत, तसेच जिल्हा मानधन समिती स्थापन करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय वारकरी संप्रदायाशी निगडित पवित्र इंद्रायणी नदी केमिकलमुक्त करण्याची मागणीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. शासनाने या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, अन्यथा वारकरी बांधवांच्या वतीने बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर ह.भ.प. अर्चना बावस्कर, ह.भ.प. सचिन पाटील येरळीकर, ह.भ.प. सपना मांजरे, ह.भ.प. प्रल्हाद महाराज राऊत, ह.भ.प. गोविंद महाराज शिबरे, ह.भ.प. परमेश्वर महाराज घनोकार, ह.भ.प. गजानन विधनाथ विगळे, ह.भ.प. विमल पिसे, चंदा कुबटे, ह.भ.प. ज्योती वाघमारे, संदीप बहुरूपी आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मोकाट प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करा ; एकनिष्ठाचे पालिकेला निवेदन

**खामगाव/प्रतिनिधी**



शहरात रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट गाई आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तसेच जनावरांना मोकाट सोडणाऱ्या मालकांवर कायदेशीर कारवाई करावी. अशा आशयाचे निवेदन एकनिष्ठा गौ फाऊंडेशनच्या वतीने न.प. मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, वाढत्या तापमानामुळे मोकाट प्राण्यांना पिण्याचे पाण्याची सोय होत नाही आणि त्या प्राण्यांची योग्य काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शहरभर ठिकठिकाणी गाय आणि इतर मोकाट प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी, महाराष्ट्र सरकारनी गौ मातेला राज्यमातेचा दर्जा दिलेला आहे. परंतु सध्या तिचे भयंकर हाल होत आहे. खामगाव शहरामध्ये मुख्य योग्य ठिकाणी प्राण्यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करून द्यावी. व तसेच जे गौ पालक आहेत ते आपल्या मालकीचे गौ वंश रस्त्यावर मोकाट सोडून देतात. काही मोकाट गुरे रोज बेवारस परिस्थितीत रोडवर असतात याचा फायदा घेत काही चोरटे गौ तस्करी करत आहे. सध्या गौ वंश चोरीच्या घटनेत वाढ होत चाललेली आहे. भविष्यात पुन्हा अश्या घटना घडू नये या करीता नगर पालिकेने जे रस्त्यावर मोकाट गौ वंश सोडतात, त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी आणि प्लास्टिक पॉलिथिंग बंद करावी. सदर निवेदनाची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने नगर पालिके समोर मोठे आंदोलन छेडू असा ईशारा एकनिष्ठा गौ सेवा कडून देण्यात आला. या निवेदनावर सुरज यादव, लता गावडे, गौरव कवटेकर, राजु बोर्डे, प्रदीप शमी, निखिल शर्मा, दिपीका वाकोडे, सुरेंद्र चव्हाण, जसविंदर सिंग, विठ्ठल लोखंडकार, अरविंद शिंदे, हरीदास गव्हाणे, मंगेश राखोंडे, रितेश पवार, गणेश जाधव, सिद्धांत उंबरकार, अविनाश विभुते, निलेश इंगळे, जितेंद्र इंगळे, सुरेश नांदोकार, निलेश बरदिया, आनंद देवताळू, अरुण डवले, निलेश राजपूत, संतोष ईटनारे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जेसीबी चालाकाला बेदम मारहाण ; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**खामगाव/प्रतिनिधी**

केवळ गाडीचा दरवाजा बंद करण्यास सांगितल्याच्या किरकोळ कारणावरून चौघांनी मिळून जेसीबी चालकाला लाथाबुक्क्यांनी व काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना जळका भडंग शिवारात घडली. या प्रकरणी पिंपळगाव राजा पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पवन रामदास क्षीरसागर (२६, रा. शंकरनगर, पिंपळगाव राजा) हे जेसीबी ऑपरेटर म्हणून कार्यरत आहेत. १६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास त्यांचे जेसीबी वाहन बिघडल्याने ते सहकाऱ्यासह दुरुस्तीसाठी खामगावकडे जात होते. यावेळी जळका भडंग गावाजवळील वाकुड फाट्यावर आरोपींची चारचाकी गाडी उभी असल्याचे त्यांना दिसून आले.

सदर गाडीचा दरवाजा उघडा असल्याने अपघाताचा धोका टाळण्यासाठी पवन क्षीरसागर यांनी संबंधितांना 'दरवाजा लावून घ्या' अशी सूचना केली. मात्र, या साध्या सूचनेचा राग मनात धरत आरोपी रवी सोळंके याने क्षीरसागर यांच्यावर अचानक लाथाबुक्क्यांनी हल्ला चढवला. या हल्ल्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली आणि महेंद्र दामोदर याने हातातील काठीने क्षीरसागर यांच्यावर वार केले. तसेच, अरविंद दामोदर आणि कपिल दामोदर यांनीही संगनमत करून क्षीरसागर यांना चापटबुक्क्यांनी मारहाण केली. या चौघांच्या मारहाणीत पवन क्षीरसागर जखमी झाले असून त्यांना वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, या प्रकरणी जखमी पवन क्षीरसागर यांनी पिंपळगाव राजा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून संबंधित चारही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून घटनेचा अधिक तपास सुरू असून आरोपींच्या अटकेसाठी हालचाली करण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या किरकोळ कारणावरून घडणाऱ्या हिंसक घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# पारखेड येथे बॅनरची तोडफोड ; अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल

**खामगाव/प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या पारखेड (ता. खामगाव) येथे डिजिटल बॅनर फाडून अज्ञात व्यक्तीने तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खामगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

मिलींद जनार्धन बांगर (३६) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका नवयुवक क्रीडा मंडळाच्या वतीने ग्राम पारखेड येथील नवीन बसस्थानकावर डिजिटल बॅनर लावण्यात आला होता. १६ एप्रिल रोजी सायंकाळी साडेआठ वाजण्यापूर्वी अज्ञात इसमाने या बॅनर फाडून धार्मिक भावना दुखावल्याचा प्रकार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी भारतीय न्याय सहिता कलम २९९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक किशोर तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे गुरुवारी रात्री गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शुक्रवारी पहाटेपर्यंत परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोस्टरवरील प्रतिमांची विटंबना झाल्यानंतर गावात तणाव निर्माण झाला होता. मात्र, पोलिसांनी वेळीच घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

# कमर्शियल सिलेंडर व केरोसीन तात्काळ उपलब्ध करून द्या

## शिवसेना उबाठाची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

**मलकापूर/प्रतिनिधी**

मलकापूर व नांदुरा तालुक्यात सिलेंडरची भीषण टंचाई निर्माण झाली असून घरगुती तसेच कमर्शियल सिलेंडर मिळत नसल्याने मलकापूर, नांदुरा तालुक्यात गॅस धारकांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे परिसरातील सर्व हॉटेल, चहा टपरी धारक व ढाबेवाल्यांना तात्काळ कमर्शियल सिलेंडर व केरोसीन तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना उबाठाकडून तहसीलदार यांचेकडे करण्यात आली.

निवेदनात नमूद आहे की, सिलेंडरच्या तुटवड्यामुळे नागरिकांना गॅस एजन्सी पुढे पहाटे सहा वाजेपासून सिलेंडरसाठी दिवसभर भर उन्हात लाईन लावून ताटकळत उभे राहावे लागत आहे. तसेच व्यावसायिक सिलेंडर मिळत नसल्याने छोटे खानी हॉटेल, चहा टपरीधारक, ढाबे वाल्यांचे रोजगार बंद झाले आहे.

शासनाने डिझेल व पेट्रोल ही बाटली, कॅनमध्ये देणे बंद केले असल्यामुळे शेती मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांसमोर मोठा यक्ष प्रश्न उभा ठाकला आहे. केरोसीन ही उपलब्ध नसल्याने हॉटेल वाल्यांचे धंदे पूर्णतः बंद पडले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी शासनाने या छोट्या हातमजुरी करणाऱ्या धंदेवाल्यांना केरोसीन उपलब्ध करून द्यावे व पेट्रोल पंप धारकांना शेतकऱ्यांना पेट्रोल डिझेल, कॅन, बाटलीमध्ये देण्याचे सुचित करावे, अशी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांच्या मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास, बाळू पोलाखारे, किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार, गजानन मेहेंगे, अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै.रहीम, शिवसेना नगरसेवक शेख निजामभाई, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, माजी न.प उपाध्यक्ष महादेव वनारे, माजी नगरसेवक पांडुरंग चिम, शेख मोहसीन सह शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# अपुर्ण रस्त्याचे काम पूर्ण करा ; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**खामगाव/प्रतिनिधी**

शहरातील दत्तगुरु मोबाईल शॉप, जयस्वाल शॉप, परिवार ड्रेसेस व अशोक गेस्ट हाऊस परिसरातील सिमेंट रस्त्याचे काम मागील सुमारे एक वर्षापासून अर्धवट अवस्थेत असल्यामुळे स्थानिक व्यापारी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सदर रस्त्यावर माती व मुरूम टाकून काम अपूर्ण ठेवण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. दुकाने व घरांमध्ये धूळ शिरत असल्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. तक्रारीनंतर प्रशासनाकडून पाणी मारण्यात आले; मात्र त्यामुळे रस्ता चिखलमय झाला असून हा चिखल दुकानांमध्ये शिरत आहे. परिणामी ग्राहकांची ये-जा कमी झाली असून व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर गंभीर परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे, मागील एक वर्षापासून वारंवार तक्रारी करूनही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही अत्यंत गंभीर बाब असून यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक व्यापारी व नागरिकांनी संबंधित कामाबाबत निवेदन वजा तक्रार दिली आहे. जर तात्काळ रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यात आले नाही, तर संबंधित व्यापारी व नागरिकांकडून लवकरच लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर उत्साहात

# नागरिकांनी तंत्रज्ञान अवगत करणे काळाची गरज : डॉ. रामेश्वर पुरी

**खामगाव/प्रतिनिधी**




नागरिकांनी सध्याच्या एआयच्या युगात तंत्रज्ञान अवगत करून सहज प्रणालीचा वापर करावे, असे आवाहन उपविभागीय महसूल अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी केले.

राजस्व मंडळ हिवरखेड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत शिबिराचे आयोजन श्री बिंद्राबन बाबा संस्थान, हिवरखेड येथे करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत हिवरखेडच्या प्रशासक मंदाताई संदीप हटकर या होत्या.

या शिबिरास खामगावचे उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वरजी पुरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच निवडणूक विभागाचे नायब तहसिलदार अभिजीत जोशी, संजय गांधी विभागाचे नायब तहसिलदार शिरीष वसावे, माजी उपसरपंच गजानन आठवले तसेच जेष्ठ नागरिक गोपाळ भाऊ हटकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना डॉ. रामेश्वर पुरी म्हणाले की, प्रशासनाकडून सर्व दस्त आणि कागदपत्रांचे स्कॅनिंग झालेले असून ती सर्व कागपत्रे आपण घरीच उपलब्ध करून घेवू शकतो.

आता नागरिकांना कागदपत्रांसाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता नसल्याचे म्हणत नागरिकांनी टेक्नोसेव्ही होण्याचे आवाहन डॉ. रामेश्वर पुरी यांनी केले. कार्यक्रमादरम्यान नागरिकांना जिवंत सातबारा मोहीम, विशेष अर्थसहाय्य विभागाच्या विविध योजना, आरोग्य विभागाच्या योजना तसेच पोटहिस्सा मोजणीसंदर्भातील शासकीय निर्णयाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बीबी केअर किट, पशुसंवर्धन विभागामार्फत शेळी वाटप मंजुरी आदेश, विविध प्रमाणपत्रे, सातबारा, आठ अ, फेरफार आदी दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

### शिबिरात २७६ लाभार्थ्यांना लाभ

■ या शिबिरात विविध विभागांमार्फत लाभार्थ्यांना सेवा देण्यात आली असून, संगणक विभाग ४२, सेतू विभाग ३५, भूमिअभिलेख १८, पुरवठा विभाग २२, आरोग्य विभाग २०, कृषी विभाग १७ आणि महसूल विभाग १२२ अशा एकूण २७६ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. यावेळी हिवरखेड मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक तसेच जोडलेल्या मंडळातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ११ केव्ही विद्युत लाईन प्रकरणी उपोषण मागे ; प्रशासनाच्या आश्वासनानंतर तोडगा

**संग्रामपूर/प्रतिनिधी**



तालुक्यातील वरवट बकाल बस स्थानक परिसरातील ११ केव्ही विद्युत लाईन संदर्भात सुरू असलेले आमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. संबंधित प्रकरणात एमएसकेव्हीवाय सप्तम सौर एसपीव्ही लिमिटेडकडून दिलेल्या लेखी निवेदनानंतर हा निर्णय घेण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, मोमिनाबाद ते वरवट बकाल उपकेंद्रादरम्यान असलेल्या ११ केव्ही लाईनच्या सुरक्षित देखभाल आणि दुरुस्तीबाबत कंपनीने स्पष्ट भूमिका मांडली. गेल्या २५ वर्षांपासून या लाईनची देखभाल सर्व सुरक्षा मानके आणि अधिकृत कार्यपद्धतीनुसार केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनात शटडाउन परवानगी, वैयक्तिक सुरक्षा उपकरणांचा (पीपीई ) वापर, तसेच तांत्रिक देखरेख यांसारख्या सर्व आवश्यक उपाययोजना काटेकोरपणे राबविल्या जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच महावितरणच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून विद्युत पुरवठ्याची सुरक्षितता आणि विश्वासार्हता राखण्यास कंपनी कटिबद्ध असल्याचेही सांगण्यात आले. सदर पत्र संग्रामपूर येथील वीज वितरण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांमार्फत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे तालुका अध्यक्ष देवराव शामराव सोळंके यांना सुपूर्द करण्यात आले. प्रशासनाच्या या भूमिकेनंतर उपोषणकर्त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपले आमरण उपोषण तात्काळ मागे घेतले. या निर्णयामुळे परिसरातील तणाव कमी झाला असून नागरिकांनीही समाधान व्यक्त केले आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादातून मार्ग निघाल्याने भविष्यात अशा समस्यांवर समन्वयाने तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यावेळेस वरवट बकाल बस स्थानक वर आमरण उपोषण सोडवत असताना भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव गुलाबराव नांदोकार, वरवट बकाल येथील पोलीस पाटील सिद्धूधन इंगळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष इगोकार, किशोर फाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संजू इंगळे, नामदेव ढगे, रवींद्र बकाल, प्रल्हाद चिमकर, प्रकाश इगोकार, देवानंद दमदार, बाळू पाटकर, सुरज इंगळे, अंकुश इंगळे, अर्जुन सोळंके, नंदू इंगळे या सर्वांच्या उपस्थितीत तामगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी वरवट बकाल बीट अमलदार, बोरसे यांच्या समक्ष वरवट बकाल विद्युत वितरण केंद्रचे हेमंत कांबळे यांनी लेखी पत्र देऊन उपोषण करते देवराव शामराव सोळंके भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे तालुका अध्यक्ष यांचे आमरण उपोषण सोडविले.

दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

शनिवार । १८ एप्रिल २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

न्यूज ब्रीफ

### रिसोड तालुक्यात चोरांचा धुमाकूळ

**रिसोड:** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांकडून घरफोडी, दुकानफोडी तसेच दुचाकी चोरीच्या घटना सातत्याने घडत असल्याची माहिती समोर येत आहे. काही भागांत संशयितांच्या हालचाली दिसून आल्याने नागरिकांनी सतर्कता वाढवली असून अनेकांनी घरांच्या सुरक्षेकडे अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली आहे.

### जयंती मिरवणुकीत वाद ; गुन्हे दाखल

**कामरगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पिंपरी मोडक येथे काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान काही तरुणांच्या वर्तनामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. मिरवणूक सुरू असताना काही जणांनी एका घरात निळी पूड फेकल्याने कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर मंदिर परिसरात घोषणाबाजी व किरकोळ हुल्लडबाजी झाल्याने तणाव वाढला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गणेश शिंदे यांच्या तक्रारीवरून १० जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### बालविवाह रोखण्याचे दिले निर्देश

**वाशिम :** अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कुठेही बालविवाह होऊ नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. बाल विवाहाची माहिती मिळाल्यास १०९८ या हेल्पलाईनवर कळवावे, केले. बालविवाह रोखण्यासाठी पोलीस पाटील, सरपंच, शिक्षक, मंगल कार्यालय चालक, बँडवाले, हॉटेल चालक व विवाह विधी करणाऱ्यांनी जबाबदारी पार पाडावी.

तापमान ४२ ते ४३ अंशांवर; बाष्पीभवन वाढल्याने जलसाठा होतोय कमी


## पाणीटंचाईची चाहूल ; एकबुर्जी-सोनल प्रकल्पाच्या जलसाठ्यात घट

वाशिम / प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे पाणीटंचाईचे सावट गडद होत असून प्रमुख प्रकल्पांतील जलसाठा झपाट्याने कमी होत आहे. १६ एप्रिलच्या अहवालानुसार एकबुर्जी प्रकल्पात केवळ २७.०७ टक्के, तर सोनल प्रकल्पात अवघे २२.७५ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे.

गत काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमान ४२ ते ४३ अंशांच्या दरम्यान नोंदवले जात आहे. वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याचा थेट परिणाम प्रकल्पांतील पाणीसाठ्यावर होत आहे. परिणामी लघु व मध्यम प्रकल्पांची पातळी चिंताजनकरीत्या खालावली आहे. जिल्ह्यात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ताब्यात २ मध्यम व ७५ लघु प्रकल्प, तर मृद व जलसंधारण विभागाकडे ८५ लघु प्रकल्प आहेत. गतवर्षी १२३ टक्के पर्जन्यमान झाल्याने सर्व प्रकल्प तुडुंब भरले होते. मात्र, रब्बी हंगामात झालेला पाण्याचा मोठ्या प्रमाणातील वापर आणि मार्चपासून वाढलेले तापमान यामुळे सध्याची स्थिती बिकट बनली आहे.

सध्या दोन मध्यम प्रकल्पांसह बहुतांश लघु प्रकल्पांमध्ये केवळ १८ ते २५ टक्के जलसाठा उरला आहे. या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांवर जलसंकटाचे ढग दाटू लागले असून पुढील महिन्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



#### दहा गावांत विहिरींचे अधिग्रहण

■ जिल्ह्यात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सध्या १० गावांमध्ये विहिरी व बोअरवेलचे अधिग्रहण करून ग्रामस्थांना पाणीपुरवठा केला जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, ९ विहिरी व १ बोअर अधिग्रहित करून पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शासकीय जलस्रोत आटल्याने प्रशासनाला खासगी स्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे. पाणीटंचाईची तीव्रता वाढत असल्याचे यावरून स्पष्ट होत असून पुढील काळात आणखी उपाययोजनांची गरज भासण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### पाणी जपून वापरण्याची गरज

■ वाशिम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी धरणातील जलसाठा सातत्याने घटत असून नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गत आठवड्यात धरणात ३.३८ दलघमी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता. मात्र, सात दिवसांत ०.१४ दलघमीने घट झाली आहे. वाढत्या उन्हामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला असून पाण्याचा वापरही वाढल्याने साठ्यावर ताण निर्माण झाला आहे. सध्या शहरातील काही भागांत आठ दिवसांनंतर पाणीपुरवठा केला जात आहे. पुढील महिन्यात पाणीटंचाईची शक्यता असून पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वाशिमकरांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

#### बॅरेजमध्ये पाण्याचा थेंब नाही

■ जिल्ह्यातून वाहणारी पैनगंगा नदी बहुतांश भागात सध्या पूर्णपणे कोरडी पडली असून नदीवरील बॅरेजमध्येही पाण्याचा मागमूस नाही. राजगाव, सोनगव्हाण, गणेशपूर व उकळी परिसरात ही गंभीर स्थिती पाहायला मिळत आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यामुळे नदीपात्र कोरडे पडल्याने पाणीटंचाईचे संकट तीव्र झाले आहे. शेतीसह पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होत असून जनावरांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. यामुळे संबंधित भागात नागरिकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून उपाययोजना करण्याची गरज आहे.

## १३३२ गटांना ५७.७२ कोटींचे कर्जवाटप

मािवमचे जिल्ह्यात ३२६७ बचत गट

वाशिम / प्रतिनिधी

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील १३३२ स्वयं सहाय्य बचत गटांना तब्बल ५७.७२ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले असून, महिला आर्थिक सक्षमीकरणाला मोठी गती मिळाली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे जिल्ह्यातील हजारो महिला स्वावलंबनाकडे वाटचाल करत आहेत.

जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमध्ये माविमतर्फे बचत गटांची स्थापना व बळकटीकरणाचे काम सुरू असून ३४५ गावांमध्ये कम्युनिटी मॅनेजमेंट रिसोर्स सेंटर च्या माध्यमातून उपक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यात आजपर्यंत ३२६७ बचत गटांची स्थापना झाली असून त्यामध्ये २८५७ ग्रामीण व ४१० शहरी गटांचा समावेश आहे. या गटांमध्ये एकूण ३३ हजार ९७ महिला सदस्य सक्रिय आहेत. विविध घटकांतील महिलांचा यात मोठा सहभाग असून त्यांनी आर्थिक शिस्त व स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला आहे. बचत गटांमार्फत महिलांनी १८.६२ कोटी रुपयांची बचत जमा केली असून अंतर्गत कर्ज व्यवहार १६.३९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. याशिवाय बँकांकडून या गटांना तब्बल २९४.२६ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध झाले आहे. महिलांच्या उद्योजकतेला चालना देण्यासाठी नव तेजस्विनी व तेजश्री प्रकल्पांतर्गत अनुक्रमे ६५ व १७५ गावांमध्ये काम सुरू असून १३ हजारांहून अधिक अतिगरीब महिलांना सुमारे ११ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. बचत गटांतील महिलांनी २५,५६२ व्यवसाय सुरू केले असून त्यामध्ये २१,२१४ शेतीआधारित तर ४,३४८ बिगर शेती व्यवसायांचा समावेश आहे.

#### १७७६ सभासदांची 'लाडकी बहीण' संस्था

■ 'माविम' अंतर्गत अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम, वॉटर ओआरजी, तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस तसेच 'लाडकी बहिण' पतसंस्था व सहकारी संस्था कार्यरत आहेत. स्मार्ट प्रकल्पांतर्गत ३ एफपीसी व १ एफपीओ स्थापन करण्यात आले असून १७७६ सभासदांची 'लाडकी बहिण को-ऑपरेटिव्ह सोसायटी' कार्यरत आहे.

## शेतात आग ; गहू, संत्रा जळून खाक

मंगरूळपीर / प्रतिनिधी

तालुक्यातील मसोला बु. येथे विद्युत वाहिनीत शॉर्ट सर्किट झाल्याने शेतातील गहू व संत्रा पिकाला आग लागून सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची घटना १५ एप्रिल रोजी दुपारी घडली.

या आगीत सुमारे २० क्विंटल गहू (अंदाजे ४० हजार रुपये), संत्र्याची सुमारे १२५ झाडे, ड्रीप सिंचन व्यवस्था, पाईपलाईन तसेच विहिरीवरील मोटार पंपाचे साहित्य जळून खाक झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



याप्रकरणी शेतकरी आशाताई नरेश मुळे यांनी वीज वितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन नुकसान भरपाईची मागणी केली आहे. संबंधित विद्युत वाहिनीची देखभाल अनेक वर्षांपासून न झाल्याने तार लोंबकळलेल्या अवस्थेत असून वारंवार शॉर्ट सर्किट होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच शेतालगत असलेल्या गणेशपूरतऱ्हाळा मार्गावरून जाणारी विद्युत लाईन खूप खाली असल्याने ती तातडीने उंच करावी व वाहिनीचे देखभाल काम करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

## अग्निशमन दलाच्या शहीद जवानांना अभिवादन

वाशिम / प्रतिनिधी

अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त वाशिम नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने मंगळवारी अग्निशमन दलातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिनाचे औचित्य साधून न.प. उपाध्यक्ष राजू भांदुर्गे व नगरसेविका माया रुपेश वाघमारे यांनी हौतात्म्य प्राप्त जवानांच्या स्मृतीस्थळी पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर उपस्थितांनी मौन पाळून मानवंदना दिली. यावेळी अग्निशमन अधिकारी अक्षय तिरपुडे यांच्यासह विभागातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमास बंटी वाघमारे, माधव वानखेडे, अनंता रंगाळ, बंडू सारस्कर, राजू वर्डे आदींची प्रमुख उपस्थिती होती. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात 'एस.एस. फोर्ट स्टिकिंग' या जहाजावरील भीषण स्फोट व आगीत ६६ अग्निशमन जवानांनी प्राणांची आहुती दिली होती. त्या बलिदानाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तसेच जनतेमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत देशभर अग्निशमन सेवा सप्ताह साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर वाशिम शहरात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. तसेच आस्थापना प्रमुख राहुल मारकड, साईनाथ सुरोशे, लीडिंग फायरमन व वाहन चालक पी. एन. सुरोशे यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.



## रिसोड शहरात पिवळसर पाणीपुरवठा

रिसोड / प्रतिनिधी

शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून नगरपालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आठवड्यातून केवळ एकदाच पाणीपुरवठा होत असून तेही पिवळसर व अस्वच्छ येत असल्याने नागरिकांचे हाल वाढले आहेत.

रामनगर, गजानन नगर व समर्थ नगर परिसरातील रहिवाशांनी सांगितले की, नळातून येणारे पाणी पिण्यास अयोग्य असून घरगुती वापरासाठीही त्रासदायक ठरत आहे. पाण्याचा रंग पिवळा व गढूळ असल्याने अनेकांनी ते



वापरणे टाळले आहे. परिणामी, नागरिकांना खाजगी टँकरमधून महागडे पाणी विकत घ्यावे लागत असून आर्थिक भार वाढत आहे. या समस्येचा परिणाम लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावरही होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

> रिसोड शहरात नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणे हा मूलभूत हक्क आहे. मात्र सध्या आठवड्यातून एकदाच आणि तेही पिवळसर, दूषित पाणीपुरवठा होत असल्याने ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडावे लागेल.
>
> – **बंडू वानखेडे,** गटनेता. न. प रिसोड

दूषित पाण्यामुळे आजारांचा धोका वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, नगर परिषद प्रशासनाकडे या संदर्भात वारंवार तक्रारी करण्यात आल्या असूनही अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही.

पाईपलाईनला गंज लागणे, जलस्रोतांची अपुरी स्वच्छता किंवा पाण्याच्या टाक्यांची अयोग्य देखभाल यामुळे पाण्याचा रंग बदलत असल्याचा अंदाज नागरिकांनी व्यक्त केला आहे. नियमित, स्वच्छ आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली असून लवकरच समस्या न सुटल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### सार्वजनिक भूखंडांवर अतिक्रमणाचा प्रयत्न

वाशिम / प्रतिनिधी

ईश्वरी कॉलनी परिसरातील न.प. मालकीच्या सार्वजनिक आरक्षित भूखंडांवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची बाब समोर आली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कारवाईची मागणी केली आहे. सर्वे नं. ३४६/१ व ३४६/२ तसेच खेळाचे मैदान व प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेली सुमारे दोन एकर जागा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही व्यक्तींकडून या जागांवर अनधिकृत कब्जाचा प्रयत्न सुरू असल्याची तक्रार मनसेचे जिल्हाध्यक्ष राजू किडसे यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## जलसंवर्धनासाठी सर्वांनी पुढे यावे : जिल्हाधिकारी

वाशिम / प्रतिनिधी

पाण्याचा कार्यक्षम व नियोजित वापर ही आजच्या काळाची अत्यंत गरज असून जलसंवर्धनासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागातर्फे १५ ते ३० एप्रिल या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६'चा शुभारंभ १५ एप्रिल रोजी पाटबंधारे उपविभाग, सिव्हील लाईन, येथे जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लघु पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता एच. डी. चव्हाण होते. तर वाशिम पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस. पी. पिद्दी व कारंजा लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता के. एम. सत्तिवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, या कृती पंधरवड्याच्या माध्यमातून जलव्यवस्थापनाबाबत जनजागृतीवर विशेष भर देणे आवश्यक आहे. पाणी वापर संस्थांसाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, महिला मेळावे, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण तसेच भूसंपादन, पुनर्वसन व उपसा सिंचन परवानग्यांशी संबंधित तक्रारींचे निरसन यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यासोबतच शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि गावपातळीवर मार्गदर्शन शिबिरे घेऊन हा उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी नमूद केले.



जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश ;नीती आयोग आढावा बैठक

## ढिलाई चालणार नाही ; इंडिकेटर सुधारणा हेच लक्ष्य

वाशिम / प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन, सुसूत्र समन्वय आणि जबाबदारीने अंमलबजावणी करून विकास साध्य करावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. नागरिकहिताचे निर्णय प्राधान्याने आणि वेळेत राबविण्यासाठी विभागांमध्ये परस्पर सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित बैठकीत त्यांनी नीती आयोगाच्या विविध निर्देशांकांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्यासह विविध विभागांचे




अधिकारी उपस्थित होते. कृषी, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला. शेतकऱ्यांना पिकांना योग्य बाजारभाव मिळावा यासाठी आवश्यक प्रक्रिया गतीमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. चिया पिकाच्या वाढत्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे नमूद करत पुढील नियोजनावर चर्चा करण्यात आली. ग्रामीण शिक्षणात गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस उपाययोजनांची गरज असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. आरोग्य सेवा आणि पशुसंवर्धनाला चालना देण्यासाठी गर्भवती महिलांची नियमित तपासणी, उपचार सुविधा आणि शासकीय रुग्णालयांचे आधुनिकीकरण यावर विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने लसीकरण मोहिमेला गती देऊन पशुधन संरक्षण सुनिश्चित करावे, असे सांगण्यात आले. युवकांसाठी कौशल्य व रोजगार संधी वाढविण्यावरही भर देत कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या तसेच विविध अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. तंत्रज्ञानाधारित कामकाजावर भर देत विभाग प्रमुखांनी फील्ड व्हिजिट वाढवून प्रत्यक्ष कामांचा आढावा घ्यावा, निधीअभावी अडचणी असल्यास प्रस्ताव सादर करावेत आणि त्यावर प्राधान्याने निर्णय घेतला जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. समन्वय, गती आणि जबाबदारी या तत्त्वांवर काम केल्यास जिल्ह्याचा विकास वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आरोग्य, शिक्षण, कृषी, ग्रामीण विकास, कौशल्य विकास, महिला व बालकल्याण, स्वच्छता व पायाभूत सुविधा या क्षेत्रांतील निर्देशांकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गेल्या तिमाहीत सुधारणा झाल्याची नोंद घेत सर्व विभागांनी निर्देशांक सुधारणा हेच प्राथमिक ध्येय ठेवून ठोस पावले उचलावीत, असे निर्देश देण्यात आले.

#### पीएमश्री शाळांमध्ये गुणवत्ता वाढवा

■ जिल्ह्यातील पीएमश्री शाळांमध्ये सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देत शिक्षणाचा दर्जा उंचावण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले. शाळांचे डिजिटायझेशन, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे आणि घटणारी विद्यार्थी संख्या रोखण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत आकांक्षित तालुक्यांतील विविध अभियानांचाही आढावा घेण्यात आला. क्षयरोगमुक्त अभियानाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी तसेच आरोग्य, स्वच्छता व पोषणाबाबत जनजागृती वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

## इंजनमधून ठिणगी ; धावत्या कंटेनरला भीषण आग

कारंजा / प्रतिनिधी

नागपूर-छत्रपती संभाजीनगर मार्गावर यावर्डी-कार्ली फाटा समोरील धानोरा (ताठोड) परिसरात मंगळवारी रात्री सुमारे ११:०५ वाजता धावत्या कंटेनरला भीषण आग लागल्याची घटना घडली. इंजिनमधून अचानक ठिणगी पडल्याने वाहनाने पेट घेतला आणि काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. दरम्यान, आगीमुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. मात्र परिस्थिती नियंत्रणात



आल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. याचवेळी जवळ उभा असलेला एक सीएनजी कंटेनर घाबरून रस्त्याच्या खाली उतरल्याची घटना घडली, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या कारवाईत सचिन बैस, शुभम झोपाटे, इम्रान खान, अनुराग बारबोले, राहुल गुल्हाने, मुकेश सावळे, सादिक खान तसेच चालक चंदू खराडे व जाहेद अली यांनी सहभाग घेतला. ही संपूर्ण कारवाई अधिकारी विवेक वळसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## थेट कॅप्टनवर संशय; आयसीसीकडून चौकशी

# टीम इंडियाने जिंकलेल्या टी-20 वर्ल्डकपमध्ये मॅच-फिक्सिंग



**दुबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने क्रिकेट कॅनडाशी संबंधित भ्रष्टाचार, संघ निवडीत हस्तक्षेप आणि मॅच-फिक्सिंगच्या गंभीर आरोपांची चौकशी सुरू केली आहे. एकावृत्तानुसार, या चौकशीचा मोठा भाग १७ फेब्रुवारी २०२६ रोजी चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर कॅनडा आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या टी-२० विश्वचषक सामन्याशी संबंधित आहे, ज्यात किवी संघाने ८ गडी राखून विजय मिळवला होता. कॅनडाचा कर्णधार दिलप्रीत बाजवाने टाकलेल्या एका षटकावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. तो न्यूझीलंडच्या डावातील पाचवे षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला होता. त्यावेळी न्यूझीलंडची धावसंख्या ३५ धावांवर दोन गडी बाद अशी होती. कॅनडाने सुरुवातीची ष ट के वेगवान गोलंदाजांकडून टाकली होती, पण त्यानंतर त्यांनी फिरकी गोलंदाजीचा आधार घेतला.

दिलप्रीत बाजवाने आपल्या षटकाची सुरुवात नो-बॉलने केली आणि त्यानंतर एक वाईड चेंडू टाकला. बाजवाने त्या षटकात १५ धावा दिल्या. आता या प्रकरणी प्रश्न उपस्थित केले जात असून, त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. अद्याप कोणत्याही खेळाडू किंवा अधिकाऱ्यावर औपचारिक आरोप लावण्यात आले नसले तरी, एसीयू या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. या चौकशीचा

### ४३ मिनिटांच्या माहितीपटात आरोपांची तपासणी

■ कॅनेडियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनच्या 'करप्शन, क्राईम, अँड क्रिकेट' या माहितीपट कार्यक्रमाद्वारे हे आरोप उघड झाले. ४३ मिनिटांच्या या माहितीपटात क्रिकेट कॅनडामधील कथित भ्रष्टाचार, प्रशासकीय संकटे, खेळाडूंच्या मानधनातील विलंब आणि संघटित गुन्हेगारीच्या आरोपांची तपासणी करण्यात आली आहे.




आणखी एक महत्त्वाचा भाग कॅनडाचे माजी प्रशिक्षक खुर्रम चौहान यांच्या कथित ऑडिओ रेकॉर्डिंगशी संबंधित आहे. या रेकॉर्डिंगमध्ये, त्यांनी आरोप केला आहे की क्रिकेट कॅनडाच्या काही माजी बोर्ड सदस्यांनी राष्ट्रीय संघात विशिष्ट खेळाडूंचा समावेश करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला होता. संघ निवडीवर प्रभाव टाकण्याचे आणि काही सामने निश्चित करण्याचे प्रयत्नही करण्यात आले, असा दावाही या रेकॉर्डिंगमध्ये करण्यात आला आहे.

तथापि, हे आरोप सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे गोळा करणे हे एक आव्हानच आहे. माजी प्रशिक्षक पुबुडू दसनायके यांनीही असेच आरोप केले आहेत. २०२४ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी संघात विशिष्ट खेळाडूंचा समावेश करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. जेव्हा त्यांनी तसे करण्यास नकार दिला, तेव्हा त्यांना करार रद्द करण्याची धमकी देण्यात आली. दसनायके यांनीही या प्रकरणात क्रिकेट कॅनडाविरुद्ध चुकीच्या पद्धतीने करार रद्द केल्याबद्दल खटला दाखल केला आहे.

# ग्रीनऐवजी सायफर्टला संधी मिळावी : आरोन फिंच






**चेन्नई :** आयपीएल २०२६ मध्ये खराब कामगिरी करणाऱ्या केकेआरच्या रणनीतीवर ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आरोन फिंच यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, संघाने खेळाडूंची निवड किमतीच्या आधारावर करू नये आणि कॅमेरॉन ग्रीनऐवजी टिम सायफर्टला संधी देण्याचा विचार करावा. मंगळवारी चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यानंतर बोलताना फिंच म्हणाले की, केकेआरच्या अनेक रणनीती अनाकलनीय होत्या. संघाला पाच सामन्यांत एकही विजय मिळवता आला नाही आणि एक गुण पावसाने मिळाला. फिंच यांनी ग्रीनला सहाव्या क्रमांकावर खेळवण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, हा त्याचा सामान्य फलंदाजी क्रम नाही आणि यामुळे त्याच्या क्षमतेचा योग्य वापर होत नाही.

ग्रीन या हंगामात वेगवेगळ्या क्रमांकावर फलंदाजी करत आहे. त्याने पाच सामन्यांत १८, २, ४, ३२, आणि ० धावा केल्या. फिंच म्हणाला की त्याने त्याच्या टी-२० कारकिर्दीत फार कमी वेळा सहाव्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे. त्याने सांगितले की, फिरकी गोलंदाजीविरुद्ध ग्रीनची अडचण स्पष्टपणे दिसली. चेन्नईविरुद्ध त्याला फिरकी गोलंदाजांचा सामना करावा लागला तेव्हा तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. चेन्नईविरुद्धच्या धावसंख्येचा पाठलाग करताना संघ स्पर्धेत दिसला नाही.

अजिंक्य रहाणे आणि अंगकृष रघुवंशीची ३१ चेंडूंतील ५० धावांची भागीदारी संथ होती. तो म्हणाला की, सुनील नरेनला सलामीला पाठवणे हा एक चांगला प्रयोग होता, जरी तो यशस्वी झाला नाही. नरेनने १७ चेंडूत २४ धावा केल्या. संघ व्यवस्थापनाने हा बदल म्हणून आजमावला. संघाने सीएसके विरुद्ध फिन ऍलन आणि सुनील नरेनकडून सलामी दिली. ऍलनने एक धाव केली. या हंगामातील त्याचे स्कोअर ३७, २८, ६, ९ आणि १ असे आहेत.

# एमसीए सुरु करणार खेळाडूंसाठी करार प्रणाली

## देशातील ठरले पहिले राज्य असोसिएशन




**वार्षिक मानधनाचे स्वरूप आणि श्रेणी**

| | |
|---|---|
| ग्रेड ए | वार्षिक १२ लाख ते २० लाख |
| ग्रेड बी | वार्षिक ८ लाख ते १२ लाख |
| ग्रेड सी | वार्षिक ८ लाख |

**मुंबई :** देशातील सर्वात यशस्वी क्रिकेट संघटना असलेल्या 'एमसीए'ने आपल्या खेळाडूंसाठी वार्षिक कंत्राट देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी २०२६-२७ या हंगामापासून या प्रणालीची अंमलबजावणी सुरू होईल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या धर्तीवरच एमसीए आपल्या खेळाडूंना तीन वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागणार असून, त्यानुसार त्यांना ठराविक वार्षिक रक्कम दिली जाणार आहे. एमसीएच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. मात्र, हे कंत्राट सर्वच खेळाडूंना मिळणार नाही. यासाठी काही विशेष निकष लावण्यात आले आहेत.

खेळाडू एमसीएचा नोंदणीकृत खेळाडू असणे अनिवार्य आहे. जे खेळाडू सलग दोन हंगामांपासून भारतीय संघात निवडले गेलेले नाहीत किंवा ज्यांना सलग दोन आयपीएल लिलावात कोणत्याही संघाने विकत घेतलेले नाही, अशाच खेळाडूंना या कंत्राटाचा लाभ मिळेल. ज्या खेळाडूंना आयपीएल किंवा टीम इंडियाकडून उत्पन्न मिळत नाही, त्यांना आर्थिक स्थैर्य देणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. निवड समितीची शिफारस आणि एमसीएने ठरवून दिलेले फिटनेसचे कडक निकष पूर्ण करणाऱ्या खेळाडूंनाच या यादीत स्थान मिळणार आहे.

हे वार्षिक कंत्राट खेळाडूंना मिळणाऱ्या 'मॅच फी'पेक्षा वेगळे असेल. म्हणजेच रणजी ट्रॉफी, विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी यांसारख्या स्पर्धा खेळल्यानंतर मिळणारे सामन्याचे मानधन खेळाडूंना स्वतंत्रपणे मिळत राहील.

# गुजरातच्या ताफ्यात दक्षिण आफ्रिकेचा स्फोटक खेळाडू कॉनर दाखल

**अहमदाबाद :** आयपीएल २०२६ च्या उर्वरित सामन्यांसाठी गुजरात टायटन्सने दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक फलंदाज कॉनर एस्टरहुइजन याला आपल्या संघात सामील केले आहे. इंग्लंडचा धडाकेबाज फलंदाज टॉम बँटन याच्या बोटाला दुखापत झाल्यामुळे तो या स्पर्धेला मुकला आहे. त्याच्या जागी एस्टरहुइजनला ७५ लाख रुपयांच्या बेस प्राईसवर संघात घेण्यात आले असून, तो जोस बटलर साठी मुख्य बॅकअप म्हणून भूमिका बजावेल.

२४ वर्षीय कॉनर एस्टरहुइजनने दक्षिण आफ्रिकेच्या एसए-२० लीगमध्ये एमआय केपटाऊन आणि प्रिटोरिया कॅपिटल्सचे प्रतिनिधित्व करत आपल्या फटकेबाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. नुकत्याच न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या ५ सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत त्याने आपला जलवा दाखवला. या मालिकेत त्याने १४५.९८ च्या स्ट्राईक रेटने २०० धावा केल्या आणि तो सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत अव्वल स्थानी राहिला. आपल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय मालिकेत एस्टरहुइजनने 'प्लेअर ऑफ द सिरीज' हा किताब पटकावला. त्याच्या या कामगिरीमुळे दक्षिण आफ्रिकेने ती मालिका ३-२ अशी जिंकली होती. ५ सामन्यांत १३ उत्तुंग षटकार मारण्याची क्षमता असलेला हा खेळाडू आहे. देणार आहे. शुक्रवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर त्यांचा सामना तळाला असलेल्या कोलकाता नाईट रायडर्सशी झाला.




**बुलढाणा**

**एआरडी सिनेमॉल**

**सालबर्डी :** दु. ०१:४५
**भूत बंगला:** दु. ०२:००, सं. ०५:००, रा. ०९:००
**धुरंदर द रिवेंज:** सं. ०४:४५, रा. ०८:३०

**खामगाव**

**श्री गजानन टॉकिज**

**भूत बंगला :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**भूत बंगला :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**वाशिम**

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**धुरंदर द रिवेंज :** रा. ०९:१५
**भूत बंगला:** रा. ०९:३५

**अकोला**

**मिराज**

**भूत बंगला :** स. ९.००,, स. १०.००, दु. १२.२०, दु. १.२०, दु. ३.४०, दु. ४.३०, सायं. ७.००, रात्री. ८.००, रात्री १०.२०, रात्री ११.२०
**धुरंधर द रिव्हेंज :** स. ९.००, दु. १.३०, सायं. ६.००, रात्री १०.३०
**लि क्रॉनिन्स द मम्मी (हिंदी) :** स.९.००, दु.२.३०, रात्री ११.००
**लि क्रॉनिन्स द मम्मी (इंग्रजी) :** रात्री ८.१५
**सुपर डुपर :** स. ११.४५
**सालबर्डी :** दु. ५.१५

**जालना**

**रत्नदीप सिनेमा**

**भूत बंगला :** रा. ०९:३०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**भूत बंगला :** रा. ०९:००, ०९:३०
**धुरंदर द रिवेंज : ०९:००**

**नीलम सिनेप्लेक्स**

**भूत बंगला :** रा. ०९:३०
**ली क्रॉनिन्स : द मम्मी:** रा. ०९:४०

**छत्रपती संभाजीनगर**

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**लि क्रोनिन द ममी :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**धुरंधर द रिव्हेंज :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०,
**बीटीएस वर्ल्ड टूर अरावींग अॅण्ड गोईंग लाईव्ह विव्हींग (हिंदी)** : दुपारी २:३०, सायंकाळी ५:३०,
**भूत बंगला :** दुपारी १२:१५, २:३०,
**बीटीएस वर्ल्ड टूर अरावींग अॅण्ड गोईंग लाईव्ह विव्हींग (इंग्रजी) :** दुपारी २:३०, ४:३०,

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**लि क्रोनिन द ममी :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**धुरंधर द रिव्हेंज :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**भूत बंगला :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**माईसाहेब :** दुपारी २:३०, रात्री १०:२५
**सालबर्डी : दुपारी २:३०, रात्री १०:२५**

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**लि क्रोनिन द ममी :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**धुरंधर द रिव्हेंज :** सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००,
**भूत बंगला :** दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०




# रणबीर कपूरच्या 'लव्ह अँड वॉर'ची रिलीज डेट आली समोर

**हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषेमध्ये येणार प्रेक्षकाच्या भेटीला**

रणबीर कपूरच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख निर्मात्यांनी जाहीर केली आहे, ज्यामध्ये आलिया भट्ट आणि विकी कौशल यांचीही भूमिका आहे. गेल्या अनेक दशकांतील सर्वाधिक प्रतिक्षित रोमँटिक ड्रामांपैकी एक मानला जाणारा हा चित्रपट रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल यांना पहिल्यांदाच एकत्र मोठ्या पडद्यावर आणत आहे. या तिघांची जोडी एक दमदार आणि उच्च-स्तरीय कथानकात दिसणार आहे. निर्मात्यांनी इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये रणबीर कपूरसोबत आलिया भट्ट, विकी कौशल आणि संजय लीला भन्साळी दिसत आहेत. पोस्टरवर लिहिले आहे, 'संजय लीला भन्साळींचा 'लव्ह अँड वॉर' २१ जानेवारी २०२७ रोजी प्रदर्शित होईल.'

पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल अभिनीत संजय लीला भन्साळींचा 'लव्ह अँड वॉर' २१ जानेवारी २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.' प्रमाणावर तयार होत असलेला लव्ह अँड वॉर हा संजय लीला भन्साली यांचा आजपर्यंतचा सर्वात महत्त्वाकांक्षी रोमँटिक ड्रामा ठरणार आहे. व्यापक कथानक आणि भावनांनी भरलेली मांडणी यामुळे हा चित्रपट भारतीय सिनेमातील वेगळी प्रेमकथा ठरण्याची शक्यता आहे.

संघर्ष, भावना आणि नात्यांच्या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीवर आधारित या चित्रपटात प्रेम, मैत्री, विश्वासघात आणि उत्कटता यांचा वेध घेतला जाणार असून, प्रेक्षकांना एक प्रभावी सिनेमॅटिक अनुभव देणारा ठरणार आहे. सूक्ष्म तपशील, भव्य सेट्स आणि दृश्यदृष्ट्या समृद्ध जगासाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक संजय लीला भन्साली यांच्याकडून या चित्रपटात भावनिक खोली पाहायला मिळणार आहे. लव्ह अँड वॉर हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषेमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# 'स्ट्रीट फायटर' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित


**विद्युत जामवालचे हॉलीवूडमध्ये पदार्पण**

पॅरामाउंट पिक्चर्सने लेजेंडरी एंटरटेनमेंट आणि कॅपकॉमसोबत मिळून 'स्ट्रीट फायटर' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. या चित्रपटात नोआ सेंटिनियो, जेसन मोमोआ आणि अँड्र्यू कोजी मुख्य भूमिकेत आहेत. विशेष म्हणजे, यात बॉलिवूड अभिनेता विद्युत जामवाल धाल्सिमच्या भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटातून विद्युत हॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहेत. हा चित्रपट १६ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. ट्रेलरमध्ये विद्युत जामवाल पूर्णपणे टक्कल असलेल्या लूकमध्ये दिसत आहेत. त्यांच्या शरीरावर असलेले टॅटू आणि रग्ड स्टाइलिंग दिसत आहे. यासोबतच त्यांची लीन आणि मस्क्युलर शरीरयष्टी धाल्सिमच्या योगा-आधारित फायटिंग स्टाइलला उत्तम प्रकारे दर्शवते.




विशेष बाब म्हणजे चित्रपटात धाल्सिमचे पात्र पारंपरिक शांत योगीच्या प्रतिमेपेक्षा थोडे वेगळे दिसत आहे. ट्रेलरमध्ये विद्युतचे तीव्र डोळे आणि धोकादायक हावभाव त्याच्या पात्राला एक गडद आणि शक्तिशाली वळण देतात. चित्रपटातील अ‍ॅक्शन आणि फाइट सीक्वेन्सची झलक ट्रेलरमध्ये दाखवण्यात आली आहे. चित्रपट १९९३ च्या पार्श्वभूमीवर आधारित आहे, जिथे रयू आणि केन मास्टर्स पुन्हा एकदा एका मोठ्या लढतीत उतरतात. कथेत चुन-ली त्यांना वर्ल्ड वॉरियर टूर्नामेंटसाठी तयार करते. या टूर्नामेंटमागे एक कटकारस्थान दडलेले आहे, जे दोघांना समोरासमोर आणते आणि त्यांच्या भूतकाळाशी संबंधित आव्हाने समोर आणते. चित्रपटाचे दिग्दर्शन किताओ सकुराई यांनी केले आहे. यात नोआ सेंटिनियो (केन मास्टर्स), एंड्रयू कोजी (रयू), कैलिना लियांग (चुन-ली), जो अनोआई (अकुमा), डेविड डास्टमलचियन (एम. बाइसन), कोडी रोड्स (गाइल), एंड्रयू शुल्ज (डैन हिबिकी), एरिक आंद्रे (डॉन सॉवेज), विद्युत जामवाल (धाल्सिम), ऑरविल पेक (वेगा), ओलिवियर रिच्टर्स (जैंगिफ), हिरोकी गोटो (ई. होंडा), रैना वह्लैंडिंघम (जुली), अलेक्जेंडर वोल्कानोव्स्की (जो), कर्टिस '५० सेंट' जैक्सन (बालरॉग) आणि जेसन मोमोआ (ब्लांका) यांचा समावेश आहे.

# वजन वाढल्यामुळे ट्रोल करणाऱ्यांना पत्रलेखाने दिले सडेतोड उत्तर



अभिनेता राजकुमार रावची पत्नी पत्रलेखा सध्या प्रचंड चर्चेत आहे. एकीकडे अभिनेत्री मातृत्व एन्जॉय करत आहे, तर दुसरीकडे पती राजकुमार रावचा आगामी 'टोस्टर' हा चित्रपट नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. नुकतेच, अभिनेत्री पत्रलेखा आई झाल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी स्पॉट झाली. तिचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आई झाल्यानंतर पत्रलेखाचे वजन वाढले आहे. ज्यामुळे तिला बॉडी शेमिंगला सामोरे जावे लागले. दरम्यान, आता अभिनेत्रीने ट्रोल करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिले आहे.

पत्रलेखा तिचा पती राजकुमार रावसोबत 'टोस्टर' चित्रपटाच्या स्क्रीनिंगला उपस्थित होती. दरम्यान, ट्रोल झाल्यांनंतर इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करुन तने ट्रोल करणाऱ्यांना फटकारले आहे. 'पॅप्स पेज! मला काय झाले आहे? मी नुकतेच एका बाळाला जन्म दिला आहे. माझे वजन वाढले आहे. जे तुम्हा सर्वांना एक विचित्र गोष्ट वाटत आहे. मी बसून डोंगर खाल्लेला नाही. मी नुकतेच बाळाला जन्म दिला आहे. तसेच दोन चित्रपटांची निर्मितीही केली आहे. जी सोपी गोष्ट नाही', असे तिने आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे. 'शक्य असते तर, मी आज अशी नसते. प्रेग्नेंसीमुळे माझे शरीर असे झाले आहे. देवासाठी कृपया दयाळू व्हायला शिका', असेही अभिनेत्री म्हणाली. सध्या तिची इन्स्टाग्राम स्टोरी सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तिला ट्रोल करणाऱ्यांना तिच्या चाहत्यांनीहि धारेवर धरले आहे. पत्रलेखा आणि राजकुमार राव यांचे लग्न १५ नोव्हेंबर २०२१ रोजी झाले आहे. गेल्या वर्षी १५ नोव्हेंबर रोजी पत्रलेखाने एका मुलीला जन्म दिला. तिच्या मुलीचे नाव पार्वती पॉल राव असे आहे.